
REFBK-0001802
REFBK-0001802



सत्कार्योत्तेजक सभा– धुळें

[ श्रीरामदास आणि रामदासी मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेला ]

श्री

# रामदास आणि रामदासी
## भाग अठरावा

मेरुस्वामिकृत

सर दुसरा ] [ माणि सातवा

# श्री रामसोहळा

रामसोहळा ग्रंथ गहन । अनुवादला तो चि आपण ।
शब्दीं च निःशब्द पूर्ण । प्रतिष्ठलें ॥

REFBK-0001802

ह्या ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या श्री आत्माराम
छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला

सर्व हक्क राखून ठेविले आहेत

१८४२ चैत्र शुद्ध १

किंमत साडे तीन रुपये

मराठी ... ९०८ ... ग्रं. क्र. ... ८८ ... संग्र

॥ श्रीराम ॥

# श्रीरामसोहळा

## प्रस्तावना

ग्रंथाचें सामान्यस्वरूप — अशा ग्रंथांचा उद्देश काय — ग्रंथाचा सारांश — समर्थ चरित्र — श्रीरामचंद्र हेंच उपास्य दैवत कां — हा श्रीराम कोण — अनंत मौनींचें चरित्र — मेरुस्वामींचें चरित्र — समर्थांच्या पश्चात् — जेसुइस्ट व रामदासी सांप्रदाय — जेसुइस्टांची थोडी माहिती — समर्थ व इग्नेशियस डि लोयोला — हिंदुस्थान व युरोप — समर्थ सांप्रदाय अपवाद ठरला नाहीं — रामदासी पंथ ह्मणजे राष्ट्रसमाजसेवासंघ—समर्थनिर्दिष्ट कार्य आज हि होत आहे— एक भ्रम — ग्रंथसंपादन — तंजावराकडील रामदासी मठ

## ग्रंथाचें सामान्य स्वरूप

रामसोहळा ग्रंथ दासबोधापेक्षां हि थोडासा मोठा असून त्याची ओंवी-संख्या ९४२७ आहे. अनुक्रमणिकेवरून त्यांतील विषयांचा बोध होईल व त्यावरून असें दिसतें कीं, हा ग्रंथ चरित्रात्मक नव्हे, किंवा एखाद्या विषयाचें विशेष प्रतिपादन करण्याच्या उद्देशानें हि लिहिलेला नव्हे. तर तो एक सर्व-संग्रहात्मक ग्रंथ आहे. त्यांत समर्थांचें चरित्र आलें आहे, वेदान्त आला आहे, वर्णाश्रमधर्माच्या स्मृतिविहित आचाराचें वर्णन आलें आहे, ग्रंथकर्त्यांच्या तीर्थयात्रांचा वृत्तान्त आला आहे. षड्दर्शनाचे सार यांत सांगितलें आहे, तसा च भक्तीचा हि खुलासा केला आहे. देवतास्तवन गुरुवर्णन, मायाप्रभाव इत्यादि ठरीव विषयांचें नित्य परिपाठाप्रमाणें च पण काव्यरसपूर्ण असें दर्शन येथें घडतें ; व ज्ञानोबारायांच्या प्रासादिक वाणींत जशा उपमांवर उपमांच्या व दृष्टान्तांवर दृष्टान्तांच्या लहरि येऊन वाचकाला आपल्या स्कंधावर धरून नाचवितात, तशा च तऱ्हेनें मेरुस्वामींच्या काव्यलहरी देखील करितील असा भरंवसा वाटतो. यांतील विविध विषयांच्या विवेचनाला भगवद्गीता, योगवासिष्ठ, उपनिषदें, स्मृति, भागवतादि पुराणें, दासबोधादि सांप्रदायिक प्रासादिक ग्रंथ इत्यादिकांचा अवश्य तेथें आधार घेतलेला आहे.

## अशा ग्रंथाचा उद्देश काय ?

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, एकाद्या नवीन विषयाचें किंवा कल्पनेचें उद्घाटन करण्याच्या बुद्धीनें हा किंवा असले दुसरे ग्रंथ

लिहिलेले नव्हत. ज्ञानोबांची ज्ञानेश्वरी, नाथांचें भागवत, समर्थांचा दासबोध, तुकारामबोवांचे अभंग किंवा पंतांचे भारतभागवतरामायणादि ग्रंथ ज्या उद्देशानें लिहिण्यांत आले त्या उद्देशाचा हा ग्रंथ नव्हे. यांत एकाद्या संस्कृत ग्रंथावर टीका नाहीं, कीं एकाद्या संस्कृत ग्रंथाचें सार प्राकृतांत आणण्याचा उद्देश नाहीं. आमची मति या ग्रंथाच्या उद्देशासंबंधानें अशी धांवते कीं, हा ग्रंथ ह्मणजे गुरूनें (Professor) आपल्या शिष्यांना वेळोवेळीं विविधविषयांवर दिलेल्या व्याख्यानांचें (lectures) व कांहीं किरकोळ टांचणांचें (notes) हें एक बाड (collection) आहे. सांप्रदायाचे प्रमुख ग्रंथ (text books) दासबोधादि पूर्वी होते च. तसे ग्रंथ लिहिण्याचें अर्थात् प्रयोजन नव्हतें. पण स्थानिक गरजा पुरविण्याची त्या त्या पीठाच्या गुरूवर जबाबदारी असल्यामुळें अशा ग्रंथांची निपज होणें जरूर होतें. या ग्रंथांचा त्या त्या मठाबाहेर जो मुळीं च प्रसार झालेला दिसत नाहीं, याचें झालें तरी त्याचें स्थानविशिष्टत्व हें च मूळ कारण असलें पाहिजे. जेव्हां या ग्रंथाचें स्वरूप एका दृष्टीनें पूर्ण झालेसें वाटलें, तेव्हां उपोद्घात, प्रस्तावना, अनुक्रमणिका, उपसंहार इत्यादिकांची जोड मिळून सांप्रतचें स्वरूप त्याला देण्यांत आलें असावें. ग्रंथाची उपयुक्तता वाढविणारे उपोद्घातादि प्रकार नवीन आहेत असें कोणाला वाटेल, पण तसा प्रकार नाहीं; हें या व इतर पुष्कळ ग्रंथाच्या अवलोकनानें सहज ध्यानांत येणारें आहे.

स्वत: ग्रंथकार आपल्या ग्रंथासंबंधानें काय ह्मणतात तें आतां पाहूं. सायुज्यतेचा जिव्हाळा । ग्रंथ अनुभवाचा आगळा । संभाविसी रामसोहळा । रसाळ प्रमेय ॥ १$\frac{१}{८३}$ असें ग्रंथकार देवाला उद्देशून ह्मणतात. त्यांत काय सांगितलें आहे ह्मणाल तर मुख्यें स्वरूपाचा निश्चितार्थ । मायानिरासें होयेजे कृतार्थ । अन्वयव्यतिरेकें परमार्थ । प्रांजळ केला ॥ १$\frac{१}{८२}$; ह्मणजे परमार्थ हें या ग्रंथाचें ध्येय होय. यांत निरोपिलें तत्वज्ञान । अभिन्न आत्मज्ञान खुणें । वेदांत संमती गहन । वेदवाक्यें ॥ ८५ ॥ साही दर्शनांचीं प्रमेयें । षण्मतांचीं रूपें निश्चयें । अठरा पुराणें निस्संशय । संमतीसि आलीं ॥ ८६ ॥ अद्वैतबोधगीतार्थ । उपनिषदांचे मतितार्थ । सकळ तात्पर्यें अनुग्रहार्थ । आलीं गर्भीं ॥ १$\frac{१}{८७}$॥ एका वाक्यांत ग्रंथकार ग्रंथाचें स्वरूप सांगतात — समुद्रावगाहनीं तीर्थें । आतुडती फळें सुकृतार्थें । तैसा येक चि ग्रंथ सर्वार्थें । संपन्न होय ॥ १$\frac{१}{८८}$॥ आणि हा अखंडैकरस ।

ग्रंथ द्राक्षापाक सौरस । दाशरथीराम हृदयास । होय उद्धाटिता ॥१ १/१००॥
आणि ह्मणूनच यास श्रीरामसोहळा असें नांव कवीनें दिलें आहे.

## ग्रंथाचा सारांश

रामसोहळ्याचे अकरा रुद्र आणि प्रत्येक रुद्राचे अकरा उल्लास असे १२१ भाग आहेत. पहिल्या रुद्रांत मंगळाचरण गणेशवंदन । सरस्वती सद्गुरु संज्जन । स्तवन पंचरत्नें॥१ ११/१०५॥उपरि समर्थचरितविख्याति । अशीं सहा स्तवनें आलीं असून शेवटच्या उल्लासांत समर्थांची षड्गुणैश्वर्य संपत्ति वर्णिली आहे. समर्थवर्णनांत समर्थांचें उपास्यदैवत श्रीरामचंद्र आणि समर्थ स्वतः यांच्या वनवासाची तुलना करून अलंकारिकपणें समर्थांचें उपास्यदैवताहून श्रेष्ठत्व दाखविलें आहे, तें सरस आहे ( ओव्या १०/६९-८० ). मेरुस्वामींच्या या समर्थचरित्रांत कोणकोणत्या गोष्टी आहेत त्यांचें येथें टिपण केल्यास बरें.

## समर्थचरित्र.

गोदावरीचे तीरीं जांभगांव हें समर्थांचें जन्मस्थान असून व्यस्तरूपानें (भजां रूपानें) लोकांना तें भक्तिमार्गाचा उपदेश करितें. समर्थांचे वडील सुरोपंत ( सूर्योपंत ) सूर्योपासक होते. समर्थांच्या मातेचें नांव रेणुका असून ती अत्यंत निष्कपट स्त्री होती. सूर्योपंतांच्या भक्तीनें सूर्य प्रसन्न होऊन एक दिवस भोजनसमयीं ब्राह्मणरूपानें त्यांजकडे आला व त्यांनीं केलेल्या आतिथ्यानें संतोष पावून त्यांना राम, सीता व लक्ष्मण यांच्या तीन सुंदर मूर्ति देता झाला; व यांची उपासना करावी ह्मणून सांगता झाला. पण सूर्यप्रतिमेवांचून मला कोणाचें दर्शन घ्यावयाचें नाहीं असें सूर्योपंतानें निक्षून सांगितलें, तेव्हां ' हें मूर्तित्रय मूर्तिमंत सूर्य च आहे. त्यांच्या अर्चनानें तुझ्या कुळाचा उद्धार कर ' असें सांगून व पंक्तीस भोजन करून ब्राह्मणरूपी सूर्य अन्तर्धान पावला. त्यावेळीं प्रत्यक्ष सूर्याचें च दर्शन घडलें, असें समजल्यानें सूर्योपंतास फार आनंद झाला. पुढें देहांतसमयीं त्यांनीं आपल्या पुत्रास जवळ बोलावून

---

१ काव्याच्या पक्वपणाचे ह्मणजे पाकाचे कवींनीं दोन प्रकार मानिले आहेत; एक द्राक्षापाक आणि दुसरा नारिकेल पाक. ज्यांत आंत बाहेर सारखाच रस ओथंबिलेला असतो, जो चाखावयाला मुळींच त्रास पडत नाहीं तो द्राक्षापाक; आणि ज्यांत रस गुढ असतो, व तो बाहेर काढावयास थोडा प्रयास पडतो तो नारिकेल पाक ( द्राक्षापाकः स कथितो बहिरन्तः स्फुरद्रसः । स नारिकेलपाकः स्यादन्तर्गूढरसोदयः ॥ ).

त्या मूर्तित्रयाची नीट अर्चा करावी ह्मणून सांगितलें. तेव्हांपासून त्यांच्या घराण्यांत रामोपासना सुरू झाली. वडिलांचे पश्चात् ज्येष्ठ पुत्रानें परंपरागत उदरनिर्वाहाचें साधन असें कुळकरण सोडून रामोपासना वाढविली. समर्थ लहान बंधु; पण बाल्यापासून त्यांच्यांत तीव्र वैराग्य असल्यामुळें त्यांचें पाऊल घरांत न राहतां ते नित्य रानावनांत भटकत व रुईचे पानावर रामचरित्र लिहून काढीत. तेथून त्यांची प्रेमळ माता त्यांना शोधून आणून जेऊं घाली. श्रेष्ठांची पत्नी आपल्या सासूला शेत राखावयास पाठवी. एके दिवशीं शेताव-रील विहिरींत ती पाणी काढावयास गेली असतां तिच्या हातांतील कासंडी आंत पडली. सुनेच्या भयानें ह्मातारी रडूं लागली; व रात्र पडली तरी का-संडी वांचून ती घरीं जाईना. इतक्यांत स्वतः श्रीरामचंद्र तिचा करुणास्वर ऐकून शेतकऱ्याच्या वेषानें तेथें आले व तिचें पात्र त्यांनीं तिच्या स्वाधीन केलें व काळोखांतून तिला घरीं आणून पोचविलें. पुढें एकदां समर्थांचे वि-वाहाचा निश्चय होऊन घटिका घातली असतां अक्षता पडण्याच्या सुमारास समर्थ एकदम पळून गेले. नंतर बारा वर्षें वनवास करून आणि एकांतवासांत काल घालवून त्यांनीं रुद्रसाक्षात्कार करून घेतला. ( उल्लास ६ )

या बारा वर्षांत हजारों तपस्वी व योगी यांचीं त्यांनीं दर्शनें घेतलीं व नंतर बारा वर्षें तीर्थयात्रा केल्या. या काळांत त्यांच्या सामर्थ्याची व भक्तीच्या उत्कटत्वाची प्रल्हादाप्रमाणें कसोटी झाली. अग्निप्रवेश, व्याघ्रसिंहादिकांजवळ वास, विषभक्षण, पाण्यांत बुडून रहाणें, दीर्घ उपवास इत्यादि दिव्यांतून त्यां-ना जावें लागलें. एके वेळीं उन्हाळ्यांत जमीन जिकडून तिकडून कडकडीत तापली असतां एका उजाड निर्जळ व काळ्याकुट्ट फत्तरांच्या डोंगरांवर, भर दोन प्रहरीं सूर्य किरण जणूं अग्नीचा वर्षाव करीत आहेत अशाप्रसंगीं समर्थ विश्रांतीसाठीं बसले. भुकेनें व तहानेनें त्यांचे पंचप्राण व्याकुळ होऊन प्राणान्त होतो कीं काय असें झालें. समर्थांनीं रामस्मरण केलें. तेव्हां धनुर्धारी राम तेथें प्रकट होऊन त्यांनीं संजीवनीचा प्रयोग समर्थांवर करून त्यांना सावध केलें व अनुग्रह दिला. पुढें समर्थ त्याच पर्वतावर एक वर्षभर समाधि सुखांत राहिले व धनुष्पाणि श्रीराम तेथें त्यांचे रक्षण करीत होते. या प्रमाणें समर्थांना आत्म-साक्षात्कार होऊन त्यांची विश्वाकार वृत्ति झाली व अशा संकल्पशून्य स्थितींत ते कृष्णातीरीं आले. ( उल्लास ७ )

जीवन्मुक्तांच्या वृत्ति बालोन्मतपिशाचवत् असतात. त्याप्रमाणें कधीं पिसाटाप्रमाणें तर कधीं उन्मत्ताप्रमाणें तर कधीं पोराप्रमाणें चाळे करीत समर्थ तोंडानें केव्हां हर हर तर केव्हां जय जय रघुवीर असा घोष करीत; व केव्हां केव्हां नदीतीरावर कीर्तन भजन करीत. शहापुराजवळ एके दिवशीं असें कीर्तन चाललें असतां त्या नगराधिकाऱ्यानें तेथें येऊन समर्थांचे पायीं मिठी घातली व माझ्या घरीं येऊन मजला सनाथ करावें अशी प्रार्थना केली. त्या अधिकाऱ्यांचें नांव कमळाकर. त्याला समर्थांनीं उपदेश दिला. या प्रमाणें सांप्रदायाला सुरुवात झाल्यावर गांवचे गांव व मंडळांचीं मंडळें समर्थांचा उपदेश घेउन त्यांचीं अनुयायी बनलीं. याच सुमारास रामजन्मदिवस प्राप्त झाला. समर्थांची वसति तेव्हांपासून पारगांवीं होती. तेथें जन्मोत्सव फार मोठ्या प्रमाणावर झाला. पारगांवचा अधिकारी त्यांस पूर्ण अनुकूल होता. रस्त्यानें रामाचा रथ चालला असतां एक आम्रवृक्षाची खांदी आड आली. तेव्हां समर्थांनीं स्मरण केल्यावरून बलभीमजीनीं खांदी मोडून रथाला मार्ग सुरळीत करून दिला. तेथून पुढें समर्थ उरण ऊर्फ बाहेगांव येथें आले. तेथें कृष्णेच्या भीमकुंड नामक डोहांत मारुतीची प्रचंड मूर्ति आहे असें त्यांना तेथील पुराणिकांकडून कळलें. उरणगांवाला बाहेगांव नांव पडण्याचें कारण हि त्या पुराणिकांनीं सांगितलें ($\frac{८}{४०-६१}$). समर्थ तें ऐकून मारुतीच्या दर्शनाची उत्कंठा लागल्यामुळें मध्यरात्रीं डोहाजवळ गेले. बरोबर आलेल्या मंडळीला धोंडे मारून त्यांनीं दूर घालविलें. एक लहान मुलगा मात्र मारास न जुमानतां तेथेंच राहिला. समर्थांनीं डोहांत उडी घेतली, आणि मुलानें हि त्यांचें अनुकरण केलें. आंत गेल्यावर त्यांना एक देऊळ लागलें. पण आंत मूर्ति नव्हती. समर्थांनीं डोह धुंडून मारुतीची मूर्ति शोधून काढिली व तिची स्थापना त्या देवालयांत केली. ( उल्लास ८ वा )

एकदां समर्थ पिसाटासारखे भयंकर रूप धारण करून स्वैरपणें धांवत धांवत एका डोंगरांतील वाघाच्या गुहे जवळ आले, आणि तिच्या दारांत जाऊन बसले. थोड्यावेळानें वाघ बाहेर पडण्यासाठीं तेथें आला असतां आपला मार्ग अडलेला पाहून घाबरला; व अंगचोरून बाहेर पडूं लागला. पण समर्थांनीं त्याच्या गळ्या भोंवतीं हात टाकून त्याला धरिलें, व येथून तूं दुसऱ्या गुहेंत रहावयास जा म्हणून सांगितलें. त्या प्रमाणें तो गेल्यावर समर्थ तेथें च राहिले. तेथें ते समाधि लावून बसले असतां क्षुधेमुळें शरीरास मूर्च्छा आली

व त्यावेळीं श्रीरामचंद्रांनीं त्यांस सावध करून दर्शन दिलें. मग तेथून समर्थ निघाले ते डोंगरांतून पळत सुटले. सर्वांगाला तेल माखून, डोळ्यांत काजळ घालून, हातांत कंकणें भरून व एकंदरींत स्त्रीवेष धारण करून ते भ्रमिष्टा-सारखे इकडे तिकडे फिरूं लागले. लोकांना वाटलें राममंत्राच्या अनुष्ठानांत कांहीं चूक झाल्यामुळें समर्थांना वेड लागलें; व तन्निवारणार्थ ते अनुष्ठानास लागले.

पुढें रामनवमीचा उत्सव आला. तेव्हां सभोंवतीं डोंगर आहेत असें एक स्मशानाचें ठिकाण समर्थांनीं पसंत करून तें तेथील अधिकाऱ्यापासून मागून घेतलें व तेथील पिशाचांना इतर स्थळीं पाठवून त्याची शुद्धि करवि-ली, आणि तेथें देवालय बांधून त्यांत पाटण गांवच्या मूर्ति आणून त्यांची स्थापना केली. या देवालयासाठीं द्रव्य पाहिजे होतें तें समर्थांनीं आपल्या एका प्रेमळ पण दरिद्री भक्तापाशीं मागितलें. त्या भक्ताला ती याचना ह्मणजे थट्टा वाटली. पण समर्थांनीं त्याचें चिंध्यांचें गाठोडें तपासावयास सांगितलें असतां त्यांतूनच अवश्य तें द्रव्य मिळालें. हेंच तें चाफळचें देऊळ. तेथें उत्सव झा-ल्यावर मारुतीच्या जन्मोत्सवाविषयीं समर्थ विचार करीत असतां बाहेगांवीं स्थापन केलेल्या मारुतीनें क्षुधेमुळें राग येऊन पुजाऱ्यास देवळाबाहेर घालवून दिलें. तेव्हां तो पुजारी तें गाऱ्हाणें घेऊन समर्थांकडे आला. समर्थांनीं त्याला कांहीं खारका देऊन त्या मारुतीस द्यावयास सांगितलें; व रामजन्मोत्सव झाल्यावर बाहेगांवीं येऊन मारुतीला त्यांनीं प्रचंड नैवेद्य केला.

---

याप्रमाणें लीला करीत असतां समर्थ असंख्य लोकांस भक्तिमार्गास लावीत होते. एकदां चाफळ जवळच्या पर्वतशिखरावर समर्थ बसले असतां मारुति वानररूपानें त्यांच्या दर्शनास आला, व समर्थांनीं त्याला आपल्या हा-तानें फळें चारिलीं. इतक्यांत एक ब्राह्मण कांहीं कारणानें दुःखी होऊन सम-र्थांकडे आला, व समर्थांचे चरणांवर मस्तक ठेवून ह्मणाला, "माझें अभीष्ट पुरवाल तरच मीं मस्तक उचलीन, नाहींतर देह ठेवणार नाहीं; आपण बल-भीम आहां, तर मला त्याची भेट करवून द्या." असें ह्मणून समर्थांच्या पा-यांना घट्ट मिठी घालून तो जो बसला, तो कांहीं केल्या ते सोडीना. तेव्हां सम-र्थांनीं तुला बलभीमाचें दर्शन करवितों असें सांगून त्याला एका प्रयोजनांत एक वृद्ध ब्राह्मण जेवीत होता त्यापाशीं नेऊन तोच बलभीम असें सांगितलें. जेवण उरकून तो वृद्ध आंचवल्याबरोबर ब्राह्मणानें त्याचे पाय धरिले; वृद्धानें सोड ह्मटलें तरी तो ते सोडीना. लोक तेथें जमा झाले, पण समर्थवचनावर पूर्ण विश्वासू-

न ब्राह्मण त्याचे पाय सोडीना. काळोख पडला. लोक निघून गेले. तेव्हां वृद्धानें आपलें खरें रूप प्रकट केलें व " माझ्या सख्याला कां छळतोस ? " असें ह्मणून त्याला अभयदान करून रामउपासनेची दीक्षा दिली. असे समर्थांनीं अनेक चमत्कार केले.

जावळीपाशीं असाच एक चमत्कार त्यांनीं केला. देवघरांत बसून एकान्तीं भोजन करीत असतां एक भाविक स्त्री त्यांस वाढावयास आंत गेली, तों तिला आंत समर्थ नसून कोणी मोठा वानर दोन्ही हातांनीं भराभर जेवतो आहे असें दिसलें व भयानें ती मूर्छित झाली.

समर्थांना अनेक योगसिद्धि होत्या; पण त्यांकडे त्यांचें लक्ष नसे. एकदां समर्थ पळतां पळतां चोंहींकडे पाणीच पाणी झालें, तेव्हां ते त्या नदीवरूनच पळत सुटले. एकदां ते एका सभामंडपाच्या आंत बसले असतां मोठा पाऊस पडून तो सभामंडप कोसळा. तरी समर्थ आंतच राहिले. कांहीं दिवसांनीं लोक त्यांच्या शोधार्थ आले व वर पडलेले दगड काढतांच समर्थ तेथून पळत निघाले, व त्यांनीं एका नदीप्रवाहांत उडी टाकिली. तेथें वाळूंत बरेच दिवस राहिल्यावर पाणी ओसरलें असतां लोकांनीं ती काढितांच समर्थ तींतून बाहेर पडले. नदीकांठानें हातांत धनुष्यबाण घेऊन जात असतां एका चिमणीला बाण मारून त्यांनीं खालीं पाडिलें. जवळ असलेले ब्राह्मण तें पाहून समर्थांच्या संतपणाची कुचेष्टा करूं लागले. तेव्हां समर्थांनीं मृत चिमणीला हातांत घेऊन जिवंत करून सोडून दिलें. ( उल्लास ९ वा )

असे चमत्कार करीत आणि सहस्रावधि लोकांना रामोपासनेची दीक्षा देत समर्थ उपदेश करीत फिरतां फिरतां पंढरीस आले. तेथें **विठ्ठल मूर्तिसि रोकडें । समर्थीं रामेंचि केलें निवाडें । आटघटिका रामरूपडें । पाहिलें सर्वत्र ।** तेथें वाळवंटावर श्रेष्ठांचें कीर्तन चाललें असतां समर्थ मागें उभे राहिले. समर्थांनीं श्रेष्ठांच्या आज्ञेवरून स्वतः हि तेथें कीर्तन केलें; व तें ऐकून सगळे लोक चकित होऊन गेले. मंतर समर्थांनीं मातेला दर्शन दिलें.

समर्थांचें विशेष रहाणें चंद्रगिरीवर असे, असें मेरुस्वामी ह्मणतात, व तेथील प्रदेशाचें वर्णन हि त्यांनीं फार मनोवेधक असें केलें आहे. ( उल्लास १०, ४३–६६ )

समर्थ जिकडे गेले तिकडे प्रकाश करीत गेले. सूर्य जया देशासि गेला । तेउता प्रकाश चि जाला । प्रकाशघन समर्थकीर्तीला । कास

ह्मणोनि वर्णावें ! ॥ $१^{१०}_{३६}$. त्यांच्या उपदेशानें लोकांची क्षणामाजि पालटे स्थिति ॥ आणि ते अनोळिखिचे ठायीं चमत्कारें । वोळखि धरिती निर्धारें । व वोळखीचे ठायीं साचारें । देखती अनोळख ॥ $१^{१०}_{३८}$. समर्थांचें उपास्यदैवत श्रीरामचंद्र यांनीं जनोद्धारार्थ चवदा वर्षें वनवास पतकरिला, पण समर्थें सर्वकाळ वनांतरीं । केली श्रीरामेंसी सरी ॥ स्वामीपरीस सेवकाची थोरी । रामदास पुरुषार्थें ॥ $१^{१०}_{६९}$. ही सेवकाची थोरी स्वामीपरीस कशी हें पहाणें असेल तर वाचकांनीं प्रथमरुद्रांतील दशमोल्लासाच्या ६९ पासूनच्या दहा पंधरा ओंव्या वाचाव्या. श्रीरामचंद्रापाशीं ते एकबाणी असल्यामुळें एक शर तरी असे. पण दासापाशीं शस्त्र चि नसे; मग त्यांनीं मर्दुमकी कशी केली ? तर दासबोध वज्र चपेट । थापेसरिसें करिती सपाट । ज्ञानसत्ता उत्कट । या समर्थाची ॥ $१^{१०}_{७७}$. समर्थांचा कृपासिंधु उचंबळला । परमार्थरूप ग्रंथ केला । जो कल्पकोटी जाला । उपेगासी ॥ $१^{१०}_{९३}$. तो श्रवण करितां दासबोध । तात्काळ उपतिष्ठे प्रबोध । तुटे संसारसंबंध । मननमात्रें ॥ $१^{१०}_{९४}$. अशा दासबोधरूपी साधनानें आत्मस्थिती स्वधर्माचरणें । सन्मार्गें अद्वैत संचरणें । ज्ञानविरक्ती भक्तीनें । प्रजा पाळिल्या ॥ $१^{१०}_{९२}$.

मेरु स्वामीनीं समर्थांचा उपदेश स्वतः ऐकिला असावा. ते ह्मणतात समर्थकृपा प्रबोधार्कें । अनंत अनुग्रह संपर्कें । बाणलें समाधान तें सुतर्कें । तर्कितां तर्कवेना ॥ $१^{११}_{३२}$. समर्थांनीं अनंत मौनींना जो अनुग्रह दिला त्याचें वर्णन मेरुस्वामींनीं प्रथमरुद्राच्या एकादशोल्लासांत केलें आहे. समर्थें आर्जविला श्रीराम । परंपरेसी बोधकल्पद्रुमअनुभवूनि निजविश्राम । अनंत अनुग्राहिला $१^{११}_{३४}$. या प्रसंगीं अनंत मौनींनीं समर्थांचें षोडशोपचारें निर्विकल्प अर्चन केलें व आरती झाल्यावर पुढती करूनियां नमन । मागीतलें आश्वासन । तें ( जें ) आठवितां चि दर्शन । द्यावें अंतरस्थितीनें ॥ $१^{११}_{५३}$. समर्थांनीं हि माथां कर ठेऊनि कृपान्वयें । दिल्हें वरदान अभय । मनोरथसिद्धीनें ॥ आणि शिष्याचे कर्णीं रहस्य सांगितलें, जे सर्वस्वें आर्जवीं भजनीं । कोदंडपाणिविग्रह ॥

## श्रीरामचंद्र हेंच उपास्य दैवत कां ?

या ठिकाणीं थोडेसें विषयान्तर करून समर्थांनीं श्रीरामाची च कांस कां धरिली, महाराष्ट्रांत त्या वेळीं भक्तिप्रधान अनेक संप्रदाय असतां त्यांपैकीं च एकांत शिरण्याचा प्रयत्न न करितां त्यांनीं आपला ' सवता सुभा ' मांडण्याचा खटाटोप कां केला याविषयीं जे मनांत विचार आले त्यांचें दिग्दर्शन करावेसें वाटतें; तें करण्यास वाचकांची अनुज्ञा घेतों.

या विषयीं सुप्रसिद्ध भारतेतिहाससंशोधक रा. राजवाडे यांनीं सरस्वती-मंदिरांतील एका लेखांत चांगला मार्ग दाखविला आहे. त्यांतून थोडेसें अवतरण करितों. " रामदासीपंथ हिंदुस्थानांतल्या व महाराष्ट्रांतल्या कोणत्याहि भक्तिपंथाहून भिन्न आहे. " " प्रकाश, आनंद, स्वरूप व चैतन्य ह्या चार संप्रदायांहून निराळा असा रामभक्तीचा भक्तिपंथ रामदासांनीं कां काढिला, निव्वळ राजकीय पंथ कां काढला नाहीं, ह्याचें कारण महाराष्ट्राची तत्कालीन जनमनोरचना होय. शक ११५० पासून १५६० पर्यंत महाराष्ट्रांत भक्तिमार्गाचा व संन्यासप्रवणतेचा अत्यंत प्रसार होऊन, लोकांची मनोरचना भक्तिप्रवण व संन्यासतत्पर झाली होती. त्याच्यांत राजकीय व राष्ट्रीय विचाराचा प्रसार करण्यास त्यांना ज्या भक्तियंत्राची व संन्यासयंत्राची संवय झाली होती तींच यंत्रें समर्थांनीं अंगिकारिलीं, आणि आपल्या प्रवृत्तिपर रामभक्तियंत्राची निर्मिति केली. पांचशें वर्षें जी भक्ति निवृत्तिपर होती ती समर्थांनीं आपल्या हयातींत प्रवृत्तिपर केली. ह्या प्रवृत्तिपर भक्तीचें फळ राजकीय स्वातंत्र्य होय. "

इतर भक्तिमार्गीय संप्रदाय आणि रामदासी सांप्रदाय यांतील भेद लक्षांत येण्यासाठीं रा. भावे यांच्या महराष्ट्रसारस्वतांतून एक उतारा घेतों:— रामदासांनीं पुरश्चरण करून श्रीरामचंद्राचा अनुग्रह प्राप्त करून घेतल्यानंतर " सर्व देशभर तीर्थयात्रा करीत हिंडून देशाची एकंदर स्थिति यानें नीट निरखून पहाण्याचा विचार केला; व त्याप्रमाणें तो पर्यटणास निघाला ". " मुसलमानी अमलाखालीं सर्व लोक चुरडून गेले होते; देशांत दैन्य पसरलें होतें. जिकडे तिकडे वरवंटा फिरत होता. देशाची ही कंगाल स्थिति पाहून त्यानें श्रीरामाची करुणा भाकिली. " ( पान २०३-२०४ )

## हा श्रीराम कोण ?

तुळसीदास कबीर इत्यादि साधु रामाचेच भक्त होते; पण त्यांच्या

रामाचा स्वीकार रामदासांनीं केला नाहीं. त्यांना कांहीं कारणास्तव रामाच्या विशिष्ट स्वरूपाचा अवलंब करावासा वाटला ह्मणून रामभक्तीचे इतर पंथ विद्यमान असतां हि त्यांनीं आपला नवीन रामदासी संप्रदाय स्थापन केला. इतर भक्तिसांप्रदायांत 'बाबांनों, हें सर्व मिथ्या आहे...दारिद्य जितकें येईल तितकें चांगलें...शहाण्यांनीं संसाराची होळीच करावी बायकापोरें डोळ्यांदेखत तडफडून मेलीं तरी त्याचें दुःख लवमात्र मानूं नये··· सारा वेळ टाळ हातीं धरून तोंडानें ईश्वरनामाचा जप चालवावा' अशा प्रकारचा उपदेश होत असे. त्यायोगानें आध्यात्मिक उन्नति काय झाली असेल ती असेल, पण ऐहिक दृष्ट्या परिणाम काय झाला हें इतरांबरोबर रामदासांना हि दिसून आलें व ह्मणून एक प्रवृत्तिपर सांप्रदाय काढून महाराष्ट्राचा उद्धार करावा असें रामदासांनीं ठरविलें. हा उद्धार करण्याच्या कामीं दामाजीपंताची अब्रू बचावण्यासाठीं विठू महार बनलेला विठोबा, सखूबाईचें रूप घेऊन तिच्या पतीची सेवा करणारा विठोबा, सेना न्हाव्याचें रूप घेऊन त्याच्या धन्याची हजामत करणारा विठोबा, किंवा नामदेवासारख्या लाडक्या भक्तांचें वाटेल तें कोड पुरवणारा केवळ प्रेममूर्ति विठोबा, आपल्या कामास येईल असें न वाटल्यामुळें, कोदंडधारी, सशरचापपाणी, रावणाचा उच्छेद करणारा, चतुर्दश सहस्र राक्षसांचा संहार करून जनस्थाननिवासी जनांना सुखानें कालक्रमणा करतां येईल असा बंदोबस्त करणारा जो श्रीराम त्याचीच त्यांनीं कास धरिली. समर्थांचा राम हातांत नित्य धनुष्यबाण घेऊन भक्तांचें प्रत्यक्ष रक्षण करणारा आहे. शिवाय धैर्यें रणीं अचल जैसा । प्राणान्तीं पलायन नसे मानसा । शत्रुनिवर्तक रामा ऐसा । नाहीं क्षेत्री परम ॥ ४-११-३. उपासना + गींत उपास्य दैवत ठरविण्यांतच सगळें कसब असतें. काय वाटेल तें देणारा नारायण ध्रुवानें पकडला, चराचरांत माझें वास्तव्य आहे ही गोष्ट सभेंतील स्तंभांत च प्रकट होऊन दाखविणाऱ्या नारसिंहाचा प्रल्हादानें आश्रय धरिला, तसें नित्य पाठीशीं सशस्त्र उभा राहून रक्षणांत तत्पर रहाणाऱ्या श्रीरामाचे पाय समर्थ रामदासांनीं धरिले, यांत त्यांच्या योजनाकौशल्याचें कौतुक दिसून येतें. धनुर्धारी रामलक्ष्मण समर्थांचें नित्य रक्षण करीत अशी सांप्रदायिकांची श्रद्धा व तशा प्रकारच्या समर्थचरित्रांतील गोष्टी सुप्रसिद्ध च आहेत. समर्थप्रतापांत गिरिधर ह्मणतात. :—समर्थासि रक्षित दोनी धनुर्धारी । समागमें

---

१ महाराष्ट्रसारस्वत पान २०६.

गुप्त असती विपिनविहारी। कोठें न विसंबती येक क्षणभरी। आत्माराम समर्थस्वामी ॥ $\frac{3}{२५}$ ॥ आपल्या मेरूस्वामींनीहि तशा गोष्टी दिल्या आहेत. त्या निर्वाण, दशेमाझारी। आला समर्थांचा साह्यकारी। काळनिवर्तक निर्धारी। धनुर्धारी रघुवीर ॥$\frac{७}{१४४}$॥ विचरतां विरक्तीनें वनीं। स्वामी संरक्षणालागूनी। मनोहर कार्मुकपाणि। पुढें मागें तिष्ठती ॥ $\frac{३११}{३४}$॥ तात्पर्य शत्रूंना जेणेंकरून साक्षात्भय प्राप्त होऊन योग्य वचक बसेल असेंच दैवत समर्थांनीं शोधून काढिलें.

समर्थांच्या दैवताचें दुसरें लक्षण ह्मणजे लोकसंग्राहकत्व. समर्थांना विस्काळित झालेल्या जनसमूहाला संगृहित करून निष्काम प्रवृत्तिपर करावयाचें होतें, तेव्हां या हि विषयीं श्रीरामचंद्र च त्यांच्या विशेष उपयोगी पडण्यासारखे होते. उत्तम प्रकारच्या लोकहितैक दक्ष राज्याला उपमा रामराज्याची देण्याची जी वहिवाट भारतवर्षांत आढळून येते तीवरून श्रीरामाचें लोकसंग्राहकत्व उघड होण्यासारखें आहे. मेरुस्वामी सांगतात :– अवतारामाजि परम। पावनचरित्रें श्रीराम। लोकसंग्रहासि सत्कर्म। दीक्षेनें वर्तला ॥

याविषयीं अधिक प्रपंच करण्याची अवश्यकता च नाहीं.

याप्रमाणें रामदासी संप्रदाय काढण्यांत समर्थांची दृष्टि कोणती असावीसें वाटतें याचें थोडेसें यथामति दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. आतां विषयांतर सोडून प्रकृताकडे वळावयाचें.

द्वितीय रुद्रापासून पुढील ग्रंथ पूर्वी सांगितल्याप्रमाणें विविध विषयांच्या खिचडीचा बनलेला आहे. द्वितीय रुद्रांत मायेचें व अविद्येचें वर्णन करून सद्गुरूच्या प्रसादानें त्यांतून सुटका कशी होते हें सांगितलें आहे. हें सांगतांना भोंदूगुरूंविषयीं सावध रहाण्याविषयीं जो इशारा दिला आहे तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. असले गुरु प्रशंसिती निजयोग्यता. त्यांची तत्वचिंता ग्रंथीं राहिली आणि प्रत्यक्ष पहावें तों फारतर छळवाद वाक्पटुता यांशिवाय त्यांच्याजवळ कांहींच नसतें. पण परम उदार सनातन। चक्रवर्ती गुरु आपुलें चि स्वरूप दान करी आणि स्थापूनि स्वरूप सिंहासनीं। सबाह्य सर्वे चि विद्यमानीं। दीक्षा संरक्षण निदानी। परिपाळितसे ॥ $\frac{२}{१६}$. आणि एवढें करून हि स्वराज्य दिल्ह्याचा कांहीं। फुंज तयाचे हृदयीं नाहीं ॥ एतद्विषयक विवेचन

करतांना मेरुस्वामींनीं उपमेवर उपमा व रूपकावर रूपक यांची रेलचेल केली आहे. मेरुस्वामींचें आपल्या गुरूवर ह्मणजे अनंत मौनीवर फारच प्रेम असावें असें दिसतें. एकशें एकवीस उल्लासांपैकीं असा एक हि उल्लास नाहीं कीं ज्यांत त्यांनीं आपल्या अनंतमौनी बद्दल अत्यन्त आदराचे शब्द काढले नाहींत. आपल्या ग्रंथालाच ते मुळीं सद्गुरुकृपेचा जिव्हाळा ह्मणजे ह्मरा ह्मणत आहेत. पण त्यांतलें त्यांत प्रथम रुद्राच्या ४ थ्या व अकराव्या उल्लासांत, द्वितीय रुद्राच्या तिसऱ्या सातव्या व अकराव्या उल्लासांत, तृतीय रुद्राच्या पहिल्या, व नवव्या उल्लासांत, नवमरुद्राच्या पहिल्या उल्लासांत इत्यादि ठिकाणीं त्यांनीं हा आदर फारच सुंदर रीतीनें दाखविला आहे.

## अनंत मौनीचें चरित्र

मेरुस्वामींनीं जे हे आपल्या गुरूविषयीं सप्रेम व सादर उल्लेख केले आहेत, त्यांवरून अनंत मौनीचें जें चरित्र आपणास समजण्यासारखें आहे, तें त्यांच्याच शब्दांत येथें जुळविण्याचा प्रयत्न करूं. अनंत आत्रिगोत्र संपन्न वेद पाठक, वक्ता वेदान्त शास्त्रांचा, षडदर्शनें रूढली वाचा। व्याकर्ण सिद्ध प्रत्ययाचा। प्रबोध चाले॥ $२\frac{३}{४३}$. श्रोता वक्ता स्वयेंचि प्रसिद्ध। बोध बृहस्पती परी शुद्ध। सभासदांमध्यें॥ ४४ भव्यरूप प्रसन्नवदन। आजानुबाहो आरक्तनयन। कंबुग्रीवा वक्षस्थळ विशाळ। स्वसुखाचें दोंद वर्तुळ। आटीव सर्वांग सुनीळ। कुळकुळीत तेजें॥ ५०. या अनंताचें उपनाम मौनी असें होतें, म्हणून त्यांना अनंत मौनी असें ह्मणतात. ते हि (घनानन्दशक्ति) अनंतदर्शनीं। तटस्थ जाली व्याख्या मौनी। मौनी अनंत या लागूनि। उपनामें बोधिजे॥ $२\frac{१}{२०}$. अनंत मौनी अरुणाचल येथील रहाणारे होत. जेथें स्वरूप प्राप्ति निवळ तो चित्कल्लोळ अरुणाचळ। तयें स्थळीचा निवासी। सद्गुरु अनंत निश्चयेंसी। जोडला जिवलग आह्मासी पूर्व सुकृतयोगें। $९\frac{१}{४१}$. मेरुस्वामींनीं अनंत मौनीच्या पत्नीचाहि उल्लेख केला आहे. ते ह्मणतात, सद्गुरु अनंताची पत्नी। परम स्नेहाळ ते माझी जननी॥ हिच्या मध्यस्थीमुळें च मेरुस्वामीला मंत्रोपदेश मिळाला. मेरुस्वामी ह्मणतात, मजकारणें स्वामीसी प्रार्थूनि। महावाक्य सांगविलें श्रवणीं। परम प्रीतीनें अंतःकरणीं। अर्थ प्राजळ केला॥ ४६. ह्मणून या माऊलीनें परमार्थरूप मजलागूनि संभविलें

असें मेरूस्वामी सांगतात. अनंत मौनी आजानुबाहु व विशाळ हृदय असून त्यांची भ्रूलता विशाळ आणि नासापुटी सरळ व सुरेख होती. त्यांनीं दक्षिण द्वारकेंत ऊर्फ मन्यारगुडी येथें केली दक्षिण अयोध्या शाश्वत । निर्मूनि देवालय अद्भुत । राम वसविला ॥ ६५ त्यांच्या योग्यते संबंधानें मेरुस्वामी ह्मणतात, महंतामाजी महामहंत । महा विख्यात मौनी अनंत । समर्थ प्रतीतीनें अखंडित । समर्थचि रूढला॥ २ $\frac{३}{२०}$.

अनंत मौनींना समर्थांचा प्रत्यक्ष अनुग्रह झाला होता; व समर्थांना प्रत्यक्ष श्रीरामाचा अनुग्रह होता. श्रीरामें समर्थ पावन । समर्थें पावन बहुजन । समर्थें आर्जविला श्रीराम । परंपरेसी बोधकल्पद्रुम । अनुभवूनि निजविश्राम । अनंत अनुग्रहिला ॥ १ $\frac{११}{३४}$. अनंत प्रसंगानें वरुषला आनंदघन । उपेगासि आला संपूर्ण । तो अनंत मौनी सुप्रसन्न । जाला मज ॥२ $\frac{४}{४०}$. याप्रमाणें " श्रीराम गुरु परात्पर । परम गुरु समर्थ साचार । अनंत सद्गुरु उद्धार-। कर्ता हाये माझा " अशी परंपरा मेरुस्वामी सांगतात. आपल्याला गुरूपासून कसें कसें ज्ञान प्राप्त झालें हे मेरुस्वामींनीं अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. ते ह्मणतात तूं अनादिसिद्ध स्वभावता । कृपेनें वोळलासि अनंता । हात मस्तकीं ठेवूनि तत्वता । अनुग्रहिलें॥ १ $\frac{४}{३५}$. रामदासी संप्रदायाचा प्रसार करण्यांत अनंत मौनींनीं कोणत्या प्रकारची कामगिरी केली तें सांगतांना मेरुस्वामींनीं त्यांना भूलोकीं स्वर्गींची गंगा आणणाऱ्या भगीरथाची उपमा दिली आहे. राम परात्पर जीवन । समर्थत्रिविक्रमें योगें पूर्ण । प्रगटलें तें सुख घन । आणिलें अनंत भगीरथें॥ २ $\frac{३}{७१}$. स्वतः आपल्यासंबंधानें गुरूनें काय केलें हें मेरुस्वामींनीं तृतीय रुद्रांत सांगितलें आहे. त्यांत मेरुस्वामींच्या नांवावर कोटी करून त्यांना गुरूनें स्वानुभव मेरु व्हावयास सांगितलें तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मेरूप्रमाणेंच मौनी शब्दावरहि मेरुस्वामींनीं कोटी केली आहे. मौनी या आडनांवासंबंधाची कोटी पूर्वी आलीच आहे. इतर प्रकारच्या कोट्या आशा:-मौनी स्वामीनें कृपेनें प्रमाणाचें प्रमाण उडालें । मौनासी मौन पडिलें । ३ $\frac{४}{२८}$ तसेंच, महामौनीचें मौन ग्रासुनी । निवांत राहिला अनंत मौनी ॥ २ $\frac{१}{१}$. असो. समर्थांच्या दासबोधाचा उल्लेख

जसा मेरुस्वामींनीं अनेकवार केला आहे तसा अनंत मौनीच्या ग्रंथांविषयीं रामसोहळ्यांत तरी कोठें केलेला नाहीं. त्यांची कामगिरी त्यांनीं मोघम शब्दांनींच वर्णिली आहे. त्याचें तात्पर्य असें कीं, **कल्पकोटी रामभजन । चालावें परंपरेसी संपूर्ण । श्रीरामासि मागोनि वरदान । आपुला केला सुखें ॥** व एवढें केल्यावर **होऊनियां क्षेत्रसंन्यासी । अनंतें श्रीरामीं केली मिरासी । स्वस्वरूप सिद्ध विश्रांतीसि । वसविला वास्तव्य मठ ॥** आणि शेवटीं शके १६१५ ह्मणजे **श्रीमुख नाम संवत्सर । भाद्रपदवदि नौमी**

---

१ समर्थांचें चरित्र मेरुस्वामींनीं वर्णिल्याप्रमाणें पूर्वीं थोडक्यांत दिलेंच आहे. समर्थांविषयीं व त्यांच्या दासबोधाविषयीं या शिवाय स्वतंत्र उल्लेख हि त्यांनीं अनेक ठिकाणीं प्रस्तुत ग्रंथांत केलें आहेत. त्यांपैकीं कांहीं येथें देतों :- समर्थनामोंचि विश्वोद्धार इ० १$\frac{६}{२-२७}$. कृतत्रेतद्वापारी । जाले अद्भुत अवतारी । परि या समर्थांची सरी । कोणी न पावे १$\frac{६}{१०८}$. समर्थ वचनें चित्त चमत्कारे इ०। असतां समर्थ सहवासीं । भाग्यासी काय उणें इ० १$\frac{११}{६६-८७}$. प्रमाणप्रतीतीची द्वारें...मिळालीं समर्थांच चमत्कारें । जें विसरिता सागरीं ॥ उपदेश बोधपद्धती । विमळ समर्थांची ॥ २$\frac{३}{१०}$. **काशीपासोनी रामेश्वर । समर्थ सांप्रदाय अपार । बोधप्रसिद्धी थोर थोर । प्रस्थानें रूढली** ॥ २$\frac{३}{१७}$. समर्थ असिपद इ० । हे अनुक्रम समर्थांची अभेद भक्ति श्रीरामाची। इ० ३$\frac{३}{३२,३३}$.योगीराज समर्थ विभूति। महाअस्तिक्यतेनें। विचरत । ३$\frac{११}{२२}$. योगिराज विभूषण । समर्थ विभूति स्वयें । धर्मरहित समर्थस्वामीअगोचर दीक्षा परम । श्रीसमर्थ आत्माराम । इ० साधुसिद्ध दीक्षाचूडारत्न । पवि ज्ञानियाचें मंडण । समर्थ गुरुवर्य विभूषण । ज्ञानसूर्य वर्चसें ॥ ३$\frac{११}{३३}$. समर्थ निर्वाण तनुलीला। इ० ३$\frac{११}{४०}$.ते रामप्रसादमेखला...शोभली समर्थांचे गळां। इ०. या शिवाय बहुतेक उल्लासांचे आरंभीं समर्थांच्या नांवाचा उल्लेख असून त्यांच्या कोणत्या न कोणत्या तरी गुणांचा निर्देश केलेला आहे. विस्तारभयास्तव तो येथें उतरून घेत नाहीं. **दासबोधाविषयींचे उल्लेख** :-परमार्थरूप ग्रंथ केला । जो कल्पकोटी जाला। उपेगासी ॥ श्रकण करिता दासबोध। तात्काळ उपतिष्ठे प्रबोध । तुटे संसार बंध । मननमात्रें ॥ अपार श्रवणीं फळ श्रुति । तात्काळ प्रगटे विरक्ति । दासबोध अर्थ प्रतीति । भवरोग जाय ॥ दासबोधीं समर्थनिवास। ग्रंथी वरदान निजध्यास । निज ध्यासोंचि प्रत्ययास। येत ग्रंथस्वरूपें ॥ १$\frac{१०}{१३-१६}$. समर्थबोध सूर्य साचार इ० १$\frac{११}{८१}$.समर्थांसि श्रीराम भेटी । परस्परे जाहल्या गोष्टी । दासबोध प्रसिद्धि सृष्टी । विमळज्ञान । २$\frac{३}{११}$. समर्थवचनें दासबोध। दाशरथीराम गुरुप्रसिद्ध । वाक्य घेऊनिया समर्थे शूद्ध बुद्ध । स्वरूपें अनुग्रहिले ३$\frac{३}{२७}$. २ अनंत सद्गुरुबोध प्रसिद्ध । २$\frac{३}{७३}$ इत्यादि उल्लेख त्यांच्यां ग्रंथाविषयीं च असेल काय ? असला तरी मोघम च आहे.

स्थिरवार । या दिवशीं अनंत सद्गुरूनें अवतार पूर्ण केला ( १ १/६८ ), आणि मेरुस्वामींना मठाचें आधिपत्य दिलें. सद्गुरु अनंतें करूनि अधिष्ठान । दिली मिरासी मज संपूर्ण । स्वरूप ऐश्वर्येंनसी ॥ ७०. या प्रमाणें गुरूचें वर्णन करून आणि समर्थ तोचि अनंत मौनी । परम गुरुस्थानीं । असें ह्मणून मेरुस्वामी ( मेरू ) दंडवत लोटांगणीं । सद्भावें चरणीं रुळतसे । १ ११/७५

ग्रंथाचा सारांश सांगतां सांगतां मेरुस्वामींचे गुरु, परम गुरु व परात्पर गुरु यांविषयीं जी माहिती ओघानें पुढें आली ती वर लिहिल्याप्रमाणें थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न केला. आतां ग्रंथाचें स्वरूप पुढें पहात जाऊं. तिसऱ्या रुद्रापर्यंतचा उल्लेख मागें आलाच आहे. चवथ्या रुद्रांत वेदान्तशास्त्रदृष्ट्या साधनचतुष्टयाचा विचार केला असून श्रुति, स्मृति इत्यादिकांचीं प्रमाणें घेऊन चार वर्ण व चार आश्रम यांच्या कर्तव्याचें निरूपण केलें आहे. त्याचें स्वरूप सर्व साधारण असल्यामुळें येथें त्याचा विशेष प्रपंच करण्याची गरज नाहीं. कांहीं नमुनाच पहावयाचा असेल तर पहा. ब्राह्मणाचीं यजनयाजनादि षट्कर्में, दुर्वासनात्याग, नित्यानित्यविचार, शमदमादि स्वाभाविक कर्में इत्यादिकांचा विचार करून ब्रह्मचर्य व गृहस्थाश्रम यांचें वर्णन करून व या विशंतीं कर्मीं गृहस्थ । संसारी च होय कृतार्थ ॥ असें सांगून पुढें वानप्रस्थाचें विवेचन केलें, व शेवटीं भगवद्भक्तीनें अतिविरक्त । शांतिसद्बुद्धीनें कृतार्थ । व्हावयासि जीवन्मुक्त । संन्यास घ्यावा ॥ असें मेरु स्वामींनीं ह्मटलें आहे ( ४ १०/२४ ). पण स्वरूप अनुभव स्वयें । हाचि मुख्य संन्यास होय । आत्मानुभवेंवीण[1] पाहें । काया विटंबना ॥ ४५ ॥ ही त्यांची सूचना हि विसरतां कामा नये.

द्वितीय वर्ण जो क्षत्रिय त्या संबंधानें देवब्राह्मण समुदाय प्रतिष्ठा कर्ता जो श्रीराम त्याचेंच ध्येय वाचकांपुढें मेरुस्वामीनीं मांडिलें आहे. त्यांत प्रजापाळण, लोकसंग्रहण इत्यादिकांचा अन्तर्भाव होतोच. राजधर्म सांगतांना विश्वीं दृष्टान्तासी परम । रामराज्य बोलिजे । असें ह्मणून त्या रामराज्याचें वर्णन केलें आहे व सकळांचें हृदय घेऊनि । समग्र चित्ताचि

---

१ आत्माअनुभवी चोखाळल्या वाटा । त्याचे माथां जटा असो नसो ॥

तुकाराम

होऊनि । विश्वपरिपालन मनीं । वाहे तो नृप चक्रवर्ती ॥ (४$\frac{१०}{३७}$) असें लोकहृदयानुवर्तित्व हें साम्राज्यप्रभूचें लक्षण दिलें आहे. Self-determination ऊर्फ स्वसंमतीचा यांत समावेश होतो हें सांगावयास नको च; कारण त्यांत केवळ सकळांचें बाह्य मत न ह्मणतां हृदय घ्यावें असेंच ह्मटलें आहे. तसेंच स्वराष्ट्रीं अन्याय वर्तो न ये । शोध न करितां दोष प्रभूसि ये । ही बजावणी देखील राजकर्त्यांना उपयोगी पडण्यासारखी आहे. या नंतर वैश्य व शूद्र याचें कर्तव्य सांगितलें आहे, त्यांत गोरज्य विक्रय करी । नाना व्यवसाय व्यवहारी । द्रव्याढ्य होऊनि नानापरी । धर्म करी विनयें । हें लक्षण दानशूर वैश्यांनां कसें उत्तम लागू पडतें हें आजहि मुंबापुरस्थ अनेक सद्वैश्यांच्या उदाहरणावरून दिसून येईल.

वर्णसंकर आणि कर्तव्यसंकर याविषयीं मेरुस्वामीचें मत परंपरेला अनुरूप असेंच आहे. कुलघ्न वर्णत्रयसंकर । पावे नरकद्वार ॥ तसेंच जो जयाचा वर्णाश्रम । तेणें तो वर्तावा स्वधर्म । अन्यवर्णाश्रमकर्म । दुःखासि होय कारण ॥ ४$\frac{११}{५६}$ असें ते ह्मणतात.

चवथ्या रुद्रांत ज्या साधनचतुष्टयादि गोष्टींचा उल्लेख आला आहे, त्याचें अधिक विवेचन करण्यासाठीं पुढील दोन तीन रुद्र प्रकटले आहेत. इहामुत्रफलभोगविराग, सदसद्वस्तुविवेक, शमादिषट्क, मुमुक्षत्व इत्यादि वेदान्तशास्त्रांतील विषयांचें श्रीमच्छंकराचार्यादि वेदान्तसूर्यांच्या किरणांच्या आधारानें या रुद्रांत जें विवेचन झालें आहे, त्याच्यासंबंधानें येथें चर्चा करावयास नको. हें विवेचन व्याख्यानाचे धर्तीवर झालेलें आहे व त्यांत प्रमाण ह्मणून संस्कृत श्लोकहि अनेक ठिकाणीं दिलेले आहेत. या विषयांशिवाय पुढें ज्ञान, उपासना, कर्म या विषयांचा उहापोह करून राम उपासनेवर विशेष भर दिला आहे. सातव्या रुद्रांत राम तत्व प्रकट करतांना परमेश्वराच्या नाना अवतारांतील अनेकविध मनोरम प्रसंगाचा उल्लेख करून रामाला आळविलें आहे, व प्रसंगानें अठरा पुराणांचीं नांवें, चौदा विद्यांचीं नांवें, पुराणांतील अनेक कथासंदर्भ, इत्यादिक विषय आणिले आहेत. आठव्यांत अविकृत ब्रह्मस्वरूपापासून आदिस्फुरणद्वारा द्वैत उद्भवून पंचीकरण मार्गानें सृष्टीची उत्पत्ति, मूळ जीवाशिवाचें ऐक्य, पिंडब्रह्मांडांचें ऐक्य वगैरे सिद्ध करण्यासाठीं पिंडाच्या ह्मणजे शरीराच्या उत्पत्तीचा व वाढीचा प्रकार, प्रलय इत्यादि विष-

यांचें वेदान्ताच्या नित्य परिपाठानुसार वर्णन आलें आहे. जगदुत्पत्ति, भूगोल-रचना, मनुष्यशरीरोत्पत्ति इत्यादि विषयांसंबंधानें जुन्या कल्पना काय आहेत त्या येथें पहावयास मिळतील. त्यांत संस्कृतांतील, भागवत, पद्म, इत्यादि पुराणें, तसेंच गर्भोपनिषद् वगैरे ग्रंथांतील वचनांच्या आधारें विवेचन आलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर असें ह्मणतां येईल कीं रामसोहळा ग्रंथ मनन पूर्वक नीट वाचल्यास जुन्या चालीचा, भाविक, पण अष्टपैलू व बहुश्रुत असा गृहस्थ कसा असतो तें नीट दिसून येईल. असो.

नवव्या रुद्रांत मेरुस्वामींनी आपल्या तीर्थयात्रांचें प्रथम वर्णन करून नंतर नवविधा भक्तीचा सोदाहरण उहापोह केला आहे. मेरुस्वामींचें लिहिणें नेहमीं च रूपकात्मक असल्यामुळें हें तीर्थयात्रांचें वर्णन हि जरा अवजड झाल्यासारखें वाटतें.

## मेरुस्वामींचें चरित्र

या तीर्थयात्रा वर्णनांतील उल्लेखांच्या आधारें अनंत मौनी संबंधानें मिळणारी माहिती पूर्वीं दिली च आहे. येथें मेरुस्वामी आपल्या स्वतःसंबंधानें काय सांगतात तें पाहूं. मेरुस्वामींची जन्मभूमि कृष्णातीरीं मेरुलिंग नांवाच्या तीर्थ-स्थानीं होती. तेथून दैविकगतीनें ते फिरत फिरत व तीर्थें करीत दक्षिणमानस ह्मणजे पंपासरोवर व तेथून पुढें मूळबागळ येथें आले. तेथून नीलगिरीजवळ अरुणाचल गावीं आल्यावर त्यांची व अनंत मौनीची गांठ पडली. तेथें मौनीस्वामींनीं त्यांस आपल्याजवळ ठेवून घेतलें आणि क्रमशः सांप्रदायाचा मार्ग दाखवून चांगला बोध केला. या कामीं अनंत मौनींच्या पत्नीनें हि अत्यंत चांगली कामगिरी केली असा फार कृतज्ञतापूर्वक उल्लेख मेरुस्वामींनीं केला आहे. ते ह्मणतात, **तिचे मातेचा कृतोपकार । मी उत्तीर्ण नव्हेचि पामर ॥** आणखी **सार्थक माझें जालें** ह्मणून **तियेसि गुरुत्वें चिन्त्या वंदिलें ॥** या प्रमाणें अनंत मौनींचा व मेरुस्वामींचा संबंध जडल्यावर पुढें मेरुस्वामी तीर्थयात्रा करीत दक्षिण द्वारकेस आले. अनंत मौनी हि शिष्याच्या मागोमाग तेथें आले व तेथें मठ स्थापून राहिले. हा दक्षिण द्वारकेचा ऊर्फ मन्यारगुडीचा मठ समर्थांचे हयातींत कीं मागाहून स्थापन झाला हें समजत नाहीं. पण बहुधा तो मागाहून च असावा असा तर्क धांवतो. या ठिकाणीं मेरुस्वामी गुरुपाशीं कांहीं काल राहिल्यावर शके १६१५ त गुरूंनीं अवतार समाप्त केल्यामुळें मन्यारगुडीच्या मठाचें आधि-

पत्य मेरुस्वामीकडे आलें. मेरु स्वामींनीं हिंदुस्थानांतील बहुतेक मुख्य मुख्य तीर्थांचें दर्शन घेतलें. त्यांचे गुरु अनंत मौनी चांगले वेदशास्त्रसंपन्न होते. तसे च स्वतः मेरुस्वामी हि होते असें त्यांच्या ग्रंथांवरून दिसतें.[1]

असो या तीर्थ यात्रांच्या व नवविधा भक्तींच्या वर्णनांत हि अनेक विषय मेरुस्वामींनीं आणिले असून शरयू आख्यान व राम कृपा वन दर्शन या प्रकरणांतील वर्णनें चांगल्या प्रकारचीं उतरलीं आहेत; तशींच पुढें राम-जन्मोत्सवांतील कीर्तनांचीं वर्णनें हि मजेदार आहेत. या रुद्राच्या शेवटीं राम-दासी संप्रदायाची स्थापना व प्रसार या संबंधाच्या दोन महत्वाच्या ओव्या आहेत त्या अशाः-- **समर्थें प्रार्थूनि श्री रामासी । आणिलें उत्तर चाफ-ळासि । अनंतें प्रसन्न करूनि समर्थासि । राघव दक्षिण चाफळा आणिला ॥** दक्षिण चाफळ ह्मणजे दक्षिण द्वारका ऊर्फ मन्यारगुडीच असावी. येथें अनंत मौनींनीं श्रीरामाचें देवालय बांधल्यांचा उल्लेख मागें आलाच आहे. यालाच अनुलक्षून **दक्षिण चांफळीं श्रीराम वस्ती । अनंत समर्थ तेथ असती** असें मेरुस्वामींनीं ह्मटलें आहे.

दहाव्या व अकराव्या रुद्रांत पुनः वेन्दातांतील काहीं प्रश्नांचा खल केला आहे. कर्मसंन्यासयोग या प्रकरणांतील कांहीं सिद्धान्त पहाः— **स्वभावीं निज उमजलें । तें कर्मचि निष्कर्म जालें । कर्म न करितां राहिलें । तें अकर्म नव्हे च कीं ॥ कोणी ह्मणती कर्म करितां ठेले । ते चि ते अकर्म जालें । परि तें अकर्म नव्हे, आणिलें । प्रत्यवायासि तेणें॥ तसेंच आणखी, सत्कर्म आचरणीं फलत्याग । तो चि संन्यास कर्मयोग । कर्म न करितां कर्मत्याग । पापात्मक तम होय ॥** १०४२. हें सर्व विवेचन मेरुस्वामींनीं श्रीमद्भगवद्गीतेच्या आधारानें केलें आहे. यानंतर वेदान्ताला सहायभूत असलेल्या अभाव, अनुमान, लक्षण इत्यादि पारि-भाषिक संज्ञाचें विवेचन करून पुढें जीवन्मुक्तिविवेक, योगवासिष्ठ इत्यादिक ग्रंथांच्या आधारानें सप्तभूमिका, जीवन्मुक्त, समाधि इत्यादि विषयांचें संक्षिप्त उद्घाटन केलें आहे.

---

१ मेरुस्वामींनीं भीमोपदेश, आत्मसाक्षात्कार, भगवद्गीता, स्वानंदलहरी मानसपूजा, अनुभवसार, मेरुबोध, तत्त्वपट, पूर्णामृत षोडशकळा, रामसोहळा, समर्थाष्टक, श्रीरामपंचरत्न आणि संतमाला, असे ग्रंथ लिहिलेले आहेत. भीमोप-देश हा रामसोहळ्याप्रमाणें च मोठा ग्रंथ असून त्याचे बारा सूर्य व प्रत्येक सूर्याचे १२ किरण असे १४४ भाग आहेत. या ग्रंथाशिवाय कांहीं स्फुट कविता ह्मणजे पदें वगैर सुद्धां त्यांनीं रचिलेलीं आहेत.

अकराव्यांत वेदान्त विषयांतील उरलेल्या भागाचें विवरण झाल्यावर नवव्या उल्लासांत सर्व ग्रंथाचा उपसंहार करून पुढें दहाव्यांत त्यांतील विषयांची साद्यंत अनुक्रमणिका दिली आहे. रामसोहळ्यांत असे अनुक्रमणिकेचे किंवा उपक्रमोपसंहाराचे पुष्कळ प्रसंग आले आहेत. उदाहरणार्थ प्रथमरुद्र अकरावा उल्लास ( १०१, १०२ ) द्वितीयरुद्र अकरावा उल्लास, तृतीयरुद्र अकरावा उल्लास, सप्तमरुद्र अकरावा उल्लास, एकादशरुद्र दहावा व अकरावा उल्लास पहा. ग्रंथांतील मजकुराचा अशा रीतीनें ठिकठिकाणीं आढावा घेतलेला असल्यामुळें एवढ्या समुद्रांत बुचकळ्या मारण्याची थोडीशी तरी सोय झाली आहे.

या प्रमाणें **सद्गुरुकृपेचा जिव्हाळा** असा जो **रामसोहळा ग्रंथ** गहन त्याचें स्वरूप आहे. त्यांतिल **ग्रंथार्थास निजानुसंधानें अर्थ होऊनि** द्यावें अशी वाचकांस विनंति आहे.

मेरुस्वामींचें संस्कृत ग्रंथाचें अध्ययन बरेंच असलें पाहिजे हें वर सांगितलें च आहे. त्याच प्रमाणें ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, ( दासबोधासंबंधानें सांगावयाचें कारण च नाहीं ) इत्यादि प्रासादिक मराठी ग्रंथांशीं देखील त्यांचा परिचय असावा असें अगदीं उघड दिसतें. येकाकी न रमते। हें ज्ञानाचें हृदय वांछितें। कां जें श्रवण शब्दासी आइतें। जीवन होय ( $१\frac{९}{८२}$ ) तशीच, निजनिवेक संवगणी। केला प्रमाणासि टाकूनि। अर्थान्वय कडसणी। प्रतीति खळा आणिले। ( $६\frac{८}{४४}$ ) इत्यादि स्थळांचा विचार करतां ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस येईल. या शिवाय विषयाशीं तादात्म्य पावून दृष्टान्ताच्या मालिकेनें तो विशद करण्याची जी हतोटी ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्या उपरिनिर्दिष्ट ग्रंथांत दृष्टीस पडते तशीच येथें हि पडते. फरक एवढाच कीं मेरुस्वामीच्या लिहिण्यांत पुष्कळ ठिकाणीं अलंकारिक गूढपणा असल्यामुळें एकनाथी भागवताप्रमाणें त्यांतिल मजकूर पटापटा लक्षांत येत नाहीं. कांहीं अप्रसिद्ध शब्द मेरुस्वामींनीं योजिल्यामुळें हि या प्रकारांत थोडी भर पडली आहे. उदाहरणार्थ–पावनी आर्जमात ( $१\frac{९}{५०—५४}$ ), पाहळी, कंकाळी, पैसविहीन ( $२\frac{९}{११\ १२}$ ), कातराचि काचे इ० ( $२\frac{९}{३१}$ ), उदरात कर्पूरगौर ( $२\frac{३}{२६}$ ), वांकडी ( $२\frac{—}{२७}$ ), घायडायाचा निजहात ( $२\frac{९}{८३}$ ), उरवा ( $४\frac{५}{३}$ ,) निघाली सुमनाची हति ( $५\frac{१७}{४१}$ ), शरीराची वयसा प्रमाणी नुरे ( $५\frac{११}{३१}$ ), अवकाश सुखाड समाजे ( $६\frac{४}{३१}$ ) इत्यादि शब्द व स्थलें पाहिलीं असतां

आमच्या म्हणण्याची साक्ष पटेल. पण हा दोष ग्रंथकाराचा नसून आमचा आहे हें कबूल केलें पाहिजे. कारण या ग्रंथाची अशी मौज आहे कीं अर्थ नीट न समजला तरी वाचक प्रवाहांत पडल्याप्रमाणें मजकूर सारखा ह्माचीत जातो. ज्ञानेश्वरीसंबंधानें हि असाच अनुभव पूर्वी आह्माला आलेला आहे. मेरुस्वामीचें भाषाप्रभुत्व व वर्णनप्रभुत्व हि चांगलें आहे. योग्य ठिकाणीं योग्य शब्दयोजना त्यानीं केलेली आहे व त्यामुळेंच कित्येक ठिकाणीं आज अपरिचित वाटणारे शब्द त्यांनीं योजलेले दिसतात. एकाच कल्पनेने नाना ढंग दाखविण्यासाठीं विविध शब्दांचा उपयोग करण्यांत भाषाप्रभुत्व चांगलें दिसून येतें. एक च उदाहरण पहा. द्वितीय रुद्रांत मायेचें वर्णन करतांना तिच्या स्वभावा संबंधानें मेरु स्वामी लिहितात–**भारी उपचारी सावरी । अंतरी विहारी सारी तारी । सितरीं हारी मारी वारी । भरी भरणें ॥ जडवी कढवी घडवी । चढवी, पडवी, रडवी । दुडवी अडवी बुडवी । नानाविध॥** $\frac{१}{५३}$ तसें च अनंतमौनीची थोरवी वर्णितांना ते ह्मणतात, **उडुगणामध्यें कलाराशी । अनंत समर्थपरंपरेसी । तत्वामाजी हृषिकेशी । तत्वप्रकाश ॥ ग्रहचक्रांत जैसा तरणी । देवां माझी देवाग्रणी । सिद्धामध्यें महामुनि । कपिल जैसा ॥ भूधरांमाजि सुरालय । विश्रांतिनिधि सदयहृदय । नरेन्द्रांत वरवैडूर्य । जैसा श्रीराम ॥ लक्ष्मीवंतांत लक्ष्मीवर । समुद्रांत सुधासागर । भूपणांत वर्चसे थोर । कौस्तुभ जैसा ॥ युक्तीमाजी वाचस्पति । बुद्धिमंतांत फणिपति । शुचिष्मंति विख्याती । वैश्वानर ॥ उदरांत कर्पूर गौर । नवरसांत शांत रस थोर । परंपरेसी साचार । चूडारत्न वर्चसें ॥** $२\frac{३}{२६}$ ॥

गुणां बरोबर आधुनिक चिकित्सकांना मेरुस्वामिंच्या ग्रंथांत दोष हि दिसतील. त्यांत अति शय पुनरुक्ति, विषयांची वाटेल तशी रचना त्यांत क्रमपरंपरा नसणें, इत्यादिकांची गणना करतां येण्यासारखी आहे. सहज वाचणारासहि अशीं स्थळें दिसून येतील.

कवि किंवा ग्रंथकार या नात्याचे हे गुणदोष होत. आतां

---

१ अशीं शेकडोंशें स्थळें व शब्द या रामसोहळ्यांत आहेत कीं त्यांचा अर्थ आह्माला लागला नाहीं. त्यांतील कांहीं टीपांत प्रश्नचिन्हांनीं दाखविलीं आहेत पण न दाखविलेलीं स्थळेच दाखविल्याच्या कितीतरी पट आहेत, हें येथें नमूद करणें अवश्य वाटतें. वाचकांनीं जसजसा खुलासा होईल तसतसा तो करून घ्यावा अशी विनंति आहे.

रामदासी मठाचे अधिपति व महंत या दृष्टीनें रामसोहळाकारांचे गुणदोष कांहीं दिसतात कीं काय हें पहावयाचें. समर्थांच्या परंपरेंतील ते असल्यामुळें संप्रदायाचें उपास्य दैवत श्रीराम, आद्य गुरु समर्थ, आणि स्वतःचे गुरु अनंतमौनी यांचें अत्यंत आदरपूर्वक व भाविकपणें वर्णन मेरुस्वामींनीं केलें हें योग्य च आहे. पण त्यानीं सांगितलेल्या समर्थांच्या चरित्रांत मात्र या दृष्टीनें मोठी उणीव राहून गेलेली दिसते. त्यांत समर्थांबरोबर शिवाजी महाराजांचा एक हि उल्लेख केलेला नाहीं, किंबहुना समर्थांनीं महाराष्ट्रधर्म, व आनंदवन-भूवन यांविषयीं जो एवढा आटोकाट व यशस्वी प्रयत्न केला त्याबद्दलहि मेरुस्वामींनीं अवाक्षर काढलेलें नाहीं. या समर्थांच्या चरित्रांत कित्येक भाविकपणाच्या व चिकित्सकांना न पटतील अशाच सर्व गोष्टी दिल्या असून महाराष्ट्राच्या दृष्टीनें जें समर्थांचें समर्थपण व इतर सांप्रदायांहूनचें विशिष्टत्व यांविषयीं कांहींच खुलासा नाहीं.

## समर्थांच्या पश्चात्

या ठिकाणीं समर्थसांप्रदाय आणि समर्थांनंतरची त्याची स्थिति यांविषयीं थोडेंसें मन मोकळें करण्याची वाचकांपाशीं अनुज्ञा मागतों. हिंदुस्थान आणि यूरोपखंड यांचे गेल्या दोन हजार वर्षांच्या इतिहासांत एका दृष्टीनें बरेंच साम्य दिसतें, राजकीय परिस्थिति व धार्मिक परिस्थिति या बाबतींत या दोन भूखंडांत ज्या क्रान्त्या झाल्या त्याचें ठोकळ मान पाहिलें असतां विशिष्ट कारणांपासून विशिष्ट कार्यें च कशीं घडून येतात हें समजतें. इसवी सनानंतर थोड्याच शतकांत हिंदुस्थानांत जसा मुख्यत: हिंदुधर्मच जिकडे तिकडे दिसून येतो, व इतर धर्म त्याच्या मानानें अगदींच गौण दिसतात, त्या प्रमाणें यूरोपांत हि त्या काळांत जुन्या धर्मांचें बहुतेक उच्चाटण होऊन खिस्ती धर्मानें सर्वत्र आपलें बिऱ्हाड मांडिलें होतें. ह्मणजे दोन्ही ठिकाणीं केवळ धर्मासाठींच ह्मणून होणाऱ्या तंट्याचें कारण नव्हतें. पण कांहीं शतकां नंतर दोन्ही ठिकाणीं नव्या जोमाच्या मुसुलमानी धर्माचा प्रवेश होऊन महत्त्वाकांक्षा व विस्तारबुद्धि या दोन कारणांमुळें युद्ध प्रसंग होऊं लागले. दोन्ही ठिकाणीं मुसुलमानी स्वाऱ्यापूर्वींची युद्धें बहुधा एकाच धर्माच्या पण भिन्न राजांच्या अमलाखालील लोकांत होत; व त्यांचा उद्देश साम्राट् पदवीची प्राप्ति हा च असे. मुसलमानी स्वाऱ्या सुरू झाल्यावर या हेतूंत फरक पडला. मुसलमान लोकांनीं युद्धें करून मुलूख मिळविले व धर्म-

प्रसारहि केला. हिंदुस्थानांत त्यांचा प्रवेश होऊन कायमचें ठाणें येथें त्यांनीं दिलें व त्यामुळें अगदीं अलीकडच्या काळा पर्यंत भांडणाचें हें तोंड तसेंच राहिलें. यूरोप खंडांतील स्पेन देशांतून पंधराव्या शतकाच्या शेवटीं मूर लोकांची हकाल पट्टी झाल्यावर यूरोपच्या मुख्य भागांत भांडणाचें सदर कारण राहिलें नाहीं. तुर्क लोकानीं कॉन्स्टॅटिनोपल घेऊन यूरोपांतील तुर्कस्तान म्हणून जो देश ठरविला त्यांत ते कायमचे रहिवाशी झाले, तथापि मुख्य यूरोपशीं त्यांचा तितका संबंध येत नसे. हिंदुस्थानांत मात्र त्यांचा प्रवेश सर्वत्र कोपऱ्यांत देखील झाला, व साधारण प्रयत्नांनीं त्यांचें येथून उच्चाटण होणें अशक्य झालें. हिंदुस्थान व यूरोप यांच्या एतद्विषयक स्थितींत १६ व्या शतकांत एवढा फरक पडला. यूरोपांतील ख्रिस्तीधर्म व हिंदुस्थानांतील हिंदुधर्म या दोहोमध्यें या काळीं कर्मठपणाची शिकस्त झाली होती; व त्या विरुद्ध विचारी लोकांचें मत बनत चाललें होतें. त्याला पुरेसा सुदृढपणा आल्यावर त्याचें मूर्त स्वरूप यूरोपमध्यें प्रॉटेस्टंटपंथरूपानें आणि इकडे भक्तिपंथरूपानें दिसूं लागलें. यूरोपांतील धर्म सुधारकांना केवळ जुन्या मताच्या लोकांशींच झगडावयाचें होतें; पण हिंदुस्थानांत या सुधारकांना जुन्या मता बरोबर मुसुलमानी धर्माशीं हि चार हात करावयाचे होते. यूरोपांत मार्टिन लूथरनें जी चळवळ केली ती त्याच्याच वेळीं अगदीं प्रथम सुरू झाली असें नाहीं. त्याच्यापूर्वीं ठिकठिकाणीं अल्पस्वल्प प्रमाणानें जुन्या मतावर हल्ले चढतच होते. या हल्ल्यांचें स्वरूप आमच्या भक्तिमार्गीय संतमंडळांच्या हल्ल्यांप्रमाणेंच होतें असें स्थूलदृष्ट्या म्हणावयास हरकत नाहीं. पण यापुढें मात्र दोन्ही ठिकाणच्या असल्या तंट्याच्या स्वरूपांत फरक पडला. हा फरक दोन्ही ठिकाणच्या लोकांचे जे मूल स्वभावविशेष आहेत त्यामुळेंच पडलेला आहे. यूरोपांत नव्या दमाच्या धर्मसुधारकांना पद्धतशीर तोंड देण्यासाठीं तेथील धर्माचार्यांच्या हातून संघटित स्वरूपाचे प्रयत्न झाले. इकडे तसें झालेलें दिसत नाहीं. नव्या मतावर हल्ला चढविण्यासाठीं त्यांतील नवीन शस्त्रास्त्रांचा उपयोग करण्याचा जुन्या मतांच्या लोकांकडून यूरोपांत योग्य तो प्रयत्न झाला. लोकांना सुशिक्षित करून जुन्या मताचें यथार्थ ज्ञान करून द्यावें व अशा रीतीनें आपलें बूड मजबूत करावें म्हणून ख्रिस्ती धर्माचार्य पोप यांच्या आश्रयाखालीं जेसुइस्ट नांवाचा एक पंथ तेथें स्थापन करण्यांत आला, व त्याच्या हातून तिकडे लोकशिक्षणाच्या व विशेषतः अध्यापनपद्धतीच्या कामांत महत्वाची कामगिरी हि झाली.

## जेसुइस्ट व रामदासी पंथ

यूरोपांतील जेसुइस्टपंथ व इकडील रामदासी पंथ यांच्यांत बरेंच साम्य दिसतें. पण दोघांच्या हेतूंमध्यें मात्र फरक होता. जेसुइस्ट पंथाच्या स्थापनेचा हेतु वर सांगितलाच आहे. विरोधी पक्षाला लोकशिक्षणद्वारा संघटित प्रयत्न करून तोंड देण्यासाठीं दोन्ही पंथ स्थापन झाले होते हें खरें, पण जेसुइस्ट पंथ जसा आपल्यांतीलच नव्या मताच्या लोकांना तोंड देण्यास प्रवृत्त झाला होता, तसा रामदासी पंथ नसून त्याला भिन्न धर्माच्या व भिन्न जातीच्या अशा राजकीय परिस्थितीशींच झगडावयाचें होतें.

## जेसुइस्टांची थोडी माहिती

जेसुइस्टपंथ इ. स. १५३४ सालीं इग्नेशियस लोयोला नावाच्या गृहस्थानें आणखी पांच जोडीदारांच्या साहाय्यानें स्थापन केला. **मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्रधर्म वाढवावा ।** हें जसें रामदासिपंथाचें ब्रीद होतें तसें ' आड माजोरम् डीइ ग्लोरियम् ' ह्मणजे **ईश्वराचा महिमा वाढवावा** हें जेसुइष्टाचें ब्रीदवाक्य होतें. पुढें स. १५४० सालीं तृतीयपाल नांवाच्या पोपाच्या अनुशासनानें या पंथाला सनदशीर स्वरूप मिळालें, व लोयोला हा त्याचा पहिला सेनापति झाला. जेसुइष्टां पूर्वीं यूरोपमध्यें नव्या धर्ममताला विरोधी असे भक्तिमार्गीय व संन्यास वृत्तीचे कांहीं पंथ निघालेले होते. पण त्या सर्वांपेक्षां या पंथाकडे च लोकांचें लक्ष अधिक वेधलें. रामदासी पंथाचें जें इतर पंथांहून विशिष्टत्व आहे, तशाच प्रकारचें विशिष्टत्व जेसुइस्टांचें यूरोपांतील इतर पंथाशीं होतें. इतर पंथ राजकीय भानगडींत पडत नसत, पण जेसुइस्टांच्या कार्यक्रमांत राजकीय कामाचा समावेश होता. केवळ ध्यान धारणा करावी व स्तोत्र पठण चालवावें, एवढेंच याचें काम असें कोणी समजत नसे. आपल्यामध्यें धार्मिक अहंकार दिसूं नये असा त्यांतील मंडळीचा कटाक्ष असे. राजकीय कार्य चाललें असतां सभ्यपणानें वागावें. विरोधी पक्षाशीं थोडी बहुत तडजोड करून त्यांतील माणसें आपल्याकडे वळवून घ्यावीं, उघड शत्रु असला तरी त्याच्याशीं प्रत्यक्ष तंटा करूं नये, व मनांत त्यांविषयीं उद्भवणाऱ्या विकारांचें कधीं हि प्रदर्शन करूं नये अशी या पंथांत शिकवण असे. सामाजिक प्रपंचाचा भार वाहण्याचें, आणि कोणत्याहि परिस्थितीशीं जुळतें घेऊन पाऊल पुढें टाकण्याचें धोरण या पंथाला त्याचा दुसरा सेनापति ओ लेनिझ त्याच्या पासून मिळालें. या पंथांत गृहस्थाश्रमी

आणि महंत अशा दोन्ही प्रकारचीं माणसें असत. आणि त्यांत पूर्ण प्रवेश होण्यापूर्वी सांप्रदायाला लागणाऱ्या गोष्टींत त्यांची चांगली परीक्षा व्हावी लागत असे. त्यांतील महंतांना निष्कांचन वृत्ति, पूर्ण ब्रह्मचर्य, सेनापतीशीं बिनशर्थ आज्ञाधारकपणा, इत्यादि व्रतें पाळावीं लागत. मूळांत तो पंथ धार्मिक असला तरी राजकीय कार्य त्याच्या कार्यक्रमाबाहेर नसल्या- मुळें किंबहुना प्रसंगविशेषीं धार्मिक कार्यापेक्षां राजकीय बाबतींतच त्यांनीं अधिक लक्ष घातल्यामुळें फ्रान्स, स्पेन, रशिया, हालंड या देशां- तून त्यांचें उच्चाटण हि अनेक वेळां झालें. तथापि अजून तो पंथ यूरोपांतील बहुतेक देशांत हयात असून त्यांत सुमारें १३।१४ हजार काम करणारीं माणसें आहेत. त्याचा मूळ कल्पक जो इग्नेशियस् डि लोयोला त्याचा जन्म सन १४९१ त झाला होता. ह्याचें कुळ उच्च दर्जाचें असून प्रथम त्याचा पेशा लष्करी होता. पण पुढें एका युद्धांत तो जखमी झाल्या- मुळें तो धार्मिक चळवळींत शिरला; व पूर्वी सांगितल्याप्रमाणें या नवीन पंथाचा प्रवर्तक व पहिला सेनापति झाला. आज जेसुइस्टांचें जें धोरण सुप्र- सिद्ध आहे तसें तें लावून देण्याइतकी कर्तबगारी त्याच्यांत नव्हती; ती त्या पंथांत पुढें उत्पन्न झाली, व तिचें श्रेय मुख्यत: इग्नेशियसचा जोडीदार व त्याच्यामागून इ. स. १५६६ त सेनापतीच्या जागेवर आलेला लेनिझ याच्याकडे आलें हें वर सांगितलेंच आहे. इग्नेशियसच्या पांच जोडीदारांपैकीं फ्रान्सिस झेविअर हा हिंदुस्थानाच्या परिचयाचा आहे. स. १५४१ त तो हिंदुस्थानांत आला. त्याच्या कर्तबगारीचें चटकदार व विस्तृत वर्णन पंधरा वर्षांपूर्वी काळपत्रांत आलें होतें.

## समर्थ व इग्नेशिअस

जेसुइष्टाचें जें हें वर संक्षिप्त वर्णन केलें आहे, त्यावरून त्या पंथाचें आमच्या रामदासीपंथाशीं पुष्कळ गोष्टींत साम्य आहे ही गोष्ट वाचकांस कळून येईल. पण त्यांचे मूळ प्रवर्तक जे इग्नेशियस व समर्थ यांच्या कर्तब- गारींत मात्र फरक दिसतो. समर्थांची जी व्यापक दृष्टी व संघटणाशक्ति त्यांच्या चरित्रांत दिसून येते ती इग्नेशियसमध्यें नव्हती. इग्नेशियसच्या हयातींत जेसुइ- ष्टांची कामगिरी फारच थोडी झाली. त्याच्या पश्चात् मात्र तो पंथ कार्यक्षमता व विस्तार या दोन्ही दृष्टींनीं उत्कर्षास चढला. याच्या उलट समर्थ सांप्रदायाची जी कर्तबगारी व जो विस्तार खुद्द समर्थांच्या हयातींत झाला

तेवढाच त्यांच्या पश्चात् त्यांच्या शिष्योपशिष्यांनीं आपापले मठ सांभाळण्या पलीकडे कांहीं केलेलें दिसत नाहीं इतकेंच नव्हे, तर समर्थांनीं लावून दि-लेलें धोरण हि त्याच्या पश्चात् त्यांच्या पंथातून नाहींसे झालें. सामाजिक संघटना व विषयोपभोगनिवृत्तिपूर्वक राष्ट्रीय प्रवृत्ति ह्या गोष्टी समर्थांच्या बरोबरच नाहींशा झाल्या; व त्यांच्या ऐवजीं पुस्तकी वेदान्त व आपल्या स्वतःहून इतरांकडे न पहाण्याचा गुण हे पूर्वापर वहिवाटीप्रमाणें रामदासी लोकांत शिरले. समर्थांनीं घालून दिलेली भिक्षेची वृत्ति मात्र राहिली, पण तिचा मूळ उद्देश मात्र नष्ट झाला. महाराष्ट्राला नष्टचर्यांतून वर काढणाऱ्या समर्थांचा च हा आजचा रामदासी सांप्रदाय आहे काय अशी जर कोणाला शंका आली तर ती अगदीं अस्थानीं होईल असें वाटत नाहीं. समर्थांच्या हयातींत स्थापन झालेले सर्व मठ आज चालू नाहींत व जे आहेत त्यांत परस्परांची माहिती, परस्परांविषयीं सहकारिता, सर्वांमध्यें एक सूत्रता इत्यादि गोष्टी अभावरूपानें च आज दिसत आहेत.

## हिंदुस्थान व यूरोप.

समर्थ सांप्रदायाचा या दृष्टीनें विचार केला ह्मणजे यूरोप व हिंदुस्थान यांच्या परिस्थितीची चांगली कल्पना येते. यूरोपांत आरंभ स्वल्प असून पुढील व्याप हळुहळू मोठा होतो. आपल्या इकडे याच्या उलट प्रकार पुष्कळ वेळां दिसून येतो. एकादा कर्तृत्ववान् मनुष्य आपल्या हयातींत कांहीं अचाट कामगिरी करून जातो, पण पुढें शून्य. यूरोपांत कर्तृत्वशक्तीची उत्तरोत्तर वाढ होत जाते. असा सामान्यपणें प्रकार या दोन ठिकाणांसंबंधानें दिसून येतो. कारणें कोणतींहि असोत, अनेक बाबतींत हा प्रकार आढळतो एवढी गोष्ट खरी; व ती नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं.

## समर्थ संप्रदाय या नियमाला अपवाद ठरला नाहीं.

समर्थांचें स्वतःचें पण अनेक ठिकाणची माहिती मिळवून इतिहाससंशोधकांनीं जुळविलेलें चरित्र आणि त्यांच्या हयातींत या सांप्रदायाची झालेली वाढ या गोष्टी समर्थ शिष्यांपैकीं अनेकांनीं लिहिलेलीं समर्थचरित्रें आणि सांप्रदायाची आजची किंबहुना भर पेशवाईंतील स्थिति यांशीं ताडून पहातां हिंदुस्थान व यूरोप यांतील संस्थां संबंधानें जो वर सामान्य नियम सांगितला त्याला खुद्द समर्थांचा सांप्रदाय देखील अपवाद ठरला नाहीं असें ह्मणावें लागतें. समर्थां नंतर रामदासी मठांतून जें अवाढव्य

महाराष्ट्र वाङ्मय तयार झालें, त्यांतील जो अंश प्रसिद्ध झाला आहे व त्यांतील जेवढा भाग आमच्या नजरे खालून गेला त्यावरून वरील विधान करण्याची प्रवृत्ति झाली आहे. याहून दुसरें अनुमान काढण्यासारखा पुरावा मिळेल तर आम्हाला आनंद च होईल. अनन्य राहे समुदाव । इतर जनास उपजे भाव । ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ॥ असें समर्थांनीं सांगितलें व तसें वळण हि सांप्रदायाला लावून दिलें, पण समुदाव अनन्य राखण्याचा प्रयत्न पुढें झाला कोठें ? मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥ या समर्थांच्या उपदेशापैकीं पहिला हिस्सा मात्र राहिला, इतरांचा पुढें पत्ता नाहीं. संकेतें लोक वेधावा । येकून येक शोधावा । प्रपंच हि सावरावा । येथानशक्त्या ॥ तसेंच उपाधीसी विस्तारावें ॥ पडिला प्रसंग सावरावा ॥ राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें ॥ इत्यादि उपदेशाची तरी पुढें काय वाट ?

समर्थ व त्यांचा सांप्रदाय आणि इग्नेशियस लायोला व त्याचा जेसुइस्ट पंथ यांची आजची स्थिति एका प्रकारें सारखीच आहे. एकंदर समाजांत त्याचा आज कोणी द्वेष हि करीत नाहीं, व कोणी त्यावर फारसे फिदा हि होत नाहींत. पण अशी स्थिति आरंभीं नव्हती. महाराष्ट्रांत समर्थांचा छळ बहुतेक झाला च नाहीं; जो कांहीं झाला तो जुन्या मताच्या कित्येक कर्मठ ब्राह्मण व्यक्तींकडून झाला. एकंदर समाजाला त्यांची कृति व मत ग्राह्य होतीं, व श्रीशिवाजी महाराजांसारख्या स्वराज्यसंस्थापकाचें गुरुत्व त्यांच्याकडे आल्यामुळें त्यांच्या लोकप्रियतेवर शिक्कामोर्तब झालें. जेसुइष्टांच्या आद्य प्रवर्तकाचा पुष्कळ छळ होऊन कित्येक वेळां त्याला कारागृहवास हि सोसावा लागला. पण प्रत्येक वेळीं त्याच्यावर आलेल्या आरोपांतून तो मुक्त होऊन व आपल्या पुराणमतवादित्वाबद्दलचें धर्माधिकाऱ्यांपासून अनुशासनपत्र घेऊन आपल्या कामास पुनः लागे. जेसुइष्टांबद्दल लोकांत पुष्कळ प्रकारचे खरे खोटे गैरसमज होते; पण रामदासीयां संबंधानें असा प्रकार

१ राजकारण निरूपण समासांत ( ११,५ ) समर्थांनीं ही दिलेली शिकवण जेसुइष्टांच्या शिकवणीशीं ताडून पहाण्यासारखी आहे. यूरोपच्या बदललेल्या परिस्थितींत जेसुइष्टांना राजकारणाची अवश्यकता उरली नाहीं. तथापि शिक्षणादिक सामाजिक कार्यें त्यांचीं अद्यापि चालू आहेत. मुंबईचें झेविअरस्कूल व झेविअरकालेज हीं याच पंथाचीं होत.

केव्हां हि नव्हता. फार तर त्यांच्या संबंधानें समाज तटस्थ असे. प्रत्यक्ष विरोध असा त्यांना कधीं सोसावा लागला नाहीं; पण त्याबरोबर त्यांविषयींचा पहिला आदर हि पुढें राहिला नाहीं.

हा जो वर सांगितलेला दोन्ही पंथांतील फरक, त्याचें कारण झालें तरी हेंच होय कीं रामदासीयांचें कर्तृत्व च पुढें नाहींसें झालें, व जेसुइट्टांचें वाढत चाललें. समर्थांच्या दिशेनें काम करणारे रामदासी महंत पेशव्यांच्या उत्कर्षाच्या वेळीं असते तर त्यांच्याकडे पेशव्यांचें लक्ष वेधल्या शिवाय राहिलें नसतें. पण चोवीस तासांच्या सांप्रदायिक ध्यानपूजनस्तवनादि भाविक आन्हिका शिवाय रामदासी मठांत त्यावेळीं कांहीं राहिलें नव्हतें. पेशवाईच्या पडत्या काळीं राजकीय दृष्टया महाराष्ट्राची काय स्थिति झाली होती ती जाणण्याची शक्ति व इच्छा रामदासीयांत असती तर इतिहासाला कदाचित निराळें स्वरूप प्राप्त झालें असतें. समर्थांनीं दासबोध लिहिला तो कांहीं केवळ भाविकपणें पारायण करण्यासाठीं लिहिला नाहीं. जड मूढ अशा सामान्य लोकांनीं पारायणें करावीं, पण महंतांनीं त्यांतील अर्थ घ्यावा, असाच समर्थांचा हेतु असला पाहिजे. दासबोधांतील ओंव्या ह्मणजे कांहीं मंत्र नव्हत. **केल्याविण कांहीं च नाहीं ।** असें कंठरवानें सांगणारे समर्थ नुसत्या पारायणासाठीं एवढा ग्रंथ लिहिण्याची कशाला उठाठेव करते? श्रवणभक्तीचें निरूपण करतांना **नाना पिंडांची रचना । नाना भूगोल रचना । नाना सृष्टीची रचना । कैसी ते ऐकावी ॥ नव खंडें चवदा भुवनें । कैसीं ते ऐकावीं ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा । कैशा त्या एकाव्या ॥** हें समर्थांशिवाय दुसऱ्या कोणी सांगितलें आहे काय? पण रामदासी मठांत पुढें समर्थांच्या समर्थपणाचाच विसर पडला, व इतर भक्तिमार्गीय संतांपैकींच ते एक अशी अज्ञानामुळें भावना उरली, व ती मुळें त्यांच्या व्यक्तीविषयीं परंपरागत गुरुभक्ति मात्र कायम राहून त्यांच्या कर्तबगारीची जाणीव नष्ट झाली. **जे जें आपणांस पाहिजे । ते तें कल्पून वाहिजे । येणें प्रकारें पाविजे । मानसपूजा ॥** या समर्थांच्या शिकवणी प्रमाणें जर राष्ट्राच्या पडत्या काळीं रामदासी मानसपूजा करते तर — पण तर ह्मणून आतां काय उपयोग? **मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकां करवीं करवावें । कित्तेक खलक उगवावे । राजकारणामधें ॥** १९६ हें लक्षांत ठेवणारे महंत नाहींसे झाले; आणि **आपली भिक्षा**

सोडूं नये । ( १४-८-६ ) एवढें मात्र सर्वांनीं ध्यानांत ठेविलें. नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटन करावें । तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ १४-२-८, हें लक्षांत ठेवून मऱ्हाष्ट देश थोर उरला । राजकारणें लोक रुधिला । हि देशाची स्थिति पहाण्यासाठीं महंती करण्याचें महतांनीं सोडून दिलें. कोणत्या हि संस्थेची परिस्थिति बदलल्यामुळें उपयोग नाहींसा झाला असतां ती संस्था नाममात्रानें उरावी हें साहजिक आहे. पण तिची आवश्यकता असतां हि तिनें तो च अस्तित्वमात्राचा मार्ग अंगीकारावा ही दुर्दैवाची च गोष्ट समजली पाहिजे. रामदासी पंथा संबंधानें असे दुःखोद्गार काढण्याचें कारण त्याच्या मूळब्रीदाची आवश्यकता आज नाहींशी झालेली नाहीं, हें च होय.

## रामदासी पंथ म्हणजे राष्ट्रसमाजसेवासंघ

मुख्य ते हरिकथा निरूपण । ऐवढें च जर समर्थांचें ब्रीदवाक्य असतें, तर त्यांच्यांत व इतर संतांत फरक तो काय होता ? पण भगवंताच्या अधिष्ठानाखालीं राजकारण आणि सर्व विषयीं सावधपण या गोष्टी समर्थांनीं शिकविल्यामुळें त्यांना विशिष्ट स्वरूप मिळालें. मंत्र मोहरे तोटके सिद्धि । नाना वल्ली नाना औषधी । धातु रसायन बुद्धि । नाडिज्ञानें ऐकावीं ॥ कोण्या दोषें कोण रोग । कोण्यारोगास कोण प्रयोग । इत्यादि गोष्टींची केवळ हरिकथा निरूपणासाठींच आवश्यकता होती असें कोण ह्मणेल ? या गोष्टींच्या ज्ञानानें सज्ज होऊन निस्पृह समाजसेवे शिवाय दुसरें काय करणार ? केवळ आत्मानंदांत मग्न होणाऱ्याला या गोष्टी काय करावयाच्या ? पण समर्थांनीं या गोष्टी शिकण्याची सांप्रदायांत सिकवण ठेविली, यावरून च तो सांप्रदाय हरिकथे बरोबर या अन्य ऐहिक साधनांनीं देखील समाजसेवा करावयास सिद्ध झाला होता हें उघड दिसून येईल. सांप्रदायांत शिरणारे सर्व लोक सारख्या योग्यतेचे फार च असणार ! तेव्हां ज्याच्या त्याच्या योग्यते प्रमाणें त्यानें निस्पृहपणानें वागून होईल त्या मार्गानें समाजाची सेवा करावी व त्यांत एकसूत्रता आणावी असा समर्थरूपी सूत्रधाराचा उद्देश होता. समर्थकालीन कल्पना आणि आजच्या कल्पना यांच्यांत परिस्थितीमुळें थोडा बहुत फरक पडणें शक्य आहे. पण तत्वतः पाहिलें तर समर्थपंथ ह्मणजे राष्ट्रसेवासंघ ( National Service League ) व समाजसेवासंघ ( Social Service League ) अशा दोन्ही स्वरूपांचा होता.

## समर्थनिर्दिष्ट कार्य आज हि होत आहे

राष्ट्रसेवा व समाजसेवा हीं दोन्हीं कार्यें आज हि परिस्थित्यनुरूप होत आहेत हे खरें पण रामदासी सांप्रदायाला मात्र त्यांत प्रौढि मिरविण्यासारखें कांहीं नाहीं. त्याच्या हातून पूर्वीच्या व्यापक दृष्टीनें कार्य होईल तर च त्याला समर्थसांप्रदाय हें नांव अन्वर्थक होईल.

## एक भ्रम

सुमारें सात वर्षांपूर्वी प्रस्तुत लेखक विषमज्वरानें पीडित असतां त्याच्या लहरींत मेंदूनें जे कांहीं देखावे उत्पन्न केले, त्यांत रामदासी मठाचा एक देखावा होता. गांवा पासून दोन तीन मैलांवरील एका टेंकडीवर तो मठ होता. त्या मठाचे रामदासी शिष्य–त्यां पैकीं बरे-चसे सरकारी किंवा निमसरकारी नोकर होते–रोज सकाळीं गांवांतील आपा-पल्या घरांतून स्नान संध्या करून मठांत जात, तेथें सांप्रदायिक धर्म कार्य तास अर्धा करीत आणि परत येऊन आपापल्या रोजच्या उद्योगाला लागत. आठवड्यांतून क्रमानें एक एक दिवस प्रत्येक जण सांप्रदायिक पोषाख ( uniform ) करून झोळी घेऊन भिक्षेस निघे. प्रत्येकाचा भिक्षेचा प्रांत ( घरें ) ठरींव असे. भिक्षेस जातांना कांहीं होमिओपाथिक औषधें तो बरोबर घेई, आणि आपल्या अखत्यारींतील घरांत चवकशी करून त्यांची योजना करी. परत जातांना मिळालेली भिक्षा मठांत टाकून तो घरीं येई व आपल्या उदरनिर्वाहाच्या उद्योगास लागे. त्या प्रसंगीं एका रामदासीयाच्या टापूत लहान मुलांत देवींची सांथ आली होती. त्यांत त्यानें बऱ्याच मुलांचे प्राण वांचविले असा लोकांकडून ध्वनि कानावर आला. मठाची इतर घटना कशी होती कोण जाणे. ज्वरांतील भ्रम च तो ! तो खरा कसा होणार ! पण तो डोक्यांत असेपर्यंत आनंद वाटत होता एवढें मात्र खरें. समर्थकृपेनें हा आनंद प्रत्यक्ष व्यवहारावरून पुनः अनु-भवावयास मिळावा अशी इच्छा ठेवून या विषयाची सध्या रजा घेतों.

## ग्रंथसंपादन

समर्थांनीं काशीपासूनि रामेश्वर । समर्थसांप्रदाय अपार । स्थापन करून महाराष्ट्रीयांचा व महाराष्ट्रधर्मांचा उद्धार केला. महाराष्ट्री-यांच्या विस्ताराबरोबर रामदासी मठांचा हि विस्तार झाला. किंबहुना राम-

दासी मठ आधीं आणि मग मराठी राज्याचा विस्तार असें च ह्मणणें अधिक सयुक्तिक दिसेल. या विस्तारांत तंजावर प्रांताच्या वांट्यास हि समर्थकृपेचा अंश आला. आजपर्यंत रामदास आणि रामदासी मालेंत जे ग्रंथ प्रसिद्ध झाले ते महाराष्ट्राच्या मूळ हद्दींतील च होते. पण या दूरच्या मठांतील संग्रहापैकीं एकादा ग्रंथ लवकर प्रसिद्ध व्हावा अशी सत्कार्योत्तेजक सभेची इच्छा होती, तिला अनुसरून मेरुस्वामीकृत श्रीरामसोहळा हा ग्रंथ वाचकांपुढें आला आहे.

या ग्रंथाच्या बाह्य स्वरूपा संबंधानें येथें एवढें सांगितलें पाहिजे कीं, त्याचें मूळ स्वरूप अस्तित्वांत असून हि संपादकास किंवा चिटणिसांस तें प्रत्यक्ष झालेलें नाहीं. प्रस्तुत ग्रंथ छापण्यांत ही मोठी उणीव राहिली आहे. मूळपोथीवरून शके १७७५ सुभानु नाम संवत्सरीं कृष्णाजी नामक लेखकानें कोणा केशवराम स्वामी सार्ठी एक प्रत तयार केली, व तिच्यावरून सत्कार्योत्तेजक सभेनें आपली प्रत उतरून आणिलेली आहे. कांहीं लेखकाच्या घर्तीमुळें व बरेचसें संपादकाच्या अज्ञानामुळें ग्रंथ पुष्कळ ठिकाणीं चांगला लागला नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें तर जसा ग्रंथ छापून बाहेर पडावयास पाहिजे तसा हा पडलेला नाहीं.

## तंजावराकडील रामदासी मठ

शके १५९७ त शिवाजी महाराजांची तजावराकडे स्वारी झाली. त्यांच्या बरोबर भीमाजी बावा नामक समर्थशिष्य तिकडे गेले व तंजावरास शके १६०४ मठ स्थापून राहिले. त्यांच्या बरोबर अनंतमौनी स्वामी व राघव स्वामी असे आणखी दोन शिष्य गेले होते; व त्यांनीं हि अनुक्रमें मन्यार गुडी व कोनूर येथें मठस्थापना केली. अनंत मौनींचे शिष्य मेरुस्वामी. तंजावर प्रान्तांत मराठी ग्रंथ पुष्कळ आहेत.

मेरु स्वामींनीं रामसोहळा केव्हां लिहिला तें समजत नाहीं. पण अनंत मौनींच्या अवतारसमाप्तीचा काल शके १६१५ असा मेरु स्वामींनीं दिला आहे; त्यावरून त्या काळानंतर केव्हां तरी तो लिहिला एवढेंच ह्मणतां येतें. मेरु स्वामी संबंधानें फारसा वृत्तान्त उपलब्ध नाहीं. त्यांचे अनेक ग्रंथ आहेत, व ते सर्व पहावयास मिळाल्यास कदाचित् कांहीं अधिक माहिती मिळण्याचा संभव आहे. समर्थप्रतापकार गिरिधरांनीं समर्थशिष्य व त्यांचे मठ यांविषयीं थोडी बहुत माहिती दिली आहे. पण तींत हि करनाटकीं

अनंत मौनी । अरुणाचल प्रांत अवनि । मन्यारगुडीसी मेरु शिष्य तरणि । अनंत बोधकीर्णी फांकला ॥ ( $\frac{१०}{२६}$ ) एवढेंच ह्मटलें आहे. संतविजयकार महिपति यांनीं देखील अनंत मौनी व मेरुस्वामी यांचा नाममात्रानें च उल्लेख केला आहे.

## आभार

असो. आज दोन तीन वर्षें रामसोहळ्याच्या संगतींत थोड्या फार प्रमाणानें गेल्या मुळें रामदासीयांशीं जो परिचय झाला, त्यावरून रामदासी सांप्रदाया विषयीं कांहीं विचार उत्पन्न झाले; ते रामदास आणि रामदासी ह्या वाचकापुढें ठेवण्याची ही संधि सत्कार्योत्तेजक सभेनें दिल्या बद्दल प्रस्तुत लेखक तिचा आभारी आहे.

धुळें
१८४२ विजया दशमी } केशव लक्ष्मण ओगले

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

## ॥ श्रीसद्गुरुस्तवन ॥

### पद

पतीतपावन तो मानव । सज्जनजीवन तो मानव ॥ ध्रु० ॥

श्रीगुरुराजपदांबुजभजनीं ।
कायिक वाचिक मन दिनरजनीं ॥ १ ॥

ब्रह्म परात्पर श्रीगुरुमूर्ती ।
भावि निरंतर आंतरवृत्ती ॥ २ ॥

दारागृहसुत श्रीगुरुचरणीं ।
कवी वदले तैसि च करणी ॥ ३ ॥

कर्म उपासक श्रीगुरुवचनीं ।
भजनविधीपरवैभवरचनी ॥ ४ ॥

श्रीगुरुवाक्य प्रमाण जयासी ।
वरद हरीहर कल्याण त्यासी ॥ ५ ॥

# अनुक्रमणिका


| प्रथम रुद्रीं मंगलाचरणनिरूपण | ओंवी सं. | श्लो. सं. | पृष्ठें |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला मंगलाचरण | १०३ | १ | १— ८ |
| ,, २ रा आदिकवि ( गणेश ) वंदन | ६६ | ... | ८— १२ |
| ,, ३ रा शारदाभिवंदन | ७९ | ... | १३— १७ |
| ,, ४ था देशिकस्तवन | ६६ | ... | १८— २२ |
| ,, ५ वा संतस्तवन | ६६ | ... | २२— २६ |
| ,, ६ वा समर्थांची पावनलीला | १०७ | ... | २६— ३३ |
| ,, ७ वा रामअनुग्रह समर्थाला | ७६ | ... | ३३— ३७ |
| ,, ८ वा समर्थरुद्र प्रगटला | ९२ | ... | ३८— ४३ |
| ,, ९ वा समर्थ प्रतापसूर्य उदेला | ९४ | ... | ४३— ४९ |
| ,, १० वा समर्थवनविहार | ९८ | ... | ४९— ५६ |
| ,, ११ वा समर्थअर्चन | १०७ | ... | ५६— ६२ |
| एकूण | ९९४ | १ | १— ६२ |

| द्वितीय रुद्रीं मायेचा परिहारनिरूपण | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला मायेचा महिमा | ७७ | १ | ६३— ६७ |
| ,, २ रा सद्गुरूचामहिमा | ६३ | ३ | ६८— ७२ |
| ,, ३ रा गुरुप्रशंसा | ८५ | ... | ७२— ७७ |
| ,, ४ था आनीं आनंदघन वर्षला | ६७ | ... | ७७— ८१ |
| ,, ५ वा अविद्यामहिमा | ८७ | १ | ८१— ८८ |
| ,, ६ वा बोधस्थिति | ७१ | ... | ८८— ९२ |
| ,, ७ वा सुपर्णयोग | ८७ | १ | ९२— ९८ |
| ,, ८ वा बोधीं अक्षेपनिवृत्ति | ८५ | ... | ९८—१०३ |
| ,, ९ वा अनंतगुरुदीक्षा | ६७ | ... | १०३—१०७ |
| ,, १० वा स्वच्छंदप्रेम | १२३ | ... | १०७—११५ |
| ,, ११ वा अनंतसद्गुरुप्रसन्न | ८८ | ... | ११५—१२० |
| एकूण | ९०० | ६ | ६३—१२० |

| तृतीय रुद्रीं सद्गुरूचें स्तवननिरूपण | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला सद्गुरुनिवासस्थळ | ४६ | ... | १२०—१२३ |
| ,, २ रा गुरुपूजा | ५० | ... | १२३—१२६ |
| ,, ३ रा स्वरूपअनुग्रह | ४७ | ... | १२७—१३० |
| ,, ४ था शिष्यचित्तशोधन | ५१ | ... | १३०—१३३ |
| ,, ५ वा देहशुद्धि स्वरूप | ५२ | ... | १३३—१३६ |
| ,, ६ वा ज्ञानाज्ञानपरिशोध | ५३ | ... | १३७—१४० |
| ,, ७ वा उन्मनीं उन्मेष विराला | ५० | ... | १४०—१४३ |
| ,, ८ वा तूर्यच्छ सहजस्थिति आणिला | ५२ | ... | १४३—१४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, ९ वा स्वामीसंभाषण स्वसुख | ४९ | ... | १४६—१४९ |
| ,, १० वा षोडशज्ञानमुद्रा | ५० | ... | १४९—१५२ |
| ,, ११ वा समर्थकृपा चित्कळा मेखळा | ७३ | ३ | १५३—१५७ |
| एकण | ५७३ | ३ | १२०—१५७ |


## चतुर्थ रुद्रीं साक्षीरूपनिर्णयनिरूपण


| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला देशिकस्तवन सुमनमाला | ६० | १ | १५७—१६१ |
| ,, २ रा प्रारब्धीं गुरुकृपा आकळिला | ५२ | ... | १६१—१६४ |
| ,, ३ रा बोध अनुताप | ५३ | १ | १६४—१६८ |
| ,, ४ था उपसाक्षी प्रबोध | ५५ | ... | १६८—१७१ |
| ,, ५ वा देशिकमानसपूजा | ६१ | ... | १७१—१७५ |
| ,, ६ वा वेदगर्भकर्म निर्वाळा | ४९ | २ | १७५—१७९ |
| ,, ७ वा विरक्तीनें मुमुक्षु वरिला | ६० | ४ | १७९—१८३ |
| ,, ८ वा सत्कर्मे प्रांजळ चित्कळा | ५७ | ९ | १८३—१८८ |
| ,, ९ वा गृहस्थाश्रमकर्म | ४६ | ७ | १८८—१९२ |
| ,, १० वा सन्यासधर्म | ४८ | ४ | १९२—१९५ |
| ,, ११ वा क्षत्रियवर्ण पावन स्वलीला | ७६ | ३ | १९५—२०० |
| एकूण | ६१७ | ३१ | १५७—२०० |


## पंचम रुद्रीं शमादि शट्क अभ्यासानिरूपण


| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला विरक्त निज वैभवें आगळा | ७१ | २ | २००—२०५ |
| ,, २ रा विचार अन्तरभाव | ७२ | ३ | २०५—२१० |
| ,, ३ रा शमादि शट्क अवलीळा | ११४ | ४ | २१०—२१८ |
| ,, ४ था मुमुक्षता | ८५ | ... | २१८—२२३ |
| ,, ५ वा हृदयशुद्धि | ६९ | ... | २२३—२२७ |
| ,, ६ वा फावली अमृताची वेळा | ६५ | ... | २२७—२३१ |
| ,, ७ वा स्त्रीमहिमा | ४८ | ... | २३१—२३४ |
| ,, ८ वा बोधप्रस्तावना | ४६ | ३ | २३४—२३८ |
| ,, ९ वा रामउपासना अन्तर्कळा | ६६ | ... | २३८—२४२ |
| ,, १० वा स्वरूपाचल देखिला डोळां | ६१ | ... | २४२—२४५ |
| ,, ११ वा भावें ईश्वर प्रसन्न केला | ७७ | ४ | २४६—२५१ |
| एकूण | ७७४ | १६ | २००—२५१ |


## षष्ठ रुद्रीं परमार्थ निरूपण


| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला अपरोक्ष साधन | ७४ | १ | २५१—२५५ |
| ,, २ रा उपासनयोग | ५२ | ... | २५५—२५८ |
| ,, ३ रा स्वामिसंभाषण | ५७ | ... | २५९—२६२ |
| ,, ४ था भक्त निजप्रतीतीनें आगळा | ६६ | .. | २६२—२६६ |
| ,, ५ वा रामउपासकांचा लीला | ५९ | ... | २६६—२६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, ६ वा स्वरूपउपासना | ६८ | ... | २७०—२७३ |
| ,, ७ वा निदानानुभव | ६१ | ... | २७४—२७७ |
| ,, ८ वा तारकउपासना | ७७ | ... | २७७—२८२ |
| ,, ९ वा निजात्मयोग निवळला | ५० | ... | २८२—२८५ |
| ,, १० वा शिवरामरहस्य | ८० | ... | २८५—२९० |
| ,, ११ वा विष्णु सायुज्य प्रकटला | ९४ | ... | २९०—२९५ |
| एकूण | ७३८ | १ | २५१—२९५ |

**सप्तम रुद्रीं रामतत्व प्रकटविलें**

| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला आत्मानुभव | ६१ | १ | २९६—२९९ |
| ,, २ रा परतत्वसंवाद | ७४ | ... | २९९—३०४ |
| ,, ३ रा परतत्व प्रगटलें | ८० | ... | ३०४—३०९ |
| ,, ४ था हृदयस्थ प्रार्थना | ११४ | ... | ३०९—३१६ |
| ,, ५ वा श्रीराम सुप्रसन्न जाहला | ६४ | ... | ३१६—३२० |
| ,, ६ वा रामकृपानुवाद | ७९ | ... | ३२०—३२५ |
| ,, ७ वा देव अमृतभाषण | ७८ | ... | ३२५—३३१ |
| ,, ८ वा रामक्षेत्रावलोकन | ६३ | ... | ३३१—३३४ |
| ,, ९ वा पंचतत्वलिंगार्चन | ७७ | २ | ३३५—३४० |
| ,, १० वा सिद्धावबोध | ६० | ... | ३४०—३४३ |
| ,, ११ वा ग्रंथप्रतीति | १०३ | ५ | ३४३—३५० |
| एकूण | ८५३ | ८ | २९६—३५० |

**अष्टम रुद्रीं तत्वानुसंधान निरूपण**

| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला स्वरूपदृष्टी अविद्या निर्वाळा | ८३ | १ | ३५१—३५६ |
| ,, २ रा साक्ष्यत्व | ६६ | ... | ३५६—३६० |
| ,, ३ रा शून्यस्वभाव | ६३ | ... | ३६०—३६४ |
| ,, ४ था मायाकमळिणी अन्तर्केळा | ७४ | ५ | ३६४—३६९ |
| ,, ५ वा मायाब्रह्म विवर्त | ६० | ४ | ३६९—३७३ |
| ,, ६ वा पंचीकरणयोग | ८४ | २ | ३७३—३७८ |
| ,, ७ वा भूगोळरचना | १०३ | ... | ३७८—३८५ |
| ,, ८ वा जीवशिव स्वभावतत्त्व | ७८ | ... | ३८५—३८९ |
| ,, ९ वा पिंडोत्पत्ति शबल त्वं पदार्थ | ६४ | ... | ३८९—३९४ |
| ,, १० वा मरण महाप्रळय | ९५ | ... | ३९४—४०० |
| ,, ११ वा ज्ञानाभिप्रळय उजाळा | १०३ | २ | ४००—४०७ |
| एकूण | ८७३ | १४ | ३५१—४०७ |

**नवम रुद्रीं स्वरूपान्तर्भावनिरूपण**

| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला दक्षिणमानसतीर्थमाळा | ११४ | २ | ४०७—४१४ |
| ,, २ रा उत्तरमानसतीर्थांतर | ९५ | ... | ४१४—४२० |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, ३ रा शरयूआख्यान | १०१ | ... | ४२० — ४२६ |
| ,, ४ था रामकृपा वनदर्शन | ६८ | ३ | ४२७ — ४३१ |
| ,, ५ वा कैवल्यक्षेत्र ( अयोध्या ) दर्शन | ८५ | ... | ४३१ — ४३६ |
| ,, ६ वा श्रवणादि पादसेवनभक्ति | १०२ | ... | ४३६ — ४४३ |
| ,, ७ वा अर्चनादि निवेदनभक्ति | ११७ | ... | ४४३ — ४५० |
| ,, ८ वा भक्तीं श्रीराम दृष्टीसि पाहिला | ८७ | ... | ४५० — ४५५ |
| ,, ९ वा कैवल्य यात्रेचा निर्वाळा | ८७ | ... | ४५५ — ४६१ |
| ,, १० वा राम प्रारब्धवस्तीसी आणिला | ९६ | ... | ४६१ — ४६७ |
| ,, ११ वा रामजन्मनवमी उत्सव | ११७ | ... | ४६७ — ४७४ |
| एकूण | १०६९ | ५ | ४०७ — ४७४ |


## दशम रुद्रीं गहनदशानिरूपण


| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला कर्मसन्यासयोग | ९४ | ५ | ४७४ — ४८१ |
| ,, २ रा स्वतःसिद्धयोगअन्तर्कळा | ८७ | ४ | ४८१ — ४८७ |
| ,, ३ रा हृदयसिंधुमथन | ११२ | ४ | ४८७ — ४९४ |
| ,, ४ था चारीअभावनिरूपण | १२३ | १ | ४९४ — ५०२ |
| ,, ५ वा त्यागात्यागनिरूपण | ७७ | २ | ५०२ — ५०७ |
| ,, ६ वा प्रारब्धयोग | ७७ | ३ | ५०७ — ५१२ |
| ,, ७ वा विज्ञानसिद्ध अवसान | ४७ | १ | ५१२ — ५१५ |
| ,, ८ वा सप्तभूमिकायोग | १०६ | ११ | ५१५ — ५२४ |
| ,, ९ वा जीवनममुक्तप्रकरण | ७० | १३ | ५२४ — ५२९ |
| ,, १० वा ब्रह्मरूप समाधि | ९७ | ३ | ५२९ — ५३५ |
| ,, ११ वा पवित्रदेशनिवास | ९२ | ... | ५३५ — ५४१ |
| एकूण | ९८२ | ४७ | ४७४ — ५४१ |


## एकादश रुद्रीं स्वरूपाचें ध्याननिरूपण


| | | | |
|---|---|---|---|
| उल्लास १ ला एकादशरुद्रनिरूपण | ७५ | १ | ५४१ — ५४६ |
| ,, २ रा स्वरूपाम्बरध्यान | ९० | ... | ५४६ — ५५१ |
| ,, ३ रा अलक्षलक्षनिरूपण | ७७ | २ | ५५१ — ५५६ |
| ,, ४ था अद्वैतामृतकथन | ९२ | २ | ५५६ — ५६१ |
| ,, ५ वा स्वभावत्रयें भेदत्रय निवाला | ८२ | ... | ५६२ — ५६६ |
| ,, ६ वा जीवभृंगलीलानिरूपण | १०५ | ... | ५६६ — ५७२ |
| ,, ७ वा सकळतत्वप्रार्थना | ८५ | ... | ५७३ — ५७७ |
| ,, ८ वा निजानुसंधान | १०५ | ... | ५७७ — ५८४ |
| ,, ९ वा आद्यंत ग्रन्थाचा भाव | १०१ | ... | ५८४ — ५९० |
| ,, १० वा ग्रन्थान्वय | १२५ | ... | ५९० — ५९७ |
| ,, ११ वा चित्प्रकाशावलोकन | १०७ | ... | ५९७ — ६०३ |
| एकूण | १,०४४ | ५ | ५४१ — ६०३ |

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग अठरावा

---

### मेरुस्वामिकृत

# श्रीरामसोहळा

---

श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीरामं परमानंदमुपदेष्टारमीश्वरं । व्यापकं सर्वलोकानां कारणं तं नमाम्यहं ।। १ ।। श्रीरामचंद्राय नमः ।। ।। ।।

श्रीराम समर्थ अनंता[1] । विशेषणेंसीं येकात्मता । सच्चिदानंद समता । तत्वता महावाक्य ।। १ ।। प्रणवमूल अभ्यंतरा । परात्परदेवें-माहेरा । निज आस्तिक्यें जगदांतरा । प्रगट करिसी ।। २ ।। श्रुतीचें अभ्यंतर पुरातन । अक्षयस्वरूपें सनातन । स्वानुभवें नित्यनूतन । प्रतीतीसि येसी ।।३।। देवाधिदेव पंचायतन । शिव विष्णू चिच्छक्ति गहन । सूर्य आणि गजानन । विज्ञानघनस्थिती ।। ४ ।। तुझिये प्रतीतीचा प्रसाद । ब्रह्मप्राप्तीसि स्वानंद । महावाक्यउपदेशनिर्द्वंद्व । उद्बोधसुखकंदा ।। ५ ।। वेदादि आदि पुरुष । तुतें चि अनुसरले विशेष । शास्त्रें पुराणें निर्दोषें ।

---

१ अनंत मौनी. श्रीराम, समर्थ रामदासस्वामी आणि अनंत मौनी ( मेरुस्वामींचे गुरु ) हे सच्चिदानंदस्वरूपी असल्यामुळें त्यांचें पूर्ण तादात्म्य आहे. २ रामरूप परब्रह्म हें देवांच्या देवाचें ही मूल ठिकाण आहे, व त्याच्या च अस्तित्वामुळें विश्वाचें अस्तित्व प्रतीतीला येतें. ३ वेदाचा हेतु तुझें वर्णन करण्याचा आहे, मग तें साधो वा न साधो. तुझें स्वरूप सनातन असल्यामुळें जरी जुनें च आहे, तरी आत्मानुभव आला ह्मणजे त्यांत नित्य नवीन पणा येतो. ४ अद्वैतात्मक अशा ' तत्वमसि ' इत्यादि महावाक्यांचा यथार्थ बोध होऊन तुझी प्राप्ति होणें हें तुझ्या च कृपेवर अवलंबून आहे.

शरण रिघालीं ॥६॥ महासित्धमुनीयोगींद्र । तुतेंचि शरण आले चित्स-मुद्र । प्रबोधसृष्टीचे चित्सूर्यचंद्र । कुवंडी करिती ॥ ७ ॥ स्वयंभसमाधि भद्राचळ । तुतेंचि अनुभविती सुनिश्चळ । विश्रांतीचेयोगें अविकळ । देवा तुझेनि जाले ॥ ८ ॥ नित्य कैवल्यसाक्षात्कारी । स्वसुख परमामृत निर्धारीं । प्रबोधवृष्टीनें निरंतरी । अमर केले तत्वता ॥ ९ ॥ अनादि निद्रिस्थ होती परा । तुझेनि जाग्रतीसि आली त्वरा । प्रणवमूल अभ्यंतरा । उद्घाट करी ॥१०॥ सदोदित जाग्रती जागर । जागवी अपरोक्ष सुखें साचार । समाधि सुषुप्ती अभ्यंतर । निद्राभंग नसे ॥११॥ उन्मेषाचें अनुसरण । स्वप्नीं च स्वप्नाचें निरसन । निजात्मबोधें निरंजन । सुलीन सहज ॥ १२ ॥ वागेश्वरीसि अनुग्रहिलें । अनिर्वाच्य वाचेसि आलें । त्रिपुटीतीत चालविलें । निजअनुसंधान ॥ १३ ॥ ऐसे ग्रंथोपग्रंथ किती । उत्धार केले तुंवा जगती । तुझेनि तुज चि पाविजेती । जीव सकळ ॥ १४ ॥ पावन प्रबोध परंपरा । तुझेनि विख्याती निजमाहेरा । सर्वाधिष्ठान ईश्वरा । तुज अभिवंदन ॥ १५ ॥ तूं हृदयस्थ माझा होसी । हें जाणवलें निश्चयेसीं । तुझियेनि कृपार्कें हृदयासी । पूर्ण प्रकाशिलें ॥ १६ ॥ सूर्यप्रकाशें चि सूर्यदर्शन । कीं ज्ञानेंचि होय ज्ञानावलोकन । तैसें तुझेनि तुज समर्पण । जालों आह्मीं ॥१७॥ नित्यकृपेची सदयता । सनातन तुजपासीं असतां । काय प्रार्थिजे अनंता । अज्ञान जीवें ॥ १८ ॥ अनंता अनंतकृपाळुपण । होसी अमृत संजीवनी प्राण । ते हे चित्कळा संपूर्ण । लोक जीववी ॥ १९ ॥ साच चि अमृताची महिमा । देवा प्रतीतीसि आली आह्मा । कृपासंजीवनी गरिमा । प्रत्यक्ष प्रबोधी ॥ २० ॥ जेथें मौनासि मौन पडे । जेथें निर्धारासि होय सांकडें । जेथें

---

१ निर्दोष असें आश्रयस्थान तूंच एक असल्यामुळें वेद, शास्त्रें, पुराणें तुझ्या च मागें लागलीं आहेत. २ नित्यसमाधिसुख अनुभवणारे अतएव मेरुप्रमाणें स्थिर झालेले महान् योगी अनुभव घेतात तो तुझा च. ३ तुझ्या च योगानें त्यांना विश्रांति मिळून स्वस्थता आली. ४ परा वाचा. ५ ॐकार. ६ प्रत्यक्ष. ७ कृपेच्या सूर्यानें. ८ माहात्म्य.

महा अद्वैत कवाडें । अभंग मुद्रा ॥ २१ ॥ माथां ठेऊनि कृपेचा हस्त । केला स्वप्रकाश सदोदित । प्रबोधोनि महा अद्वैत । कपाटें उघडिलीं ॥ २२ ॥ तेथें सत्याचें निजऐश्वर्य । पाहातां वेढावले चित्सूर्य । स्वरूप संपदेचें आश्चिर्य । पाहावेल कवणा ॥ २३ ॥ जें निजदृष्टीसि तटस्थ करी । जें भावितां भावना सारी । जें वर्णितां वाचा धरी । माहा विभव ॥ २४ ॥ ऐसीया आस्तिक्याचें निधान । ठेवणें तुझें पुरातन । कृपेनें तेथें अधिष्ठान । मज भांडारी केलें ॥ २५ ॥ मुक्यास वाचा दिधली हे अपूर्व । गर्भांधासि दाखविलें सर्व । बधिरासि करूनिया अर्ह । श्रवणीं बैसविलें ॥ २६ ॥ ऐसी तुझ्या उपकाराची स्थिति । केविं वर्णूं मी मंदमति । अद्वैतबोधाची संपत्ती । दीधली मज ॥ २७ ॥ स्वरूप स्वराज्य छत्रपति । करूनि ठेविलें मजप्रति । अक्षय भाग्याचा गभस्ति । अमृतें पाहाला ॥ २८ ॥ दैवें सुवर्णाचा दिवस । प्रसन्न जालासि अह्मास । तुझिये दयेच्या प्रसादास । पात्र जाहलों ॥ २९ ॥ अमृत-कटाक्षें तुझिया । स्वानंदें घटावली निजकाया । निरसली अनादि माया । हस्तसंस्कारें ॥ ३० ॥ कल्पतरूसि काय द्यावें । कैसें अमृतासि जेववावें । ज्ञान गभस्तीसि दावावें । तेज तें कवण ॥ ३१ ॥ चित्समुद्रासि मार्जन । कवण त्या जीवनें अर्घ्यदान । चिंतामणीसि निर्धान । देइजे केविं द्रव्याचें ॥ ३२ ॥ कामधेनूसि कवणत्या क्षीरें । तोषवावें निजनिर्धारें । सुवर्णाद्रीसि त्या स्वकरें । सुवर्णरजें तोषविजे ॥ ३३ ॥ वसंतासि त्या सुमनीं । प्रत्योपकारा लागूनि । काय द्यावें परतोनि । त्याचें चि गौरव ॥ ३४ ॥ पुढती पुढती विचारितां । नव्हिजे तुझी उत्तीर्णता । तुझिये कृपेमाजी अनंता । सामावलों सुखें । ॥ ३५ ॥ तुझिया उपकाराच्या कोटी । नित्य दाटल्या माझिये पोटीं त्या आठवूं जातां चि कंठीं । बाष्प दाटे ॥ ३६ ॥ तुझिया

१ द्वारें. २ अभेद्य असा शिक्का. ३ ज्याचें वर्णन करतांना वाणीला मोठें वैभव प्राप्त होतें. ४ ऐकण्यास समर्थ. ५ आत्मस्वरूपरूपी राज्याचा धनी. ६ सूर्य. ७ मस्तकावर हात ठेविल्यानें. ८ खजिना. ९ उमाळा.

उपकारें दाटून । उठावलें अंतःकरण । विचारासि नाणितां स्तवन । करूं प्रवर्तलें ॥ ३७ ॥ तवें तें आठवणें चि सरिसें । आटोनि गेलें निजध्यासें । दीपप्रभेनें जैसें । गिळिलें कर्पुरासि ॥ ३८ ॥ वेगळिकेसि नेंदिसी डाव । हें ख्यातीचें तुझें राशिनाव । भवद्वेषी तूं निर्भव । भेद-संहरण ॥ ३९ ॥ भवभेदभंजना । पुरातन देव निरंजना । अद्वैत प्रतिष्ठा कृतसज्जना । निजआस्तिक्यतेनें ॥ ४० ॥ अज्ञानजनितें कल्मषकाळ । उदित विज्ञानबोधें अकाळ । कलित निजदशा अखिळ । सुखैकबोधा ॥ ४१ ॥ अद्वैतबोधप्रमेयांतरें । प्रतीतीसि येसी निज-निर्धारें । विज्ञानसारस्वतजिव्हारें । प्रगट करिसी ॥ ४२ ॥ स्वानुभव नव व्याकरणीं । स्वयंभ अक्षराची भरणी । कृपाळूपणें श्रवणीं । सांगसी सर्वदां ॥ ४३ ॥ अक्षर ब्रह्मेसि समान । करिसी प्रंबंध सना-तन । मी मज पाहा हीन दीन । परि तुझें अभिनव ॥ ४४ ॥ ईश्व-राचें सामर्थ्य जगती । अद्भुत वर्णिजे काय किती । औषधीयोगें रोग-निवृत्ती । जगाची सहज ॥ ४५ ॥ जितुकें कांहीं निर्माण जालें । ति-तुकें विश्व उपेगा आलें । केविं जाये वाखाणिलें । उपेगें सकळ ॥ ४६ ॥ तैसा मी येक अज्ञान । तुंवांचि प्रतिष्ठिलें माझें मीपण । तुंवांचि अनु-ग्रहिलें परतोन । उपेगा आणिलें ॥ ४७ ॥ प्रसन्नबोध श्रीअनंता । हृदयीं च राहें तूं आतां । प्रतीत वैखरीस आणितां । येई निरंतर ॥ ४८ ॥ मंगळस्वरूपें आचरण । हेंचि तुझें मंगळाचरण । अद्वैत-स्वरूपीं संचरण । करवीं मज ॥ ४९ ॥ माझें जें जें अपेक्षित । तें तें स्वयेंचि प्रगटें तूं अनंत । अनुभवाचा अखंडीत । थावा करीं ॥ ५० ॥ जैसें विस्मरणासि कारण । होय स्वयेंचि तो आपण । त्यास्तव तयासि

---

१ तेव्हां स्मरणाचाच मुळीं निदिध्यासामुळें लय झाला. २ जन्मराशी वरून ठेवलेलें नांव. ३ (?) मज्जन असावें काय ?. ४ अज्ञानोत्पन्न पापाचा नाश. ५ जाणिलें आहे आत्मस्वरूप ज्यानें असा. ६ ग्रंथ. ७ प्रत्येक वस्तूचा अमुक अमुक उपयोग असें किती वर्णावें. ८ लाभ.

स्मरण । अपेक्षा होय ॥ ५१ ॥ येकाकी नें रमते । हें ज्ञानाचें हृदयें वांछितें । कां जे श्रवण शब्दासि आयितें । जीवन होय ॥ ५२ ॥ श्रवण शब्दासि चेतवी । अर्थरूप अनुसंधान ठेवी अद्वैतश्रुतिमथित अनुभवी । गाभा गगनाचा ॥ ५३ ॥ तृप्त व्हावयासि असाधारण । देवा क्षुधाच केलिसे कारण । सर्व ही गोडी तिज पासून । प्रतीतीसि ये ॥ ५४ ॥ अमृताहूनि जीवनीं गोडी । परि तें तृषेवीण काय बापुडी । आत्मबोध इच्छा रोकडी । प्रवर्तविली तैसी ॥ ५५ ॥ देवा तुझेचि इच्छेनुसार । वर्तताहे जगदाकार । अनंतब्रह्मांडीचा कर्तार । तूंचि होसी ॥ ५६ ॥ सत्ता ब्रह्मांडाच्या कोडी । होत जात सृष्टीच्या वडमोडी । तुझि ये प्रकृतीची प्रौढी । न कळे ब्रह्मादिकां ॥ ५७ ॥ तुझिये प्रकृतीच्या दासी । ईच्छा प्रतिष्ठिती ब्रह्मादिकांसी । ब्रह्मांडा ऐश्या परंवडीशी । उतरडी जाल्या ॥ ५८ ॥ साचाचि इंद्रादिकांचे व्यापार । तयांच्या खेळाचे विस्तार । ब्रह्माविष्णुमहेश्वर । बाहुल्या करिती ॥ ५९ ॥ तये प्रकृतीचाप्रबळ । होय अनंतब्रह्मांडीं खेळ । तियेचे पोटींचा माहाकाळ । नाटोपे कवणा ॥ ६० ॥ अनंत ब्रह्मांडाच्या उतरडी । करूनियां कडाफोडी । जाय पळोनि अति तांतडी । महाकाळ ॥ ६१ ॥ प्रकृती अनुसरे तुज । तेणें निदान होय सहज । धरूनि तुज निजउर्मज । सायूज्य पावे ॥ ६२ ॥ ते सायूज्यतेचा जिव्हाळा । ग्रंथ अनुभवाचा आगळा । संभविसी रामसोहळा । रसाळ प्रमेय ॥ ६३ ॥ ग्रंथश्रवणें अवचट । समाधीसि सुख होय उत्कट । अचेतदशेसि परिपाट । ग्रंथानुसधानें ॥ ६४ ॥

---

१ आत्मस्वरूपाचा विसर पडल्यामुळें त्याचें स्मरण करून देणें अवश्य आहे. २ एकट्याला चैन पडत नाहीं. ३ (?) ज्ञानाची इच्छा झाली ह्मणजे एकट्यानें सुख वाटत नाहीं. दुसऱ्याची अपेक्षा उत्पन्न होते. दोन झाले ह्मणजे एक ऐकणारा व एक बोलणारा होतो. ऐकणारा मिळाल्यामुळें बोलण्याला उत्तेजन येतें. ४ वासना या मायेच्या दासी होत. ५ मालिका, थर. ६ खालीं यावयाचे मार्ग. ७ चित्रें, ब्रह्मादिदेव हे सर्व मायेच्या खेळावयाच्या वस्तु होत. ८ आत्मज्ञान. ९ झरा. १० श्रेष्ठ. ११ मार्ग. ग्रंथाच्या योग्य परिशीलनानें अज्ञान स्थितींतून बाहेर पडण्यास मार्ग होतो.

जेविं वसुमतीच्या ढाळें । तोय चालविलें जाय सुढाळें । उपेगासि येऊनि रसाळें करी सफलित सर्व ॥६५॥ कीं लक्ष्मीचा होरीं वाहे । तैं मृत्तिकेचें सुवर्ण होये । पाषाण गोटे निश्चयें । परीस होती ॥ ६६ ॥ तैसें तुझिये कृपेचें केलें । उपभोगासि सर्वत्र आलें । अज्ञान दारीद्र गेलें । सर्व सृष्टीचें ॥ ६७ ॥ ग्रंथ चित्सूर्य प्रकाशला । अज्ञानतम निरसला । अद्वैत दिनमानें पाहाला । दिवस सकळांसी ॥ ६८ ॥ ग्रंथ स्वयंभ अमृतकर । जीवौषधीसि निरंतर । कृपामृतकरें साचार । सफळित करी ॥ ६९ ॥ ग्रंथ अमृतानुभवसार । संपूर्ण स्वसुखाचा चिसागर । किंवा ग्रंथ होय चिदंबर । अर्थप्रौढीनें ॥ ७० ॥ ग्रंथस्वर्गंगेपरीस गतीनें । अतिऊर्ध्वगतीच्या सोपानें । पावे परंधाम स्वारिछतीनें । सर्वत्रासी ॥ ७१ ॥ अभिनवसप्तमावतारें । समुद्रीं पर्वत तारिले गजरें । तैसा भवाब्धीसि निर्धारें । ग्रंथ सेतु करी ॥ ७२ ॥ ग्रंथरूप चिद्विमान । विलोकनें पावे चिद्गगन । अलक्षस्थितीचें भवन । तत्वता होय ॥ ७३ ॥ ग्रंथ प्रसादें मनोहर । अर्थरूपरचना सुंदर । विश्रांतीचें निज मंदिर । पाविजे श्रवणें ॥७४॥ यालोकोपकाराकारणें । पर्जन्य वर्षे कौळ प्रमाण । त्यासि प्रत्योपकार कवणें । काय केला जाईल ॥७५॥ तेविं वाक्यामृतधारा । परमकृपेनें निजत्वरा । ओढूनि संतत वृष्टीनें धेरा । संतप्त निववी ॥७६॥ चातकाची तृषा पुरे । सृष्टीचा उपेगचमत्कारें । तैसें मज निमित्य आदरें । हृदय उकळीं ॥ ७७ ॥ सोडूनि अभेद हृदयगांठी । उघडूनि अद्वैत सुखाची पेटी । दाखवीं दृष्टीसि सृष्टी । साक्षात्काराच्या॥७८॥ ज्ञानवैराग्यें भजन । क्रमान्वयें समाधान । घालूनि दृष्टीसि अंजन । वस्तू निधान दावीं ॥ ७९ ॥ ऐसें प्रार्थितां अनंतासि । आला सुप्रसन्न

---

१ उतरणीमुळें. २ सुलभपणें. ३ नदी किंवा कालवा यांच्या रूपानें शेतें व बागा यांना पाणी मिळून समृद्धि होते. ४ जोर, उच्चीचा काळ. ५ चंद्र. ६ जीवरूपी वनस्पतींना. ७ चिदाकाश. ८ जिन्यानें ९ मूलस्थान, ब्रह्मपद. १० रामावतारें. ११ चैतन्याचें विमान. १२ प्रासाद, राजवाडा. १३ कान. १४ योग्यकाळीं. १५ पृथ्वी. १६ उघडें करीं. १७ अभेद्य.

हृदयासी । वक्ता होऊनि निश्चयेंसी । प्रवर्तला ग्रंथीं ॥८०॥ ग्रंथीं अभिप्रावो अनंत । प्रतीतीसि यावे अखंडीत । कांहीं येक आठवें निश्चित । नामासि आलें ॥ ८१ ॥ मुख्यें स्वरूपाचा निश्चितार्थ । माया निरासें होये जे कृतार्थ । अन्वयव्यतिरेकें[1] परमार्थ । प्रांजळ[2] केला ॥ ८२ ॥ निरोपिला मायेचा विवर्त । प्रांजळ केला अविद्या प्रवृत्त । तैसाचि सद्विद्येचा निवर्त । योग निवळिला ॥ ८३ ॥ मुख्य भक्तीचा निश्चय । निज सायुज्याचा जय । स्वरूप प्राप्तीचा अक्षय । आनंद बोधिला ॥८४॥ निरोपिलें तत्वज्ञान । अभिन्न आत्मज्ञान खुणें । वेदांत संमती गहन । वेदवाक्यें ॥ ८५ ॥ साही दर्शनांचीं[3] प्रमेयें । षण्मतांचीं रूपें निश्चयें । अठरा पुराणें निस्संषय । संमतीसी आलीं ॥ ८६ ॥ अद्वैतबोध गीतार्थ । उपनिषदांचे मतितार्थ । सकळ तात्पर्यें अनुग्रहार्थ । आलीं गर्भीं ॥ ८७ ॥ समुद्रावगाहनीं तीर्थें[4] । आतुडती[5] फळें सुकृतार्थ । तैसा येकचि ग्रंथ सर्वार्थें । संपन्न होय ॥ ८८ ॥ कीं अर्धोदयें[6] पर्वकाळ । सेवी त्यासि होती सफळ । तैसें ग्रंथश्रवणें अकळ । योग फावती ॥ ८९ ॥ जैसीं रानटें नगरयोगें । नागरीक होती प्रसंगें । तेविं ग्रंथ श्रवणांतरंगें । प्रज्ञावंत होती ॥ ९० ॥ ग्रंथ मुक्तीचें माहेर । भक्तीचें सुखाँडीक[7] घर । ग्रंथीं वसों येती साचार । सर्व चातुर्यें ॥ ९१ ॥ चातुर्यें येथें शाहाणीं जालीं । ज्ञानें संपन्नतेसि आलीं । विज्ञानें सुखेंचि निवालीं । ग्रंथवस्तीनें ॥ ९२ ॥ समाधियोग विसांवले । सित्धांतबोध सुखेंचि धाले । अनुभवसुखेंचि सुखावले । राहिले ग्रंथीं ॥९३॥ महास्थितीनें ग्रंथ अपार । स्वरूपानुभवें साचार । अनंत मुर्खांचा उद्धार । प्रमाणासि[8] नये ॥९४॥ अन्वय ग्रंथार्थ संगती । उल्लासापुढें उल्लास होती । समान पंक्तीनें बैसती ।

---

१ कार्य कारण भाव संबंध आणि अभाव संबंध यांच्या योगानें. २ स्पष्ट. ३ न्याय मीमांसादि सहा शास्त्रांचीं. ४ ‘ सागरे सर्व तीर्थानि ’ या न्यायानें ५ येतात; सांपडतात. ६ पौषे मासि रवौ दर्शे व्यतिपाते श्रवणान्विते । अर्धोदयाभिदो योगः सूर्यपर्वशताधिकः ॥ पौष, अमावास्या, रविवार, व्यतिपातयोग आणि श्रवणनक्षत्र इतके योग एकत्र आले असतां अर्धोदय पर्व होतें. ७ सुखाचें. ८ आटोक्यांत.

एकादशरूप ॥ ९५ ॥ याचि रुद्रसंख्येनें ग्रंथ । अकरारुद्र समर्थ । अनंत मुखें परमार्थ । ग्रंथ केला ॥ ९६ ॥ वक्र वाटोळी लांबोळी । अखंडैकरस अमृतफळी । शद्व न ठेवितां रंभाफळी[1] । सुरस तो घ्यावा ॥९७॥ इक्षुदंडाची बांकडी कांडी । परि मधुरताची घ्यावी रोकडी । द्राक्षींचीं फळें सगळीं च तोंडीं । घालितां माधुर्य ॥ ९८ ॥ तेविं ग्रंथार्थाचा परी । त्यागौत्याग[2] स्वभाव वरी । कोठें माधुर्यताचि बरी । अवचट लाभ ॥ ९९ ॥ तैसा नव्हे हा अखंडैकरस । ग्रंथ द्राक्षापाक सौरस । दाशरथीराम हृदयास । होय उद्घाटिता ॥ १०० ॥ स्वानंद भद्राचळनिवासी[3] । ग्रंथ अधिदैवत निश्चयेसी । परमार्थ निज नाम विख्यातिसी । आणिता महारुद्र ॥ १०१ ॥ सकळ संतांसी अभिवंदन । ग्रंथ आराध्य दैवत दर्शन । रामचरित्र विश्वपावन । अवधारिजे ॥ १०२ ॥ इति श्रीराम सोहळा । सद्गुरुकृपेचा जिव्हाळा । मंगळाचरणें अभिवंदिला । ह्मणे मेरू अनंतें[4] ॥ १०३ ॥ ॥ रुद्र ॥ १ ॥ उल्लास ॥ १ ॥ संपूर्ण ॥

---

श्रीरामचंद्रायनमः ॥ श्रीरामसमर्थहेरंब[5] । तुझेनि मुळिचा मुळारंभ । मंगळमूर्ति तूं स्वयंभ । सुखनिधाना ॥ १ ॥ मुखोद्गत च्यान्ही वेद । वेदहृदय बोधप्रद । विद्या अधिष्ठान संवाद । सिध्दिप्रदा ॥ २ ॥ सकळ शास्त्रांतरें इतिहास । तुझेनि विस्तारें बहुवस । अध्यात्मविद्येचा आदिपुरुष । महा गणपति ॥ ३ ॥ ग्रंथारंभीं तुज प्रार्थना । अर्थमय मंगळ निधाना । अभिष्ट पूर्तीनें रचना । चालवीं ग्रंथाची ॥ ४ ॥ जय जयजी विघ्नांतका । स्वरूप सिध्दविनायका । ग्रंथार्थीं प्रसाद करी निका । सुप्रसन्न वरदा ॥५॥

---

१ केळें. २ त्याग, अत्याग; कांहीं टाकणें व कांहीं न टाकणें कांहीं ग्रंथांत टाकण्यासारखा भाग बरा च असतो. कोठें कोठें मात्र सरसपणा असतो. पण हा ग्रंथ तसा नव्हे. ३ आत्मसुखरूपी मेरूपर्वतावर रहाणारा. ४ अनंतमौनींचा शिष्य मेरूस्वामी. ५ हें गणपतीचें रूपकात्मक वर्णन श्रीदासबोध १,२ मधलि वर्णनाबरोबर अवश्य वाचावें.

ऐसा प्रार्थितां गणनायक । प्रसन्न जाला वरदायक । सद्गुरु-स्वरूपें निश्चयात्मक । अनुग्रह केला ॥ ६ ॥ विज्ञानसिंदूरें डवरला[1] । कीं संध्याराग पश्चिमे प्रकाशला । किंवा बाळसूर्यवर्ण झळकला । गाभ सौंदर्याचा ॥ ७ ॥ महाविस्तीर्ण दिव्य रूपडें । त्या निजांगप्रभेच्या उजेडें । प्रकाशलें चहुंकडे । हृदयाकाश ॥ ८ ॥ पाहालें सद्भावसिंहासन । सत्यस्वरूपें सनातन । त्या आसनीं शोभायमान । बैसला असे ॥ ९ ॥ विवेकमथितनिजविवेक । स्वसुखें मुसावला मूषक । आखु-वाहन चित्प्रकाशक । विज्ञानबाळसूर्य ॥ १० ॥ लावण्यबालचंद्र प्रभा । सकोमल आंगिची शोभा । पाहातां निजदृष्टीसि उभा । अखंड ठसावसी ॥ ११ ॥ चिदादित्यांचा[2] अरुणोदय । घवघवीत तेजोमय । सबाह्यसुंदर निजविजय । धुंडिराज ॥ १२ ॥ निर्विघ्न व्हावया हृदयीं । विघ्नध्वांतेतेज[3] पांहीं । सर्वांगशोभा विग्रहीं । प्रत्यक्ष जाला ॥ १३ ॥ सद्भावें गणेशार्चन होय । तें विस्तारें बोलिलें न जाय । सत्यस्वरूप निजान्वयें । प्रत्यय[4] समर्पिला ॥ १४ ॥ सत्वाचा गाळींव चंदन । मगमगाटें[5] कोंदलें गगन । अनुराग कुंकुमवर्ण । सुरंग-मिश्रित ॥ १५ ॥ निजप्रतीति चित्कल्लोळ[6] । केशरमिश्रित सुपरिमळ । विज्ञानकस्तुरीचा झळाळ । सुवास झळके ॥ १६ ॥ नित्य[7] प्राप्तीचें विशाळ भाळ । रेखिला तेथें त्रिपुंड्र विशाळ । सुरंग अक्षता रत्नकीळें[8] । संमोहें[9] झळाळी ॥ १७ ॥ अभिन्न[10] ज्ञानें अविकळ[11] । ऊटि दिधलीसे पातळ । धूसरें[12] स्वसुखाचें केवळ । डौरलें निजांगीं ॥१८॥ प्रतीतिसुवासें[13] आगळीक । ज्याती मंदार पारिजातक । मल्ली मालति दिव्य चंपक । माळा गळां घातल्या ॥ १९ ॥ स्वयंभप्रभेचा चित्सागर प्रकाश डोहो तेजें दुर्धर । भास्करकोटिमथितसार[14] । मकुट

---

१ भरला. २ चित्सूर्याचा. ज्ञानरूप सूर्याचा, ३ विघ्नरूप काळोखाला प्रकाशासारखा. ४ आत्मप्रत्यय. ५ तीव्रसुवासानें, घमघमाटानें. ६ ज्ञानानंद. ७ ब्रह्मानंदाच्या नित्यत्वाचें. ८ रत्नाचे किरण. ९ समूहानें, एकत्र. १० जीव शिव हे परमार्थतः एकच आहेत या ज्ञानानें. ११ पूर्ण. १२ बुका. १३ आत्मप्रतीति हाच सुगंध. १४ कोट्यावधि सूर्यांचें तेज एकत्र करून केलेला.

मिरवे ॥२०॥ नित्य मुक्तांची दिव्य घरटी[1] । मकुटातळवटीं किरीटी । अभिनवस्तबक मुक्तकोटी । रुळती सुढाळें ॥ २१ ॥ चिदंबर प्रतीती धुवट । वेष्टिला माथां लपेटें[3] । पुष्पसमाजीं मगमगाट । मुनीभृंग लोधळे ॥ २२ ॥ मुरडीव कुरळ कुंतळ[4] । गगनगर्भतेजें मवाळ । शोभेनें शोभविती भाळ । गणनाथाचें ॥ २३ ॥ गंडस्थळें मकरंदें थबथबीत । तेणें उन्मादरसें रसपानें दुर्मत्त । विज्ञानविभ्रम झंकारत । षट्पद ते ॥ २४ ॥ कदंब वृक्षाचिये मुळीं । मकरंद प्रसवे तैसा गंडस्थळीं । कर्ण विस्तीर्ण सुढाळी । ते फडकती ॥ २५ ॥ कुटिलें दुकळें[5] भाळीं । झळाळीत प्रभा आगळी । दशन शुभ्र झळाळी । चंद्रगर्भ जैसा ॥ २६ ॥ उन्मेषलोचनें[6] सूक्ष्म । विज्ञानसुखें निरूपम । लोचन लाऊन अंतर्याम । दृष्टीसि आणी ॥ २७ ॥ अखंड लावी नेत्र टाळीं । उन्माद स्वानंद धुमाळी । फडत्कारें कर्णताळी । अवसानीं मिळे ॥२८॥ शिवसभारंगीं सुंदर । सकळकळासिद्धीचा आगर । चातुर्याचा रत्नाकर । भरतशास्त्रसंपन्न[7] ॥ २९ ॥ संगीतसाहित्यविशारद । गीतनृत्यप्रबंधछंद । कळाकौतुकाचा विनोद । नवरस वर्षे ॥ ३० ॥ लावण्य पाहातां मनोहर । तटस्छ जाले सुरवर । गण गंधर्वविद्याधर । साहित्यें पुरवले ॥ ३१ ॥ रसाळ अनुस्वरित गायन । नादें घनवटलें गगन । मूळ सृष्टीचा श्रवण । वेधला तेणें ॥३२॥ नादब्रह्म घनवटलें । त्रिभुवनज्ञानेंसीं विरालें । निजरंगें टाकिलें । प्रमाण ते वेळे ॥३३॥ सुखें शिवसभा चोंकाटली । स्वानंदाची टाळी पिटिली । अखंड ध्वनी ते उठिली । हरहरघोषें ॥ ३४ ॥ दुताळी अद्वैत अवधान । वेडावला जाय चतुरानन । स्वरज्ञानें ते प्रवीण । तटस्थ भारती[9] ॥ ३५ ॥ अखंडज्ञानमय वंज[10] घुमे । डौरें[11] उद्बोधीत प्रेमें । चटकेया[12] चंगें[13] मृदांग क्रमें । साहित्य प्रसवे ॥ ३६ ॥ चक्र उल्लोळीनें[14] भवरी घेत । स्थिर कीं चंचळ नकळे

---

१ वाटोळा फेर झूल. २ तेजस्वी. ३ पट्टा, फेटा, पटका. ४ केश. ५ चंद्राची वांकडी कोर. ६ ज्ञानचक्षु. ७ नाट्यशास्त्र. ८ चकित झाली. ९ शारदादेवी. १० एक वाद्य ( ? ) ११ डमरु. ११ टाळया ( ? ) १२ चिपळया ( ? ) १३ चक्राप्रमाणें उसळी घेऊन.

तेथें । विशाळ दोंद अत्यद्भुत । उलंडत अवसानें ॥ ३७ ॥ अप्सरा वेडावल्या अवसानीं । संतोषला पंचमूर्धनी । डोलवी मस्तक ईक्षणीं । अवलोकीत सुखें ॥ ३८ ॥ चपळांग तो सर्वांगभूषित । प्रत्यक्ष जाला सभेसहित । लावण्यसागरमथित । तेज आगळें ॥ ३९ ॥ भव्या रेखिल्या ज्ञानकज्जळें । अखंड सलंबशुंडा रुळे । विकटदशनीं तेज आगळें । चंद्राहूनि निर्मळ ॥ ४० ॥ सुवर्णकट्ट दशनीं झळाळ । कनक पत्रें घाष तेजाळ । जडलीं मुक्ताफळें रसाळ । प्रभेनें रुळती ॥ ४१ ॥ प्रबोधगभस्तीचीं मंडळें । झळकती श्रवण भूषण ढाळें । वैजयंती वनमाळा सुढाळें । पदकें शोभती ॥४२॥ मिरवे निजांगीं लेणें । स्वसुखांचें प्रस्थानभूषणें । हृदयावर लावण्यदीप्त नें । शोभती त्रिवेळी ॥ ४३ ॥ वीज पिळूनि काढिली कळा । स्वयंभ तेजाचा सोनसळा । काशेसि कसिला तेजागळा । दिव्यपीतांबर॥४४॥ विज्ञानक्षीरनिधीसी धूतला । क्षीरोदकवर्ण पांघुरला । स्वानंदसुखें सुखावला । महा दोंदलि तो ॥४५॥ तत्वाचें निज तत्वसार । कासे कटिसूत्र मनोहर । किंकिणी ज्व ळ माळा सुंदर । कटिप्रदेशीं ॥ ४६ ॥ निजनिर्णयाचें पवित्र । कंठीं धरिलें ब्रह्मसूत्र । नागबंध विचित्र । कटिप्रदेशीं वेष्टला ॥ ४७ ॥ कासकाशिली वि चत्रें । शार्दूलें शोभती विक्राळवक्त्रें । बिरुदें बांधिलीं स्वतंत्रें । महाप्रस्थान ॥ ४८ ॥ नकळे पदमहिमा अपार । भक्तासि प्रत्यक्ष जाला लंबोदर । प्रसन्न होऊनि अभयंकरें । दीधला मज तेणें ॥ ४९ ॥ चतुर्दश विद्येचा निधी । बोळला कृपेनें सहसिद्धि । उद्धाधस्थित निरवधी । हृदयामि आला ॥५०॥ जयाचें करितां स्मरण । निरसोन जाय विस्मरण । स्वसुखाब्धीसि भरण । भरे वरिवरी ॥ ५१ ॥ जे बुद्धिमंद ज्ञानविहीन । तिहीं करितां गणेश ध्यान । विद्या ऋद्धिसिद्धीनें प्रसन्न । होय तयापासा ॥ ५२ ॥ अद्वैतबोधाचा सिद्धांत । गणाध्यक्ष महासंत । वेदांतवक्ता संशांत । विसावला

---

१ शंकर. २ सोन्याचीं टोपणें. ३ ज्ञानसूर्याचीं. ४ तेजस्वी. ५ बेंबीवरच्या वळ्या. ६ सोनेरी चकाकीचा. ७ ज्ञानाच्या समुद्रांत. ८ सिंह. ९ अभय हस्त. १० भरती.

सुखें ॥ ५३ ॥ पूर्णज्ञानचंद्राच्या षोडशकळा । निजांगभूषित भुजा स्वे-छीळा । पाशांकुश चित्कळा । मंडीत आयुधें ॥ ५४ ॥ पाश घालूनि मनमुळीं । प्रपंचतरूतें उन्मळी । बोधपरुषें मोहेंजाळी । छेदूनि टाकी ॥ ५५ ॥ अनिवार भवगज आवरी । विज्ञान अंकुश शोभे करीं । भक्तांचीं संकटें निवारी । विद्याधवें ॥ ५६ ॥ स्वसुखशर्करेचें मधुर । वळिले लाडु मोदकर । शुंडापुष्करें अरुवार । वदनीं घाली ॥ ५७ ॥ मिठी पडे रसाळपणें । अद्वैतामृतरसपानें । रसना घोंटूनि तृप्तीनें । सुरस सेवी ॥५८॥ संशांतरसें पुष्टीसि आला । अद्वैतसुखें अखंड धाला । कविकुळ दैवत भक्ताला । बोळला कवित्वदानें ॥५९॥ कृपाअनुग्रहीत प्रवर्तला । विजय-सिंदुरें डवरला । हृदयरंगणासि आला । मुळींचा देव ॥६०॥ तयाच्या-कृपेचा प्रबंध । बोध गणाधीश अर्थसित्ध । अक्षरें अक्षरग्रंथनिर्वेध । निर्माण केला ॥ ६१ ॥ ग्रंथार्थीं निजप्रतीती । सद्गुरुकृपा सरस्वती । पुढीले उल्लासीं स्वस्थिती । शारदा वर्णिजेल ॥ ६२ ॥ श्रोतयांसि अभिवंदन । कृपेनें द्याल जरि अवधान । तरि ग्रंथानुसंधान सावधान । चालेल ग्रंथीं ॥ ६३ ॥ सर्व अवेवीं जीवनकळा । श्रवणेंचि अभिवृधि जिव्हाळा । चित्रासि विजयधुराळा । विजयश्री आणित ॥ ६४ ॥ तैसे तुझी ग्रंथाचित्राचे प्राण । अर्थ चमत्कारेंसीं रूढऊन । चालवितां निरू-पण । माहा आश्चिर्य तें ॥६५॥ इति श्रीरामसोहळा । सद्गुरुकृपेचा जिव्हाळा आदिकवींद्र अभिवंदिला । ह्मणे मेरुअनंत ॥ ६६ ॥ प्रथमरुद्र ॥ १ ॥ द्वितीय उल्लास संपूर्ण ॥

---

१ बोधरूप कुऱ्हाडीनें. परुष–परशु. २ मोहाचें जाळें. ३ गणपति. ४ खुसखुशीत. ५ गणाधीश जो ईश सर्वांगुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥ यांत सांगितल्या प्रमाणें गणपति हा मुळींचा देव आहे. ६ अवयवांत. ७ ऐकण्यानें. ८ ( ? ) रणांगणांत गेलेले शिपाई जरी हीनबल असले, तरी सेनापतीच्या आवेशयुक्त भाषणानें त्यांच्या सर्वांगांत चैतन्य संचरून ते विजय संपादन करतात. चित्रासारखे स्तब्ध असणारे शिपाई सुद्धां उत्तेजनामुळें विजयाच्या धुळींत माखून जातात.

श्रीरामचंद्रायनमः । श्रीरामसमर्थ वागेश्वरी । वेद वर्णिती जियेची थोरी । जेविं सागरींच्या जळें सागरीं । अर्घ्य देइजे ॥१॥ तेजें तेजासि अर्चिजे । पवनें पवनासि भजिजे । गगनें गगनासि कीजे । पूर्ण गौरव ॥२॥ अद्वैत-ऐश्वर्य संपन्न । सकळ कळांचें निधान । गुणरत्नाचें भाजन । स्वसुख-स्थिती ॥ ३ ॥ अजरामरदशागहन । अपरोक्ष विद्येचें उद्यान । बुध्दि-चंद्रिकेचें सनातन । सुधाबिंब होय ॥ ४ ॥ नक्षत्रस्थितीचें गगन । सकळ सिध्दीचें भवन । नाना चातुर्य कळारत्न । सार सरस्वती ॥ ५ ॥ कविकुळ आदि जननी । जीचा वाग्विलास[2]मननीं । प[3]वाडले महामुनी सुमनी । ख्यात विद्या अधिदैवत ॥६॥ जियेच्या प्रबोध गजरें । निगमा-द्रींचीं अर्थ गव्हरें । सोज्वळ जालीं निजनिर्धारें । अर्थांतरें सर्व ॥ ७ ॥ होय जगदानंदकारिणी । भरित अक्षरब्रह्माची भरणी । भवभंजन दशाकरणी । भोगविसी सहिष्णें ॥ ८ ॥ त्रिगुणात्मक शक्तित्रय । विभूषित त्रैलोक्य ऐश्वर्य । तुझ्या परिचारिका निश्चयें । सेविती तुजला ॥ ९ ॥ ऋध्दिसिध्दिअष्टमा दासी । तुझी महिमा नकळेचि त्यांसी । स्फूर्ति चतुर्विध वाचेसी । विस्तारिसी तूं ॥ १० ॥ यौवनदशेवीण युवती । प्रगल्भ मुग्धांना योगस्थिती । तूं निजात्मदशा पुरती । ब्रह्मा-नुभवें ॥ ११ ॥ कैवल्यासिवर्धविती । होसी गुरुकृपा निजप्रतीती । शृंगारसिंधुची व्याप्ती । अभिनव शोभा ॥१२॥ लावण्यतरूची मंजरी । सौंदर्यवन कुसुमाकरी । सत्यलोकेश अंतुरी । विज्ञानसरिते ॥१३॥ गगन-गाळींव स्वच्छता । रूपें प्रत्यक्ष होसी तत्वता । गाळींव स्फटिक तेज-समता । परिधानांबरें ॥ १४ ॥ रात्रिंदिवसे[13]वीण पाहालें । चंद्रसूर्याग्नि-

१ जिच्या. २ शब्दसौंदर्याचें मनन करण्यांत. ३ प्रवेश करिते झाले. ४ वेदरूप पर्वतांचीं. ५ गुहा. ६ सरळ, स्पष्ट. ७ आत्मप्रत्ययाच्या योगानें. ८ प्रौढ. ९ अप्रौढ, भोळसर. १० साम्यावस्था, समाधि स्थिति. यौवनावस्थेंत प्रविष्ट न झालेली बालिका ज्या प्रमाणें प्रौढ अथवा अप्रौढ अशा कोणाच्याच मनांत विकार उत्पन्न करीत नाहीं, त्याप्रमाणें इ० (?) ११ वसंतऋतु १२ ब्रह्मदेवाची स्त्री. १३ न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः। तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥ इत्यादि श्रुतीचा च येथें अनुवाद केला आहे असें वाटतें. गणेश आणि शारदा यांचे ब्रह्मस्वरूपानें वर्णन केलें असून तें श्रुतीला अनुसरून च आहे.

विना प्रकाशलें । आत्मचंद्राचें उजळलें । निजअभ्यंतर ॥१५॥ चित्प्रकाशक राकामरीची[1] । अत्यंतधवळता शरत्कालिची । शोभा सर्वांगभूषणाची । मुक्तदशा सुंदर ॥ १६ ॥ तुझिया वहनाचें महिमान । त्यारूपेंचि बोधिला चतुरानन । चिदाकाशींचें उड्डाण । घेतसे हृदईं ॥ १७ ॥ नित्यमुक्ततेंचि सेवित । हंसगतानें[2] विख्यात । त्या परमहंसीं सदोदित । बैससी प्रत्ययें ॥ १८ ॥ ओंकारवीणा तुझा परम । अखंडनादें घुमतसे व्योम । नानास्वरें निरूपम । विश्राम देसी ॥ १९ ॥ आस्तिक्य आत्मपत्र कोरें । अपरोक्षानुभव अक्षरें । लिहोनियां निजकरें । वाचिसी पुस्तक ॥ २० ॥ जय जय जगजागरे[3] । भवविजयजगदागरे[4] । रूपनिर्जित नवनागरे[5] । ब्रह्मकुमारी ॥ २१ ॥ ब्रह्मी ब्रह्मानंद दर्शनें । विसांवती सुखें तेणें । ब्रह्मदशा ब्रह्म स्थितीनें । ब्रह्मीं सुलीन होसी॥२२॥ एवं ब्रह्मार्पण ब्रह्माणी । ब्रह्मस्वरूप ब्रह्मनादिनी । ब्राह्मीबीजें करिसी ह्मणोनि । ह्मणिजेत ब्रह्मबीजा ।। ३ ३ ।। ब्रह्मप्राप्तीचीं अंतर्लेणीं । निजांगीं शोभविसी लेऊनि । शांतिविश्रांती उपरमोनी । होती तटस्थ पाहातां ॥२४॥ सौंदर्यपट्टणपुरंदरी[6] । सेविती तुतें सलज्ज सुंदरी । लावण्यसिंधूची लहरी । चातुर्यगरिमे ॥ २५ ॥ रमणीय सुधामागरीं । संभवला चंद्रचमत्कारी । तुझिया मुखासि उपचारी । उपमासि नये ॥ २६ ॥ त्यास्तव परिभ्रमें आकाशीं । हसिताब्जवदनें[7] निश्चयेसी । शरण तुज आला तयासी । पदनखीं वसविलें ॥ २७ ॥ सरळ भृकुटी मनोहर । आकर्णांत नयनसुंदर । पाहणें होय अगोचर । निजदृष्टीचें ॥ २८ ॥ सगळाची उघड नयनी । पाहसी पाहातेपणा गिळूनी । याचि पाहातेपणें सज्जनीं । पाहावें स्वरूप ॥ २९ ॥ निरंजनाचें निजअंजन । शोभविसी निरंजन । सज्जन चित्ताचें सुरंजन । त्रिपुटीवीण होसी ॥ ३० ॥ ब्रह्म प्रतीतीचें भाळ । शोभलें कुंकुमांकित रसाळ । विज्ञान

---

१ पौर्णिमेचें चांदणें. २ हंसाचें. ३ जगाची जागृतावस्था. ४ जगताला संसारावर जय मिळविण्याचें स्थान. ५ तरुण नागरिक स्त्रियांना सौंदर्यांत हरविणारी. ६ सौंदर्यरूप नगराची स्वामिनी. ७ हास्ययुक्त कमला सारख्या मुखानें.

कस्तुरी परिमळ । मध्यें रेखा विलसे ॥ ३१ ॥ नभ जिंतिलें कृष्णवर्णें । माथां कुंतळ मृदुपणें । त्रिगुणरहित कडसणानें[1] । कशिली वेणी ॥ ३२ ॥ वरि नक्षत्राचेनि पडिपाडे[2] । मुक्तसंदोह[3]प्रकाश पडे । भाळीं चित्सूर्यचंद्र चोखडें । शृंगारकळस ॥ ३३ ॥ झळाळित भांगटिळा । चंपक सुमनें घातल्या माळा । भांगीं सिंदुर असे भरिला । परमसुंदर ॥ ३४ ॥ विज्ञान विजेंवरा झळके । चिद्रवीरूप कर्णीं तांटकें । रंगलें तांबूल वदनीं निकें । मंद हास्यें सुचवी ॥ ३५ ॥ अभिनवाचें मुक्ताफळ । लेइली घ्राणीं वनिता निर्मळ । तंतुवीण चित्कल्होळ । माळा मुक्तांच्या धरी ॥ ३६ ॥ ज्ञानप्रभेचे अति चोखडे । निजहस्तकीं लेइले वज्र-चूडे । त्या अभयंकरें उजेडें । हृदयाकाश ॥ ३७ ॥ सच्चिदानंद तें तूं आहेसि । गाळुनियां त्रिपुटीसी । अनुभवप्रभा विशेषीं । धरिलीं पदकें ॥ ३८ ॥ स्वरूपशुभ्रतेचें रुचिर । नेसली लखलखाट चिदंबरें । समाधी कंचुकी मनोहर । तटंतटीत लेइली ॥ ३९ ॥ जडित चिद्रत्न मेखळा । कटीसूत्र चित्कळा । पदीं पद भूषणें लीला ॥ शोभेसि आलीं ॥ ४० ॥ ऐसी सर्वांगें सुंदर । अलंकरली मनोहर । जीच्या कटाक्षें अपार । सिद्ध सुखी जाले ॥ ४१ ॥ जे योगेश्वराची योगस्थिति । जे समाधि सुखाची विश्रांति । जे वेदांत प्रतीति । सिद्धांत सहजें ॥ ४२ ॥ जे जाग्रतीची जाग्रती । सर्वत्र हृदयें परिक्षिति । जे सायुज्याची निश्चिती । निरूपमदशा ॥ ४३ ॥ जियेचेनि प्रबोध श्रवणें । होय बद्धासि विरक्ती येणें । बद्धाचि मुमुक्षु होती श्रवणें । तात्काळ गती ॥ ४४ ॥ रिघोनि सद्गुरुसि शरण । मुमुक्षु होतो परमपावन । साधक साक्षेपें अनुसंधान । धरिती अंतरीं ॥ ४५ ॥ मनन करितां निजबोध । साधक ते चि होती सिद्ध । कृपाकटाक्षें निर्वेध । सिद्धस्वरूपा येती ॥ ४६ ॥ प्राणीमात्राचें अभ्यंतर । ज्ञानें होऊनि

---

१ दोरीनें. २ बरोबरीनें. ३ मोत्यांचे सर. ४ मस्तकावरील एक अलंकार. ५ ज्ञानसूर्य. ६ कर्णभूषणें. ७ ज्ञानानंद. आनंदरूप मोत्यांच्या माळेला तंतूची जरूरी नाहीं. ८ चकचकीत, ९ प्रकाशित झालें. १० ज्ञानरूप वस्त्र.

निरंतर । अपेक्षिताचा उच्चार । करविसी सुखें ॥४७॥ अति तीक्ष्णता अनुसंधान । अक्षरें योजिसी अर्थें गहन । अवधानाचा होऊनि श्रवण । अर्थरूप होसी ॥ ४८ ॥ तुझियेनि वक्तृत्व सकळ । चालिले ग्रंथोपग्रंथीं अविकळ । तितुकीं अर्थांतरें प्रांजळ । श्रोता होऊनि घेसी ॥ ४९ ॥ यास्तव श्रोतव्य तुझेंचि । वस्ती करिसी तूं तुर्येचि । उन्मनीविलासें स्वयेंचि । होसी परतत्व तूं ॥५०॥ अनंत ब्रह्मांडफळाची धात्री । अनंतविधि बोध अधिष्ठात्री । अनंतधृतिकारणें धरित्री । प्रसन्न होईं मज । ॥ ५१ ॥ विस्मरणाचें जन्मस्थान । स्मरणाचें अधिष्ठान । स्मरण विस्मरणातीत जाण । स्वरूप तुझें ॥ ५२ ॥ परमार्थ परि विवरसी । साचचि येसि निर्धारासी । साच लटिकें हें कवणासी । कवणें सांगिजे ॥ ५३ ॥ दुजें कैचें तुजवीण । तुझी तूं अपरोक्ष निर्वाण । हाही निश्चयो प्रमाण । कवणें कीजे ॥५४॥ स्वप्नीच्या मृगजवळाचे पूर । तरले निश्चयाचे गिरिवर । काय ह्मणोनि साचार । भाविजे कवणें ॥ ५५ ॥ तुझीच कृपा सनातन । तरि निवळे तें अर्थज्ञान । परावाचा चि होऊन । प्रबोधिसी ॥ ५६ ॥ तूंचि परेचें निजमूळ । अनुग्रहीसी तत्व अकळ । स्वरूप अनुभविसी केवळ । सहज स्थितीनें ॥ ५७ ॥ मुळींच होसी तूं अमूळ । विशेष बोधें करिसी निर्मूळ । संकल्पाचें सुमनफळ । द्विभाग करिसी ॥ ५८ ॥ सद्भाव कर्पुराची पेटी । माजि ज्ञानाची पूर्ण दिवटी । तत्वमसीची त्रिपुटी । नुरेचि काळिमा ॥ ५९ ॥ त्रिपुटीतीत उर्वरीत । वस्तुरूप तूंचि शाश्वत । सद्गुरुकृपा अनंत । बोध गीर्वाणी ॥ ६० ॥ अतिसंलग्न अवस्था खेचर । गगनघनवटीत अगोचर । मुद्रारहित निरंतर । जागविसीमुद्रा ॥ ६१ ॥ मायनिशिच्या अंधकारें । दाटलें हृदयाकाश सारें । चिदादित्य प्रभानिर्धारें । सूर्योदय केला ॥ ६२ ॥ सरलें अज्ञान काळोखें । प्रकाश जाला प्रभाकरमुखें । कार्य कारणातीत चित्सुखें ।

---

१ पोषण करणारी. २ सर्वांच्या धैर्याला आधार देणारी. ३ मेदरूप अज्ञान हाच अंधकार. ४ त्रिपुटीच्या पलीकडे उरलेली. ५ एक प्रकारची योगमुद्रा.

सुखें सुखावली ॥ ६३ ॥ तवकृपेचा महाप्रसाद। बोळला योग सुख- प्रद। प्रबोधिलें पद निर्द्वंद्व। प्रतीतीसि आलें ॥ ६४ ॥ गुरुकृपा काम- धेनु अकाम। बोळलीसि कृपेनें अभिराम। त्रिशुध्दीनें निरूपम। अ- भिवंदन तुतें ॥ ६५ ॥ भिन्नपणें नमस्कारासि नुरे। अभिन्नप्रत्ययें नमस्कारें। तुझाचि मी या निर्धारें। समर्पलों तुज ॥ ६६ ॥ निःशब्द ब्रह्मअनुभव। विस्तारीं स्वरूपाचें वैभव। ग्रंथविस्तार अभिनव। सिध्दीसी नेई ॥ ६७ ॥ तुज वांचूनि उल्लेख न होय। कार्यकारणासि तुझेंचि हृदय। त्या निजहृदयाचेनि निश्चयें। ब्रह्मीं सलग्नता ॥६८॥ ऐसें प्रार्थिता पुढती पुढती। सद्गुरुकृपा सरस्वती। प्रसन्न जाली ग्रंथार्थी। चालिली सरळ ॥ ६९ ॥ जैसी श्रीरामशराची गती। गगनलंघीत जाय पुढती। कार्य करूनि अकळस्थिती। अक्षय तूणींत रिघे ॥ ७० ॥ तैसेंचि अर्थऊनि ग्रथांतर। सिध्दी पावोनि निरंतर। येत अधिष्ठानासि अगोचर। राहे आस्ति- क्यें ॥७१॥ सुखघनींची विद्युत्प्रगटे। चिदाकाश प्रकाश उठे। ब्रह्मानु- भवें घनवटें। तैसी ब्रह्मीं ॥ ७२ ॥ निरूपम वागेश्वरी। प्रसन्न जाली ग्रंथांतरी। विज्ञानभागीरथी निर्धारी। आली भावभूमंडळा ॥ ७३ ॥ ज्ञानसद्व्रतीनें अपूर्व। पूर्वज उध्दरिले सर्व। कृतार्थ संजीवनी ग्रंथपर्व। पर्वणीसि आली ॥ ७४ ॥ हे अनंतपदसंभव सरिता। सत्य शारदा स्वरूपता। तियेसि अभिवंदन आतां। तद्रूपाचि होय ॥ ७५ ॥ तयाची कृपा हे अभिनव। देत अद्वैतगतीचें वैभव। आठवूं तो सद्गुरूराव। निजपददाता ॥ ७६ ॥ सद्गुरूचें देणें अकल्पित। जे लोकत्रयीं न दिसे इत्थंभूत। ऐसें निजप्रतीतीनें अनंत। निजपददाता सद्गुरू ॥ ७७ ॥ श्रोतीं देऊनि अवधान। कीजे अध्यात्मग्रंथश्रवण। सकळ ग्रंथाचें शिरोभूषण। सद्गुरूस्तवन पुढें ॥ ७८ ॥ इति श्रीरामसोहळा। सद्गुरूकृपेचा जिव्हाळा। शारदाभिवंदनलीला। ह्मणे मेरूअनंत॥७९॥ प्रथमरुद्र। तृतीय उल्लास संपूर्ण ॥

---

१ भात्यांत. २ आनंदरूप मेघांतील. ३ दाट अशा आत्मप्रत्ययानें. ४ भक्तिरूप पृथ्वीवर. ५ अनंतमौनीच्या पायांपासून उत्पन्न झालेली; पक्षीं विष्णुपदापासून झालेली गंगा.

श्रीरामचंद्रयनमः । श्रीरामसमर्थअनंतमौनि । निजस्वभावतेनें प्रग-
टोनि । स्वयंभ प्रतीतीसि निर्वाणीं । आलासि सहजें ॥ १ ॥ तुझें अकल्पित
दयेचें करणें । अनपेक्ष[1] आस्तिक्यतेनें[2] । प्रगटसी निजज्ञानें । निर्भव निर्मना
॥२॥ केवळ क्षमा शाश्वतरूप । केवळ करुणा आत्मरूप । कारुण्यमूर्ति
आपेंआप । दयेनें प्रगटसी ॥ ३ ॥ दैविक अनादिच्यां[3] संसर्गें । भोगिली
भवभयशंका विसर्गें[4] । अभंगबोधभंगा[5] अंतरंगें । आलासि हृदया ॥४॥
ॐकार गर्भीचें अभ्यंतर[6] । प्रणावांतरंगेंचि निरंतर । जाणीव साक्ष्य-
त्वासि निर्धार । अपरोक्ष[7] होय ॥ ५ ॥ निजानुसंधाननिश्चयें । हृदयीं
भरिसी तुझें हृदय । जेवि घटाकाशीं व्यापक होय । महदाकाश ॥ ६ ॥
तुझीया स्वरूपाची व्याप्ती । नकळे ब्रह्मादिकांसि स्थिति । अभिन्ना-
नुभवें निश्चिती । देसी अवचट ॥ ८ ॥ अमळस्वरूपविभवा । अनुग्र-
हिलें तुवां प्रणवा । वेदानुसंधानें जीव शिवा । कृपेनें उत्धरिलें ॥ ८ ॥
औटमातृकांक्रमान्वयें[9] । पिंड ब्रह्मांड सर्वत्र देह । वर्णाश्रमधर्म निश्चयें
अनुग्राहिलें तुवां ॥ ९ ॥ भवनिवर्तक नवचर्या[10] । अज्ञानतमांतक चित्सूर्या ।
परा अभ्यंतरेंचि नित्यतुर्या[11] । बोध प्रतिष्ठिली ॥ १० ॥ त्याचि अनुग्रहें
सार्वकाळ । निवळलें जाय हृदय केवळ । सदोदित अंतराळ । विरे
साक्षात्कारें ॥ ११ ॥ नित्यानंद उपजीविका । सद्गुरू प्रतीतिदायका ।
स्वरूपदानें निजात्मिका । सभाग्य करिसी ॥ १२ ॥ तुझें हृदयींचें
सनातन । स्वानंदघन अनुभवज्ञान । परमकृपेनें समाधान । देसि अकळ
॥ १३ ॥ भवकुंभद्वयें[12] भंजन । प्रतीतीनें स्वप्रकाशघन । काढिसी नित्यमुक्त[13]
संपूर्ण । बोधकंठीरवा[14] ॥१४॥ परेचीं[15] निज नयन उन्मीळण । दाखवीसी वि-
ज्ञानें निमीलण । ज्ञानविज्ञानें बोधें गहन । अंपंगिसी[16] आह्मा ॥ १५ ॥

---

१ केवल; निर्गुण. २ अस्तित्वानें, 'आहे' याच भावानें. ३ अनादि मायेच्या.
४ जन्मास येऊन. ५ अभंग ज्ञानरूप तेजाचा सांठा. ६ वेदांचें रहस्य. ७ प्रत्यक्ष.
८ आत्मप्रत्यय. ९ अ, उ, म् आणि अर्धमात्रा अशा साडेतीन वर्णांनीं. १० (?).
११ मायेचें रहस्य समजावून देऊन ज्ञानाच्या योगानें समाधिसुख स्थिर केलेंस.
१२ संसाररूप हत्तीचीं गंडस्थळें फोडून. १३ मुक्तपुरुषरूप मोतीं. १४ ज्ञानरूप सिंह. १५ मायेचा. १६ जवळ करतोस, आश्रय देतोस.

तुझ्या अनुग्रहाची अपूर्वता । वाचेनें बोलिली न जाय आतां । निज-आठवेंसी आठवितां । आठव नुरे ॥ १६॥ जगदाद्य देवा अद्वय । जगदानंद बोधिसी स्वयें । अखंडायमान सदोदय । प्रत्यक्ष होसी ॥ १७ ॥ शाश्वतस्वरूपें निरंजन । बोधिसी प्रतीतीनें सज्जन । डोळां घालूनि निज अंजन[1] । सनातन[2] दाविसी ॥ १८ ॥ तुझिया कृपेचा महिमा । नकळेचि आगमादिनिगमा । तो तूं प्रसन्न होऊनि आह्मां । सांगसी स्वमुखें ॥१९॥ आमच्या सुकृतासि पार नाहीं । जे प्रत्यक्ष जालासि तूं सर्वही । तुजवांचूनि नसेचि कांहीं । प्रतीतीच्या बळें॥२०॥ रंकासि राज्यपदवी ये । तयाच्या तोषासि सांगणें काय । तैशेपरीच अभिनव होय । अमृत[3]-सिंधूचें भरितें[4] ॥ २१ ॥ आमुच्या दैवें पार टाकिला । दैवदशेचा योग फळला । आजि सभाग्यवंताचा केला । मुगुटमणी ॥ २२ ॥ भाग्याचा उदय जाला । सुखें अमृतहोरीं[5] वाहिला । मनोरथसिद्धीचा उंचावला । कळस आजि ॥२३॥ अकळ स्वभावेंचि[6] कळलें । अद्वय प्रतीतीसि आलें । अभंग समाधान जालें । सद्गुरुवर्या ॥२४॥ वाचेसी फिटली दैन्यदशा । सरली कल्पनेची दुर्दशा । देवाधिदेव आदिपुरुषा । अनुग्रहें तुझ्या ॥ २५ ॥ तुझिया अनुग्रहाचें अभिनव । अनुभवांत राहिले ब्रह्मादि-देव । तुझेचि कृपेनें निरावेव[7] । लाधले प्रतीती ॥ २६ ॥ तुझियाज्ञानें द्योतविलें । आस्तिक्यतेचे ठेवे लाधले । स्वरूपसंपन्न जाले । देवत्रय ॥ २७॥ ज्याची प्रशंसा महा थोर । जे सर्वसृष्टीचे कर्तार । तुझे शरणागत अनुचर । ब्रह्माविष्णुमहेश ॥ २८ ॥ तुझा अनुग्रह पुरातनवेद । त्या वेदाधारें चालिले संवाद । नित्यानुभवस्वानंद । उपदेशक्रमें ॥२९॥ सृष्टीचें विचित्र वैभव । दृष्टीवीण जाय सर्व । तेंवि तुझ्या कृपेविना कांहीं पूर्व । नकळे सर्वथा ॥ ३० ॥ अपूर्व शब्दाच्या घडमोडी । केविं येती वाचेविना प्रौढी । नाना संगीत परवडी[8] । व्यर्थ श्रवणेंवीण ॥ ३१ ॥

---

१ आत्मज्ञानरूपी काजळ. २ ब्रह्मस्वरूप. ३ अमृतत्व प्राप्त करून देणाऱ्या ज्ञानरूपसागराची. ४ भरती. ५ प्रवाह. ६ अज्ञात असें ब्रह्म. ७ सत्वर (?). ८ प्रकार.

स्वयेंचि असोनि परब्रह्म । भेदें अंतर्भाव जाला भ्रम । परतोनि प्राप्तीचें निजवर्म । तुझी कृपा सद्गुरु ॥ ३२ ॥ अद्वैतबोध समारंभें । अक्षोभसुख निर्लोभें । अनुग्रहिलें मज आत्मलाभें । स्वयंभा सद्गुरु ॥ ३३ ॥ तो मी ब्रह्म आहें हें अभ्यंतर । देऊनि अपरोक्षज्ञानविवर । केलें सहज निर्विकार । अनुग्रहें तुझ्या ॥ ३४ ॥ तूं अनादिसित्ध स्वभावता । कृपेनें बोळलासि अनंता । हात मस्तकीं ठेऊनि तत्वता । अनुग्रहिलें ॥ ३५ ॥ वदनसरोजमकरंदें । निववि्ले षट्पदकर्णद्वंद्व । निर्द्वंद्वें करूनि स्वानंदें । रक्षिलें हृदयांबुजीं ॥ ३६ ॥ जें मनबुत्धीसि अकळ । तेंचि अनुग्रहें निवळलें प्रांजळ । तत्वता स्वयें चि होय । केवळ स्वरूप तें ॥ ३७ ॥ नलगे चिंतन धारणा ध्यान । नलगे विवरावें पंचीकरण । नलगे चहुं-देहाचें निरसन । करणें पाहातां ॥ ३८ ॥ नलगे मुद्रा समाधी आसन । न कळे करणें स्वरूपानुसंधान । उपदेशींच उपदेशकारण । मुळींहूनी नसे ॥ ३९ ॥ द्रष्टेपणाचा निवाडा ऐसा । कर्पूरवन्हीचा योग तैसा । उजळला पराउंन्मेष अपैसा अकळज्ञानें ॥ ४० ॥ आत्मरत्न हारपलें । तें रत्नचि रत्नासि सांपडलें । संशयाचें भान गेलें । नाहींपणें चि तें ॥ ४१ ॥ आकाशींची व्यापकता । सनातन आकाशींच तत्वता । भावावयासि आस्तिक्यता । दुसरी नसे ॥ ४२ ॥ ऐसें अपरोक्ष अभिन्न ज्ञान । ज्ञानींच ज्ञान अतिक्रमून । होय साक्षात्कारेंसीं विज्ञान । तेंही नुरे ॥ ४३ ॥ दीपामाजि प्रभा होती । ते गेलियानें अवचिती । व्यापकमाजि कवण्याहातीं । घेऊनि यावी ॥ ४४ ॥ स्वानंदसुधामय-मंडळ । विगळित प्रतीतीनें रसाळ । आपेंआप विरालें केवळ । बिंब निर्बिंबीं ॥ ४५ ॥ स्वयंभ निर्बिंब सघन । प्रतीतीसि आलें अधिष्ठान । महावाक्याचें विवरण । अर्थविवरें ॥ ४६ ॥ याचि प्रतीतीचा निजउत्धार । परब्रह्म साक्षात्कार । उदार चक्रवर्ती साचार । कृपा केली ॥ ४७ ॥ आठवती तुझे कृतोपकार । विसरें करूं जाय उच्चार । तव मी दुन्हावलों

१ द्वैतमत. २ विशिष्टाद्वैतमत. ३ मुखकमलाच्या मकरंदानें ह्म० उपदेशानें. ४ दोनी कान हे च भुंगे. ५ हठयोगांत लागणारे प्रकार. ६ परा वाचेचें स्फुरण. ७ आपोआप.

होय साचार । वेगळीकेनें ॥ ४८ ॥ कायावाचामनभावना । तुज न साहे कांहीं कल्पना । स्तव्य स्तविता स्तवना । ठावचि नसे ॥ ४९ ॥ ऐसीया तुझे स्तवनीं । प्रवर्तता अनंतमौनी । स्वयंभशिवलिंग भंगोनी । जडावें कैसें ॥ ५० ॥ हाचि महा अपराध होय । अक्षोभक्षोभ द्रोह निश्चयें । पतनासि कारण आहे आहे । सद्गुरुराया ॥ ५१ ॥ अपराधदोषनिवृत्ति । व्हावया अवचट तुझी कीर्ति । सद्भावें तुझीं नामें येती । वैखरीसि माझे ॥ ५२ ॥ तवनामीं निवांत विवरें[१]। तुझे नामासि ठाव नुरे निर्धारें । या संकटीं मूळ उच्चारें[२] । आण वाहिली ॥ ५३ ॥ तुझेनि पाहातां हे निर्वाण[३] । पाहिलें प्रतिज्ञेसि काय कारण । परिहारमिसें अभिमान । अकळ खडतरला ॥ ५४ ॥ ऐसें विवेंचिलें नवजाय । शब्द मौन विसर्जूनि राहे । संकल्पासि न येतां प्रत्ययें । मौळी पदीं ठेविला ॥५५॥ हे अभिवंदन अभिन्न । ह्मणावयासी उरेल कवण । जैसें प्रळयवन्हीसि जीवन । भेटों जाय ॥५६॥ अस्तवलें विज्ञान बिंबमुळीं । प्रकाशना काळोखें तये स्थळीं । वस्तीसि आणिलें अवकाळीं । अंतराळ ॥५७॥ साच चि सद्गुरुपदसेवन । सेव्यत्रिपुटी समर्पण । अनुभव आत्मनिवेदन । होय नमस्कारीं ॥ ५८ ॥ सामावलें स्वरूपज्ञान । सद्गुरुपदाभिवंदन । पदीं अभिन्नदृष्टी परतोन । वृत्तीसि नये ॥५९॥ निदानासि[४] अनुभविलें । तेंचि अभिवंदन सद्गुरूसि जालें । आतां निवांतचि असतां भलें । आस्तिक्य सहज ॥ ६० ॥ आठवनाठव असतांहीं । जें कां आठवासि आलेंचि नाहीं । तें समाधान हृदयीं । निवळावया ॥ ६१ ॥ पुढती मस्तकीं ठेऊनि कर । श्रवणीं सांगितला विवरं[५] । चमत्कारेंचि अभ्यंतर । चेतविलें ॥ ६२ ॥ स्वानंदेंचि अष्टभाव[६] भरणें । वोसंडती[७] सुखें सर्वहीं करणें[८] । अपरोक्षसुख[९] अंतःकरणें । दाटींत[१०] उठे ॥ ६३ ॥ जाणोनियां सचिन्हीत सुख । निर्भव आलिंगिलें सन्मुख । दाटलेनि हरिखें संतोख ।

---

१ फिरतों. २ ब्रह्मोच्चारानें, ॐकारानें. ३ संकट. ४ ब्रह्मस्वरूपाला. ५ विवरण, स्पष्टीकरण. ६ स्वेद, रोमांच, कंप, स्फुरण, अश्रु, हास्य, लास्य आणि गायन. ७ भरून राहतात. ८ इंद्रियें. ९ प्रत्यक्ष ब्रह्मानंद. १० भरून टाकीत.

बोधासि ये सहज ॥६४॥ तो हा सहजस्थितीचा संवाद। सद्गुरुमुखींचा बोधस्वानंद । अवधान देऊनि निर्द्वंद्व । अवधारिजे श्रोतीं ॥ ६५ ॥ इति श्रीरामसोहळा । सद्गुरुकृपेचा जिव्हाळा । देशिकस्तवन[1] अवलीला । ह्मणे मेरुअनंत ॥ ६६ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ प्रथमरुद्र ॥ १ ॥ चतुर्थ उल्लास ॥ ४ ॥ संपूर्ण ॥ छ ॥ ॥ छ ॥

---

श्रीरामचंद्रायनमः ॥ श्रीरामसमर्थसंतमूर्ती । जयाच्या जगदोत्धारकीर्ती । अनुग्रहें जगाच्या प्रवृत्ती । निवृत्तीसि आणिल्या ॥ १ ॥ दिव्यचंदन वनस्थळीं । सहवासें सुवास अनिळीं[2] । सभोंवत्या वनस्पती समूळीं । चंदनचि जाल्या ॥ २ ॥ ना ते वैरागरभूमीसी[3] । खडेचि प्रकाशविशेषीं । हिरेचि होती अनायासी । भूमिसहवासें ॥ ३ ॥ अपार स्वातीचें जळ । शुक्तिकायोगें मुक्ताफळ । सज्जनसहवासें सकळ । नित्यमुक्त होती ॥ ४ ॥ वन्हीच्या सहवासें अविकळ । तुटोनि जाय सुवर्णमळें । पारि शुत्धीनें केवळ । मोलासि ये ॥ ५ ॥ तैसेंचि जनाचे पापमळ । सज्जनयोगें होती निर्मळ । चित्तशुत्धीनें केवळ । येती आत्मयोग्यतेसि ॥ ६ ॥ धन्य धन्य सत्समागम । जें बोधऊं सके ना निगम । त्या परतत्वाचें सुवर्म । कळे संतवचनीं ॥७॥ धन्य धन्य सत्संगती । जालियां होय सद्गती । जन्मांतर पुनरावृत्ती । अचुक चुके ॥ ८ ॥ जैं सुकृताचें सभाग्य वोळे । तैं च संताचें महिमान आकळे । स्वरूपसाक्षात्कारी लळे । पाळिती सज्जन ॥ ९ ॥ स्वसुखाचे समुद्र उचंबळले । जयांच्या सखोलतेचा पार न कळे । विश्रांतिउद्गारचित्कल्लोळें । पावन जालें जग ॥ १० ॥ संत अकल्प[4] कल्पद्रुम । संत अद्वैत सुधेचे सोम[5] । संत विश्रांतीचें धाम । कैवल्यगती ॥ ११ ॥ संत अचिंत्य चिंतामणि । अनुभवदशेची धरणी[6] । प्रबोधसुरभि[7] द्रवोनि तृप्ती देती अखिल ॥ १२ ॥ संत सायू-

---

१ गुरुस्तवन. २ वायूमध्यें. ३ रत्नांच्या खाणींत. ४ कल्पना केल्याशिवाय देणारे. ५ चंद्र. ६ पृथ्वी. ७ कामधेनु.

ज्यसार्वभौम । संत सौजन्याचे विश्राम । संतदर्शनें निरूपम । अकळ ब्रह्मादिकां ॥ १३ ॥ संत अनुभवाचे गिरिवर । संत महास्थितीचे निर्धार । संत ब्रह्मसाक्षात्कार । सभाग्यज्ञानें ॥ १४ ॥ संत विद्यावन-कुसुमाकर[१] । संत सायुज्यगगनप्रभाकर । संत विश्रांतिभवन सुंदर । चिदानंद विग्रही[२] ॥ १५ ॥ संत ज्ञानसंपदेचे ईश्वर । संत अक्षयसुखाचे कुबेर । संत बोधामृत साचार । घनवृष्टि करिती ॥ १६ ॥ केवळ करुणेचा कळवळा । परम कोमळ संतजिव्हाळा । केवळभाविकाचा लळा । पाळिती संत ॥ १६ ॥ संत भक्तीचें परत्र[३] । संत विरक्तीचें सत्क्षेत्र । संत मुक्तीचें अद्वैतछत्र । विश्रांतिघन ॥ १८ ॥ पाहातां संता-च्या स्वरूपासी । उपमा नाहीं त्रिजगतीसी । संतस्वरूपचि तयासि । काय ह्मणोनि वर्णावें ॥ १९ ॥ संत क्षमेचि निजक्षमा । संतसौजन्याची गरिमा[४] । संतप्रीतीची महिमा । अगाध आहे ॥ २० ॥ संत करुणेचे अवतार । अंतरीं स्वरूपें साचार । नित्यव्यापकता निर्विकार । वस्तु-रूप[५] संत ॥ २१ ॥ कल्पांत जालियां न वेचे । तेंचि स्वरूप संताचें । असंतरूप दृष्टीचें । उपमेसि नये ॥२२॥ ह्मणोनि ते निरूपम । निजां-गेंचि परब्रह्म । वर्णितां निगम । निःशब्द जाला ॥ २३ ॥ प्रारब्धीं च प्रारब्ध नसे । विश्वोत्धार प्रारब्धवशें । विदेहकैवल्यउपदेशें । मुक्त केली सृष्टी ॥ २४ ॥ संत कृपेचें वज्रपंजर । संत शरणागताचे उत्धार । संत सद्गतीचे निर्धार । प्रत्यक्षाकारें ॥ २५ ॥ सर्वस्वेंसीं । सर्वभावें । जे संतासि शरण गेले सद्भावें । ते स्वरूपतेच्या[६] अंतर्भावें । कृतार्थ जाले ॥ २६ ॥ निश्चयात्मक निरहंकृती । जे संतासि सुखें से-वितीं । ते ही संतकृपेनें होती । संतस्वरूप ॥ २७ ॥ सद्गुरुकृपेचें निजबीज । पेरिलें हृदयभूमीस सतेज । तेथें संतकृपेचा सहज । घना-[७]मृत वरुषे ॥ २८ ॥ सद्गुरुकृपेचें आनंदरोप । संतसहवासें फळद्रूप ।

---

१ वसंतऋतु. २ ज्ञान आणि आनंद हेंच आहे स्वरूप ज्यांचे असे. ३ स्वर्ग-लोक. ४ माहात्म्य. ५ परब्रह्मस्वरूपी. ६ स्वरूपता मुक्तीच्या. ७ अमृतघन, अमृ-ताचा मेघ.

साक्षात्काराचेनि अमूप । गोडीस आलें ॥ २९ ॥ सद्गुरु आणि संतमूर्ती । पाहातां अभेद आत्मस्थिती । विशेषणाच्या पुढती पुढती । प्रशंसा चालिल्या ॥ ३१ ॥ अनंतदेह अहंभाव जाले । अनुतापें मुमुक्षुतेसि आले । तितुके संतीं अनुग्रहिले । त्या त्या प्रसंगीं ॥ ३१ ॥ अनंत शिष्याचे गुरु अनंत । क्रमान्वयें गुरुसंत । स्वरूपान्वयें सदोदित । भेद असेचिना ॥ ३२ ॥ एक अंतरात्मा सर्वांठायीं । निवळला आत्मज्ञानें हृदयीं । त्याचेंचि हृदय निजनिश्चयीं । निर्गुण ब्रह्म ॥ ३३ ॥ संत कृपेनें सनातन । अभेदभावें परिपूर्ण । संतांसि माझें अभिवंदन । निजनिष्ठेनें ॥ ३४ ॥ ऐकोनियां संतस्तवन । कृपेनें वोळले करुणाघन । निजात्मप्रेमें कळवळून । हृदयीं धरिलें ॥ ३५ ॥ अनुग्रहअभयवचनीं । ठेविलें आत्मसमाधानीं । जें कल्पांतें करूनि । नाशातें न पवे ॥ ३६ ॥ संत अक्षयसृष्टीचे कर्तार । ज्यांच्या कटाक्षेंचि साक्षात्कार । करिती स्वरूपें अजरामर । कृपाळुपणें ॥ ३७ ॥ जीवनापरीस[1] मिळणी । मिळोनि जाती सकळगुणी । नित्य स्वभावें करूनि । पालट नसे ॥ ३८ ॥ निजतेजाचे प्रकाशक । परि उष्ण नव्हेती ते त्रासक । निजात्मगतीचा परिपाक । करिती सुखें ॥ ३९ ॥ पवनापरीस[2] सर्वगत । जाणती अभ्यंतर सर्वातीत । जीवमात्राचें हृद्गत । होऊनि वर्तती ॥ ४० ॥ आकाशापरीस विशाळ । संताचें हृदय निर्मळ । गगन गाळींव केवळ । स्वरूप संताचें ॥ ४१ ॥ उपदेश क्रमाचें अभ्यंतर । संतसहवासें साक्षात्कार । स्वरूपाची प्रतीति निर्विकार । संत अंतरस्थिति ॥ ४२ ॥ विश्वरूप संतविभूती । हे निजात्मदृष्टीची स्थिती । परंतु प्रतीतीची निजमूर्ति । प्रत्यक्ष संत ॥ ४३ ॥ प्रतीतीचा संत दुर्लभ । ज्याच्या दर्शनेंचि स्वसुख स्वयंभ । रोकडी प्रतीति निजलाभ । अवचट होती ॥ ४४ ॥ सुवासीक सुमनापासीं । जातां सुवास अनायासीं । घेतां न घेतां निश्चयेसीं । दाटिजे परिमळें ॥४५॥

---

१ पाण्याप्रमाणें, २ वायूप्रमाणें.

तैसें संतापासीं जातां । शांति विश्रांति सहिष्णुता । अखंड उपरमें तत्वता । महत्सुखप्राप्ती ॥ ४६ ॥ संत अपरोक्षाचें मंदिर । निजात्मस्थितीचें जिव्हार । संतकृपेनेंचि साचार । स्वरूप अनुभविजे ॥४७॥ अक्षय आनंदाचीं भांडारें । प्रगटलीं स्वरूपसाक्षात्कारें । संत स्वरूपतेचीं माहेरें । जोडलीं अवचट ॥ ४८ ॥ पाहातां साधारण स्थिति । सृष्टीवरी संतमूर्ती । जनदृष्टीनें मनुष्याकृती । दिसती प्राकृतांसी ॥४९॥ परि तयाचें हृदय घेतां । अक्षयसुखें अक्षोभता । सर्वत्र दृष्टीनें समता । स्वरूपें देखती ॥ ५० ॥ विश्वाचें अभ्यंतर सदोदित । स्वरूप होऊनियां सप्रतीत । भक्तीच्या अंतरंगें अखंडित । वंदिती विश्वरूप ॥५१॥ समान दया सर्वत्र । निजात्मदृष्टीनें परत्र । आपुले परावे शत्रु मित्र । सारिखेचि तयां ॥५२ ॥ प्रकाशली जे दीपज्योति । सम सर्वत्र प्रकाशती । होय तैसीचि संताची प्रीति । सम सर्वत्र ॥ ५३ ॥ अधमोत्तम जीवसृष्टी । न पाहावे वसुमती अधमदृष्टी । सहजस्थितीनें निजपुष्टी । सकळांसि वाहे ॥५४ ॥ जीवनाची स्वभावता । जीवनकळेनेंचि तत्वता । सकळासि परिपाळी समता । तैसीच संताची ॥ ५५ ॥ उंच नीच लाहान थोर । न देखतीच आकृतिविकार । साचचि अनुभवाचे ईश्वर । संतमूर्ति ॥ ५६ ॥ निर्दोषसम ब्रह्मस्थिती । आपुले प्रतीतिनें जगती । उत्धरिली आदिअंतीं । विश्वचर्या ॥ ५७ ॥ संतदीक्षा परमनिर्मळ । दर्शनेंचि वेधिजे तात्काळ । ईक्षणेंचि सुनिश्चळ । दशा देती ॥ ५८ ॥ विमळमती विमळक्रिया । विमळउपासना निजचर्या । विमळभजनस्थिती जया । सर्वकाळ ॥५९॥ विमळ योगअनुष्ठानविधी । विमळ ध्यानधारणासित्धी । विमळ वैराग्यउपलब्धी । दीक्षा सहजें ॥ ६० ॥ संतदीक्षेनें परत्र सोय । संतअनुसंधानें निवळे हृदय । संत बोधस्थितीनें होय । केवळ समाधान ॥ ६१ ॥ जैं संताची कृपा होय । तैं सकळ सुखें घोळती स्वयें । संतप्रतीतीच्या निश्चयें । संतांसि नमन ॥ ६२ ॥

१ दुसरे. हें संतवर्णन आणि त्यांतील दृष्टांत ज्ञानेश्वरी अध्याय १२ ओंव्या १४३ –२११ या वर्णनाशीं ताडण्यासारखें आहे. २ कृपावलोकनानें.

संत सद्भावें अभिवंदिले । त्याचे मनोरथ सित्धीतें पावले । अक्षयस्थितीचे ठेवे जोडले । पूर्वार्जित सुकृतें ॥ ६३ ॥ अखंडीत अभिवंदन । अष्टांगभावें करून । स्तवितां संत कृपावन । वोळले सुखें ॥ ६४ ॥ अभय देऊनियां मज । कृपेनें सांगीतलें निजगूज । निजावधानें उमज । साह्य जाले ग्रंथार्थी ॥६५॥ इति श्रीरामसोहळा । सद्गुरुकृपेचा जिव्हाळा । संतस्तवन सुवेळा । ह्मणे मेरु अनंत ॥ ६६ ॥ ॥ छ ॥ प्रथमरुद्र उल्हास ५ संपूर्ण ॥ छ ॥

---

श्रीरामचंद्रायनमः ॥ श्रीरामसमर्थदयाळा । ब्रह्मादिकां तुझी न कळे लीला । संत अवतारमाळा । वरी कळस स्वामी ॥ १ ॥ निजतेज विरक्तिवर्चसें । विरक्तमणिमयप्रकाशें । शोभा अवतंस[1]रूपसें । धवळली सृष्टी ॥ २ ॥ भक्तीचें केवळ अभ्यंतर । समर्थकृपेचें कृपांबर । समर्थनामें चि विश्वोद्धार । प्रगट महिमा ॥ ३ ॥ समर्थ वैराग्याची विख्याति । सन्मार्गें कीर्तिनें जगतीं । विश्वोद्धार समर्थगभस्ति । उदेला ज्ञानप्रभें ॥ ४ ॥ अज्ञानसृष्टीचें तम सरलें । ज्ञानसृष्टीसि वर्तविलें । बोधप्रशंसेनें दिधलें । निज सन्निधान ॥ ५ ॥ साच सृष्टीचा करावया उत्धार । जाला समर्थाचा अवतार । मीपण[2]धरेचा भार । फेडिला समर्थें ॥ ६ ॥ अनादि पातकाचे संस्कार । सरले समर्थकृपेनें संसार । तरले जीव भवसागर । समर्थअनुग्रहें ॥७॥ समर्थ निजशांतीचा जनक । समर्थ सायुज्याचा प्रकाशक । स्वबोधस्थिती निश्चयात्मक । जाले मूर्तिमंत ॥ ८ ॥ समर्थ सत्याचें रूप शाश्वत । समर्थ अनुभवाचें ह्रद्गत । समर्थ निश्चयाचें दृढव्रत । व्यक्तीस आलें ॥९॥ समर्थ देवत्रयाचें ह्रदय । परेचें अभ्यंतर निश्चयें । स्वानंदाच्या अतिशयें । स्वरूपासि आलें ॥१०॥ सकळ देहाची प्रवृत्ती । चुकवावया याचि अर्थी । सच्चिदानंद[3] आकृतीं[4] । आले समर्थ ॥ ११ ॥ स्वरूपसाक्षात्कारें निर्धार । करावया कर्मभूमीचा

---

१ तुरा. २ अहंकाररूपी भूभार. ३ परब्रह्म. ४ मनुष्यरूपाला.

उत्धार । स्वानंदविग्रही[1] साचार । लीला प्रगटले ॥ १२ ॥ आदिपराशक्तीचें अभ्यंतर । शाश्वतस्वरूपें अपार । त्याचि प्रतीतीनें निर्विकार । समर्थ ज्ञानस्वरूप ॥ १३ ॥ मूळमायेचे एकोदर । ब्रह्माविष्णुमहेश्वर । क्षेत्रगुणधर्मसावत्र । दिसोनि आले ॥ १४ ॥ त्यास्तव तिर्ही देवांचें अधिष्ठान । गुणातीत स्वरूपज्ञान । लीला समर्थअवतरण । सभाग्य सृष्टीचें ॥ १५॥ आद्यंतसृष्टीचा उत्धार । कर्ता समर्थ गुरुवर । बोध परंपरेसि साचार । स्वरूपें केला ॥ १६ ॥ देवत्रयाचा संस्कार । विस्तारला त्रिगुणात्मक संसार । समर्थसद्गुरुवरें निर्धार । बोधिला आत्मज्ञान ॥ १७ ॥ युगानयुगीं समर्थलीला । व्हावया जगदोत्धार जिव्हाळा । स्वसुखें अवतरणें सकळा । कृतार्थ करीत आली ॥ १८ ॥ दुष्टदमन सुखस्थिति । सर्वत्रासि निजगती । सज्जनप्रतिष्ठा प्रतीती । केली निजसमर्थें ॥ १९ ॥ होऊनियां दशावतार । सांभाळिली परंपरा साचार आदिपुरुष कृपाकर । कळवळिला हृदयीं ॥ २० ॥ भवबंध कारागृहीं । श्रमले निजअंशी[3] सर्वही । मुक्त करावयासि लवलाहीं । धांवोनि आला ॥ २१ ॥ मायामहार्णव दुस्तर । माजि जीव बुडाले सविस्तर । ते समर्थस्वामीनें सत्वर । तारिले भवजळीं ॥ २२ ॥ सकळांचा वडील समर्थ प्रौढी । बुडाली देखोनि कुळवाडी[4] । धांवोनि येऊनि तांतडी । मुक्त करी सकळां ॥ २३ ॥ त्या सामर्थ्याचें पावन चरित्र । करूनि सर्वांगाचें श्रोत्रें[5] ।श्रवण सद्गतीतें परत्र । पाविजे सुखें ॥ २४ ॥ ऐकतां समर्थाची कीर्ति । उठे सद्गतीची स्फूर्ति । प्रकटे श्रीरामाची मूर्ति । सप्रतीत[6] हृदयीं ॥ २५ ॥ नासे अनादि भवभ्रांति । होय शाश्वत विश्रांति । समर्थमूळपुरुषाची स्थिति । प्रतीतीस ये ॥ २६ ॥ जन्ममरणाच्या धाडी । विकल्पयातनेच्या सांकडी । अनादिचिंता देशधडी । होती समर्थस्मरणें ॥ २७ ॥ समर्थक्षेत्रैसंभव[7] ज्ञान । विश्रांतिसुरवाडाचें[8]-

---

१ मूर्तिमंत ब्रह्मानंद. २ सख्खे भाऊ. ३ जीव. ' ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ' या गीतावचनाप्रमाणें जीव परब्रह्माच अंश आहेत. ४ वतन. ५ सर्व इंद्रियांना कान ह्म० ऐकण्यास समर्थ करून. ६ निश्चयात्मक. ७ समर्थरूप शेतांत उगवलेलें. ८ विश्रांतिरूप सुखाचें.

स्थान । सुलीन भूमिका गहन । स्वानंद पिके ॥ २८ ॥ समर्थसंभव-क्षेत्रीं । निजप्रतीतीची धरित्री । स्वराज्य करी येकछत्री । आत्माराम ॥ २९ ॥ प्रबोधविश्रांतीचीं उद्यानें । साक्षात्कारतरु वसती तेणें । स्वानंदफळसमृद्धीनें । पिकलें वन अपार ॥ ३० ॥ नित्य वसंताची वसती । सफळ धरणी पुढती पुढती । विरक्तीनें खांकरती[1] । अपार जीववृक्ष ॥ ३१ ॥ देहबुध्दिमहाप्रचंड । सीतभयें[2] वाळले वितंड । कल्पांतपानझडीनें[3] अखंड । गळाले सर्वहीं ॥ ३२ ॥ तेथें स्वानंदप्रतीतीनें । सद्गुरुवसंतछायेनें । अंकुरती निजस्थितीनें । स्वभावसिध्द ॥ ३३ ॥ कोमलशांतीचे लसलसित । पल्लव फुटती अक्षोभित । सद्गुरुकृपेचा वसंत । शोभेनें वन वरिलें ॥ ३४ ॥ प्रतीतीचीं दळें विस्तीर्ण । सुखें मुहुरलें[4] वन संपूर्ण । सुवाससुमनीं गगन । कोंदाटिलें ॥ ३५ ॥ केवळ स्वानंदाचे गळाळे[5] । लागलीं परिपक्व फळें रसाळ । साधुविहंगम सकळ । सेविती भक्तीनें ॥ ३६ ॥ उद्यानीं अमृताचीं सरोवरें । वाहती विशुध्दसत्व जिव्हारें[6] । सज्जन चंदन चमत्कारें । वाढती नित्यजीवनें ॥ ३७ ॥ पक्षापक्षविवर्जीत[7] । स्वपक्षी[8] पक्षी वसती तेथें । मोक्षदशेनें अकल्पित । समर्थ आला आला ह्मणती ॥ ३८ ॥ करुणामृतरसें मधुरें । भविष्योत्तरें मनोहर । प्रज्ञा-कोकिळा सुस्वर । वृक्षीं आलाप करिती ॥ ३९ ॥ शुक अनुवादती लीला । पारीवे घुमती बोधजिव्हाळा । शारीका सरस्वती अंतःकळा । प्रगट करी ॥४०॥ माया गोदावरीचे तीरीं । समर्थांची वास्तव्यनगरी । समर्थांच्या साक्षात्कारीं । वसती होय ॥ ४१ ॥ इंद्रियें देऊनि आवरी । इंद्रियातीत सुखी करी । विख्यात नामें गोदावरी । मूळमाया ॥ ४२ ॥ संभवक्षेत्रअभिधान । भजा ह्मणिजे परतोन । जांभ[9] त्याचि प्रतीती-

---

१ फळास येतात. २ थंडीच्या भयानें. ३ पावसाच्या झडीनें. ४ फुलले. ५ घोंस. ६ झरे. ७ कोणताही पक्ष न धरणारे निर्विकल्प. ८ केवळ आत्मस्वरूप ओळखणारें. ९ समर्थांचे जन्मस्थान जें ‘ जांभ ’ [ जांबगांव ] त्याचीं अक्षरें उलटीं केलीं ह्मणजे ‘ भ जां ’ असें होतें. भक्तीचा सिद्धांत एवंच त्याच्या स्थानाच्या नावांत देखील प्रतीतीला येतो.

करून । भक्तींचें प्रमेय ॥ ४३ ॥ जननी जनक नसोनि । क्रम रूढविला स्वस्थानीं । संतकुलपरंपरे लागूनि । समर्थ कुलदीप ॥ ४४ ॥ चित्सूर्य वैरागरहिरा । राम अवतार दुसरा । पूर्वपक्षीचिया निर्धारा । सित्धांत समर्थ ॥ ४५ ॥ समर्थ जनकाची विख्याति । अनिर्वाच्य ब्रह्मस्थिति । सगुणसाक्षात्कारमूर्ति । सूर्यउपासना ॥ ४६ ॥ खडतर तपश्चर्या आश्रम । सूर्यआराधन परम । भानुउपासक नाम । सूरोपंत ऐसें ॥ ४७ ॥ समर्थजननी अ१रुष केवळ । सात्विक भक्तीची मूस निर्मळ । निर्विकारप्रेमें जन्ममूळ । प्रसवली ॥ ४८ ॥ निजअंशरेणु अपार । संभऊन पाळिले साचार । क्रमान्वयासि विश्वंभर । मूळरेणुका ॥ ४९ ॥ ते रेणुकानामें यथार्थ । स्वरूपसाक्षात्कारी समर्थ । उदरासि येऊनि कृतार्थ । विश्वकेलें ॥ ५० ॥ सूर्य आभारला भक्तीनें । ग्रहासि आला निजप्रतीतीनें । भोजनसमयीं द्विजाकृतीनें । देखिला समर्थजनकें ॥ ५१ ॥ आतिथ्य करावयासि सद्भावें । बैसऊनि अर्चिला निजजिवें । तेणें तोषोनि सद्भावें । प्रसाद दिधला ॥ ५२ ॥ राम सीता लक्ष्मण । दिव्यविग्रह लावण्यघन । मूर्तित्रय अधिष्ठान । ह्मणे यासि ३आर्जवीं ॥ ५३ ॥ सूर्यप्रतिमावांचूनि । मज पाहणेंचि नाहीं नयनीं । ब्राह्मण ह्मणे सूर्यचि विद्यमानीं । मूर्तित्रय ॥ ५४ ॥ सीता स्वप्रकाश भानुप्रभा । लक्ष्मण ज्ञानघनगाभा । राम चित्सूर्य उभा । प्रत्यक्ष पाहा दृष्टीसी ॥५५॥ विशेष तूं आग्रह न करीं । मूर्तित्रय साक्षात्कारी । वंशपरंपरा उत्धरीं । याचि देवतार्चनें ॥ ५६ ॥ चिर्दादित्यविग्रह तीनी । द्विजें दिधलें सन्मानूनि । पंक्तीसि भोजन करूनि । जातां अदृश्य जाला ॥५७॥ तेणें आश्चर्य जालें मानसीं । भावलें ऐसें निश्चयेसीं । ५जे सूर्यचि

---

१ पवित्र, निष्कपट. २ ही रेणुका नांवावरील कोटी. परमेश्वराची आदिशक्ति जी तीच रेणुका. तीचे अंशरूप अनेक अवतार होऊन विश्वाचें रक्षण झालें आहे. अंशभूत अनंत रेणूंना जन्म देते ह्मणून रेणुका. या अनेक अवतारांपैकीं समर्थ हे होत. अर्थात् त्यांची माता रेणुका यथार्थ नांवाची होय. ३ उपासना करा. ४ ज्ञानसूर्यरूपी तिनी मूर्ति. ५ कीं.

येऊनि स्वगृहासी । भेटि दिधली मजला ॥ ५८ ॥ सप्रेमें अत्यंत विस्मित । सगद्गतीत जाले सूरोपंत । दिनअतिक्रमें[1] देहांतें[2] । समयो-आला ॥ ५९ ॥ पाचारूनियां पुत्रांसी । निरविलें देवतार्चन तयांसी । परंपरा निश्चयेसीं । अर्जवा आराध्य हें ॥६०॥ तारकब्रह्में अनुग्रहिलें । ज्येष्ठपुत्रासि गौरविलें । समर्थासि तयेवेळे । कुर्वाळिलें सहज ॥ ६१ ॥ तें देवतार्चन श्रेष्ठापासीं । अधिष्ठान गोदातीरवासी । समर्थअग्रज परमार्थासी । अधिष्ठान जालें ॥ ६२ ॥ त्यागूनि निजवृत्तीचें कुलकर्ण । श्रेष्ठें वाढविलें रामभजन । अनुग्रहें क्रमें तारिले जन । ते श्रेष्ठपरंपरा ॥ ६३ ॥ पिता जाला ब्रह्मार्पण[3] । अग्रज परमार्थमुलीन । प्रपंचवृत्तीसि कारण । कोणीच नसे ॥ ६४ ॥ समर्थ धाकुटे परी दारुण । आंगींविरक्तीचें पूर्ण भरण । नेणती क्षुधातृषादि भ्रमण । सर्वदां वनीं ॥ ६५ ॥ खचरट पिशाच्यदशा खेचरी[4] । वोहळगडदेरा[5] नदीतीरीं । राहोनियां दिवसभरी । आढळलें तें त्याहावें ॥ ६६ ॥ अर्कपत्रावरी प्रांजळ । रामचरित्रें भवनिर्मळ । अनेकाविधि धाटीनें साळ । गात नाचत सुखें ॥ ६७ ॥ सदयहृदयसमर्थमायेनें । शोधूनि आणावे साक्षेपानें[6] । महा अत्यंत प्रीतीनें । जेऊं घालावें समर्था ॥ ६८ ॥ अग्रजाची जाया निर्लोभ । विरक्तीसि कारण करी अक्षोभ । समर्थजननीस सलोभ । रक्षण सेतासि[7] पाठवी ॥ ६९ ॥ केवळ अरुष[8] ते ह्यातारी । शेतीं असतां दिवसभरी । कोणी येके अवसरीं । आश्चर्य जालें ॥ ७० ॥ विहिरीमाजि उदकासि गेली । हातिची कासंडी पडिली । दुःखें आक्रंदों लागली । घरिच्या भयें ॥ ७१ ॥ रात्रि जाली भयंकर । ऐकोनियां तो करुणास्वर । धांवोनि आला रघुवीर । कृषीवलांच्या[9] वेषें ॥ ७२ ॥ ह्मणे काय जालें कां आक्रंदिसी । बोले वा रे तूं कोठोनि आलासि । या आकांतीं पावलासी । माझें आयुष्य हो तुजला ॥ ७३ ॥ ऐकोनि हांसला संतोषें । ह्मणे चाल गृहासि विशेषें । वृद्धा वदे जातां मंदिरासि रोषें ।

१ दिवस लोटल्यावर. २ मृत्यु काळ. ३ दिवंगत, मृत. ४ या नांवाची योगांतील एक मुद्रा. ५खांच ६ मोठ्या प्रयत्नानें. ७ शेतावर. ८ आर्ष. ९ शेतकऱ्याच्या.

प्राणांची घेईल माझा ॥ ७४ ॥ पात्र विहिरींत पडलें । तें जंवें[1] हातासि नाहीं आलें । तंवरि गृहासि नव जाणें घडलें । येथें अनुभवीन ॥ ७५ ॥ न उतरतां विहिरींत । पात्र आणूनि दिलें त्वरित । तेणें तोषली अत्यंत । परि महिमा नेणे ॥ ७६ ॥ करीं धरूनि चालविलें । निमिषांत गृहासि आणिलें । आंगणामाजि सोडिलें । नेणतांचि तियेसी ॥ ७७ ॥ पात्र सांपडलें गृहासि आलें । याचि सुखीं मन राहिलें । नेणें देवें अभिनव केलें । येवढी अरुष[2] ॥ ७८ ॥ केवळ हृदय निर्विकार । न धरी च बोधाचाही संस्कार । अरुष प्रेमा दुर्निवार । सगुणीं वेध ॥ ७९ ॥ सगुण निर्गुण साक्षात्कार । स्वभावेंचि होती चमत्कार । केवळ सात्विकाचें अभ्यंतर । देवचि वसवी ॥ ८० ॥ याप्रकारें सगुणसाक्षात्कारी । समर्थजननी निर्विकारी । वृत्तीसि कारण संसारीं । कोण्हीच नसे ॥ ८१ ॥ त्यास्तव श्रेष्ठें आस वाढवून । प्रपंचमूळें समर्थाचें मन । अविद्या नोवरी पाहोन । निश्चय केला ॥ ८२ ॥ अज्ञान मूळप्रवृत्ति । जाळूनि भस्म करणार दीप्ती । त्यासि संरक्षणार्थ निश्चिती । कर्पूर योजिला ॥ ८३ ॥ युक्ति जंबुकाचे थाट । मेळऊनि अवरोध[3] उत्कट । बोधसिंहासि अवचट । रोधुं पाहती ॥ ८४ ॥ अविद्या करूनियां उभी । घटिका[4] प्रतिष्ठिली भवकुंभीं[5] । साधिलें काळज्ञान भेदनभीं[6] । लग्नाची वेळ ॥ ८५ ॥ अज्ञानाचा अंतर्पाट । सत्यसंकल्पाचा सेवट । भरली काळवेळ निकट । द्विज सावधान ह्मणती ॥ ८६ ॥ अविद्या अविरोध बंधन । जालियां कदापि नव्हे मोचन । निज सुलग्नीं सावधान । करिती याचि अर्थें ॥ ८७ ॥ मंगलाष्टक कुलदैवतस्मरण । सुचविती स्वरूप सुलग्न । परंतु नोवरा न समजोन । विषयीं रते ॥ ८८ ॥ महामोहाच्या अक्षता । भ्रमें भारुनि सकामता । घालोनि नोवऱ्याच्या माथां । वश्य करिजे ॥ ८९ ॥ त्या अक्षता पडों नेदितां[7] । चुकवोनि जाय जो तत्वता । वेद वर्णिती त्याची सत्ता । चहुं पुरुषार्थें ॥ ९० ॥

---

१ जों. २ अडाणी, विक्षिप्त. ३ वेढा (घालणारे). ४ घटिका पात्र. ५ संसाररूप भांड्यांत. ६ भिन्नतारूप आकाशांत. ७ न देतां.

समर्थ महापुरुषार्थी वर । अविद्येसि वेढा लाविलें दुर्धर । अज्ञानपतन-काळीं अगोचर । दीक्षा दाखविली ॥ ९१ ॥ नोवरा न दिसे सर्वा-परीं । अक्षता पडती भूमीवरी । चटपट जनअभ्यंतरीं । लागली चुर-चुर ॥ ९२ ॥ ह्मणती काय जाला वर । पाहाती घरोवरीं नारीनर । वरें घेतलें दुस्तर । ब्रह्मारण्य तें ॥ ९३ ॥ अविद्येच्या भयें भारी । अज्ञान अडरोण[2] भरी । होऊनि उदास सर्वापरीं । धांव घेतली पुढें ॥९४॥ दुस्तर अहंकृतीचे पर्वत । दृश्य वोसांडे[3] अप्रांत । अक्षोभ सरिता भरित । मोह अतिशयभरें ॥ ९५ ॥ निजशोधें धांव घालूनि । नद्या पर्वत उल्लंघूनि । पर्वांडला एकांतवनीं । विश्रांतीच्या ॥ ९६ ॥ ब्रह्म-चर्य आंगीं उत्कट । वरी अद्भुतदशा पिसाट । एकांतवनीं निकट । गांठी हृदयस्थेंसीं ॥ ९७ ॥ द्वादशवरुषें अतिविरक्ती । एकांतवनीं वन-चरसंगती । महाअद्भुतवेध मारुति । वानरमेळीं दर्शन ॥ ९८ ॥ अप्रांत वनाचा पैसारु । नसेचि जनाचा संचार । तेथें महारुद्र-साक्षात्कार । समर्थासी ॥ ९९ ॥ दर्शनरूप छायावेध । प्रवर्त-विला निजबोध । मानसगतिहून प्रसिद्ध । वेग अतिशयें ॥ १०० ॥ अचिंत्य चिंतिलें ठायीं । बोधकिरार्णचक्रें पाहीं । वृत्ति भूमंडळीं सर्वहीं । शुद्धीनें निघाला ॥ १ ॥ लीलामहारुद्र अवतार । महाविरक्तीचें शरीर । पाहात चालिला सविस्तर । सिद्धांचीं स्वरूपें ॥ २ ॥ तें चि पुढें निरूपण । समर्थासी श्रीरामदर्शन । जाला अनुग्रह तो पावन । आत्मप्रतीतीनें ॥ ३ ॥ समर्थचारित्र अनुसंधान । कथाभागीरथी हे पावन । स्वरूपसागरासि निर्वाण । अनंतमुखें मिळाली ॥ ४ ॥ कृत-त्रेतद्वापारीं । जाले अद्भुत अवतारी । परि या समर्थाची सरी । कोणी न पावे ॥ ५ ॥ कलयुगीं प्रथमचरण । जालें समर्थाचें अवतरण । प्रतीतउत्सवें[11] असाधारण । वर्तविलें कृतयुग ॥ ६ ॥ इति श्रीराम-

---

१ मोक्ष इच्छिणारा. २ आड रान. ३ ओसाड मैदानें. ४ शिरला. ५ हृदयस्थ आत्म्याशीं. ६ अमर्याद. ७ [illegible] ८ ज्ञान किरणांचीं चक्रें. ९ मिळणें, संगम. १० पुष्कळ मार्गांनीं, पक्षीं [illegible]नोच्या मुखानें. ११ आत्म-प्रत्ययाच्या आनंदानें.

सोहळा । सद्गुरुकृपेचा जिव्हाळा । समर्थाची पावनलीला । ह्मणे मेरू अनंत ॥ १०७ ॥ प्रथमरुद्र १ ॥ षष्ठउल्लास ६ ॥ संपूर्ण ॥ ॥ ओव्या ॥ १०७ ॥ ॥ ॥ ॥

---

श्रीरामचंद्रायनमः॥ श्रीरामसमर्थ अवतारी । स्वरूपज्ञानसाक्षात्कारी । भवसागर उतरी । निजबोधविभवें ॥ १ ॥ मुळींच प्रवृत्तीचा निरास । नातळती[1] अहंस्फूर्तीस । याचि सद्भावें जगास । बोधें उत्थरिलें ॥ २ ॥ निजबोधाच्या निर्धारीं । दीक्षा वर्तविली शरीरीं । सावधान ह्मणतां संसारीं । सावध जाहले ॥ ३ ॥ निजविरक्तीच्या बळें । वधिले षड्वैरी छळें । करूनि कल्पनेचें वाटोळें । पावले स्वरूपीं ॥४॥ सूर्याचें प्रतिबिंब जळीं । जळ आटतां पावे सूर्यमंडळीं । तेंवि कल्पना नाशें निश्चळीं[2] । निश्चळ जाले ॥ ५ ॥ प्रारब्धयोगें वनांतर । विरक्तिदशेनें दुर्धर । नाना स्थळांतरें दुस्तर । संचरती तेथें ॥ ६ ॥ पंचभूत[3] दृश्याकर । मूळ अविद्येचा संसार । महावसुमतीचा विस्तार । धुंडित चालले ॥ ७ ॥ विरक्तीचें आंगीं वारें । उदासवृत्तीनें वावरे । वस्तीनें गिरिकंदरें । वसविलीं बहु ॥ ८ ॥ महातपस्वी अनुष्ठाते थोर । वसविती गुंफा योगेश्वर । नाना हटयोग विस्तार । पाहिले दृष्टीसीं ॥ ९ ॥ सात्विक प्रेम भाविक भक्त । स्वरूपप्रतीतीनें विरक्त । अखंडसमाधि नित्य मुक्त । सिद्ध दृष्टीसी पाहिले ॥ १० ॥ निवृत्ति दरें[4]कुटीचे निवासी । अनुभव गुहा सुखवासी । विरक्तिपर्णकुटीचे तापसी । तपोधन पाहिले ॥ ११ ॥ स्वानंदशिखरीं विलासले । जे वृत्तीस नाहीं आले । नित्य उन्मनीमाजि राहिले । ते पाहिले समर्थ ॥ १२ ॥ एव बाह्यदीक्षेनें संपन्न । योगदीक्षा प्रकाशमान । अंतरीं इच्छा धरूनि ध्यान[1] बैसले किती ॥१३॥ कुटिल वासना जडली । दिगंबरतनु सलोभ मुर्द्गा[2] सकामइच्छा ध्यान समेळीं । दीक्षाविभूषित ॥१४॥ अनेक प्रकारचे महंहीं. हटयोगसाधनें समाधिस्थ । नानाचमत्कारें अत्यद्भुत । सिद्धी वोळल्या ॥खे

[1] स्पर्श करीत नाहींत. [2] परब्रह्मांत. [3] पंचभूतात्मक दृश्य जग. [4] प‹

नानातीर्थं क्षेत्रें विशेष । महापट्टणें वनें उद्वस । स्वइछाविहार तोष । अति विरक्तीचा ॥ १६ ॥ विश्रांतिनदीतीरीं वसले । तपतेजें सूर्यसम प्रकाशले । महासित्ध तपस्वी भले । अनुष्ठाते पुरुष ॥ १७ ॥ कोणासिनाहीं संभाषण । ईक्षणेंचि हृदय घेऊन । निजांगविरक्तीनें पूर्ण । भरले विजर्नी ॥ १८ ॥ नाहीं जनविकल्पाचा वारा । चालिले विचारीत विचारा । स्वरूपसाक्षात्कारजिंन्हारा । प्रकटीत ॥ १९ ॥ द्वादशवर्षें पूर्व वनवास । त्यावरि द्वादशवर्षें संचारास । आहारेंवीण शरीरास । शक्ति काहींच नसे ॥ २० ॥ नाही क्षुधेतृषेचें देहीं भान । नसे विश्रांति निद्रा जाण । वायूसारिखें संचरण । होतसे स्वइछा ॥ २१ ॥ शरीरउपजीविकाजीवन । सदोदित रघुनंदन । निजप्राणाचा ही प्राण । नित्यतृप्तीनें असे ॥ २२ ॥ निजध्यासें राम चि सर्वत्र दिसे । जिवलग त्यावीण कोणी नसे । कृपासंजीवनीनें जीवितसे । जिवाचा निजजीव ॥ २३ ॥ जैसें हिरण्यकश्यपें द्वेषछळें । प्रल्हादाचें धारिष्ट पाहिलें । तैसेपरीच चित्त शोधिलें । आपआपण समर्थे ॥ २४ ॥ प्रल्हादासि त्या सेवकजनीं । लोटिले कडेलोटणी । स्वइछाचिं समर्थांनीं । तेहीं प्रतीति पाहिली ॥ २५ ॥ वनेंदाहो अग्नींत रिघाले । व्याघ्रसिंहसहवासें राहिले । सर्प स्वइछा खेळविले । आंगावरी ॥ २६ ॥ विषाची निर्विष प्रतीती । मरणाची चिरंजीव स्थिती । बुडण्याची तारक रीती । पाहिली समर्थें ॥ २७ ॥ अक्षोभेंजळीं उडी टाकूनि । चळवळ न करितां जीवंनीं । पाहिलें धारिष्टं शोधूनि । सख्य श्रीरामाचें ॥ २८ ॥ मासोपवासी महामहिमे । येथें वर्षानुवर्षें चालिली क्रमें । साक्षात् रामाऽतार नेमें । वनविचरण ॥ २९ ॥ दीक्षा रामाची पावन । ते चि ◌क्षेनें समर्थ पूर्ण । फिरतां वनवासी दारुण । काळयोग जाहला प्र॥ ३० ॥ राम प्रत्यक्ष व्हावयासि कारण । क्षोभलीं पंचभूतें संपूर्ण । ◌ तापली सूर्येंकडून । महाउष्णकाळीं ॥ ३१ ॥ पर्वताचे पाठार

५ ६ १ ओस. २ जनापासून दूर. ३ आपण होऊन. ४ वणवा. ५ डोहांत.
९ मि◌ण्यांत ७ धैर्यानें. ८ डोंगर सपाटी.
प्रत्यया◌

लगिले । विस्तीर्णतेसि विस्तारले । वृक्षतृणादि उगवले । नाहींच ज्यावरी ॥ ३२ ॥ जीवनाचा लेश नाहीं । सारिखें च सर्वत्रही । जैसें समुद्रजळ पांहीं । सारिखें च समान ॥ ३३ ॥ तैसें पाषाणाचें काळेपण । जैसें दृश्यरहित गगन । तैसें स्थळ तें विस्तीर्ण । समर्थ तेथें ठाकले ॥ ३४ ॥ सूर्य मध्यान्हीचा महा खडतर । किरणें वर्षती वैश्वानर । अग्निरूप तो स्थावर । पदगतीस पोळवी ॥ ३५ ॥ नाहीं विश्रांतीचा पवन । धैर्यास भेडसावीत रान । कल्पांतवेळा ते निर्वाण । वोडवली सहजें ॥ ३६ ॥ संतप्त तीव्र चंडकिरणीं । पोळों लागली क्षमाधरणी । सूर्यकांत खडतरोनि । सूर्यरश्मीनें प्रज्वळ ॥ ३७ ॥ करूनियां निजनिर्धार । स्वामी स्थिरावले अतिस्थीर । तव तो पर्वत हरहर । शब्दें गडाडिला ॥ ३८ ॥ जय जय जय जय रघुवीर । घोष प्रगटती भयंकर । घुमों लागलीसे गंभीर । आकाशवाणी ॥ ३९ ॥ उदासीनतायोग निर्लोभ । निघाले धारिष्ट ते अक्षोभ । क्षोभलें चित्त सलोभ । कारुण्य उदेलें ॥ ४० ॥ क्षुधा तृषा बाधा झळंबली । प्राणांतदशा जाणवली । संपूर्ण ममतेनें आठवली । रघूत्तमाची ॥ ४१ ॥ तत्वाची माळ तुटली । जेवि शिखरावरि गेली । आवळ्याची मोट सुटली । ते सावरेल काय ॥ ४२ ॥ जवं देहाचें निर्दान । तवं तवं प्रगटे आत्मनिधान । देहभाव प्राणविसर्जन । अवघाचि विसरे ॥ ४३ ॥ त्या निर्वाणदशे माझारीं । आला समर्थाचा साहकारी । काळनिवर्तक निर्धारी । धनुर्धारी रघुवीर ॥ ४४ ॥ स्वकरें समर्थासि कुर्वाळिलें । मंत्रसंजीवनीसंधान केलें । श्रवणावाटे पाजिलें । परमामृत ॥ ४५ ॥ समर्थाचीं नेत्रारविंदें । रघूत्तमकरारविंदें । स्पर्शतांचि स्वतेजस्वानंदें । दृष्टी उघडली ॥ ४६ ॥ दृष्टीसि देखिला राजीवनयन । आनंदलें समर्थाचें मन । समीप बैसले उठोन । अभिवंदन

---

१ सूर्य किरणांतून तर अग्नीचा वर्षाव होत होता. २ पर्वत. ३ वली. ४ शांतपणें. ५ उलगडली, कोसळली. ६ शेवट (होण्याची ७ संजीवनी मंत्राचा प्रयोग.

॥ ४७ ॥ रघुराजपदकमळीं । समर्थं ठेविला मौळी । हात माथां ठेऊनि तात्काळीं । दिधलें आलिंगन ॥ ४८ ॥ सिद्धयोगियांचा विसावा । स्वसुख सायुज्यतेचा ठेवा । तो प्रत्यक्ष होऊनि तेव्हां । अनुग्रह करितसे ॥ ४९ ॥ कृपावात्सल्यरसें उचित । विचारलें जें अपेक्षित । आलों तुझिया प्रीतीनें धांवत । पुरवीन अभिष्ट ॥ ५० ॥ राम सप्रेमें असे द्रवत । माय बहु काळें पुत्रासि देखत । कळवळिलें तैसें चित्त । जगज्जनकाचें ॥ ५१ ॥ समर्थ ह्मणती तुजवीण कांहीं । मज इच्छा उरलीच नाहीं । आतां ठाव दे तुझीये पायीं । हेचि मज अपेक्षा ॥५२॥ अंतर परिक्षूनि आलासि । बिरुदें आलीं प्रत्ययासी । आतां देहसंस्कारवृत्तीसि । उरों नेदीं सर्वथा ॥ ५३ ॥ जालियांहीं तुझें दर्शन । उरावें काय माझें मीपण । आतां कृपा करूनि निर्वाण । गती देयीं ॥ ५४ ॥ बोधसमुद्र रघुनंदन । आत्मदीक्षों भवकदनें । ब्रह्मोपदेशें सावधान । समर्थासि केलें ॥ ५५ ॥ स्थूळशरीराची भाजणी । केली सूक्ष्माची ..सप..णी । कारणदेहाची सांडणी । करविली तात्काळ ॥ ५६ ॥ महा-
सें साक्षीज्ञान । साक्ष्यत्वासि विसर्जन । निर्विकल्पसमाधिघनें । ..ीति .. केला ॥ ५७ ॥ महासमाधिसुखसेजेसी । विसांवले योगवा..षीं । तुर्या परिपक्वदशेसी । मुराली सहजें ॥ ५८ ॥ जैसें पाडाचें ..आम्रफळ । सेजेसि मुरालियां होय रसाळ । विशेषगोडीनें परिमळ । ..अवचट प्रगटे ॥ ५९ ॥ तेविं निर्विकल्पसमाधीसि । सहज..स्थिति ये अनायासी । तुर्या परिपक्वउन्मनीसी । प्रगट करी ॥ ६० ॥ ..हासमाधि संवत्सर । वसविलें तें पर्वतशिखर । समीपसद्गुरु ..धुर्धर । संरक्षण होता ॥ ६१ ॥ सहजप्रतीतीच्या निर्भरें । जालें महा..क्षण चेयिरें । परि स्वरूपसाक्षात्कारें । अखंडीत निद्रां ॥६२॥ हेंचि

---

१ मस्तक. २ सायुज्य मोक्ष. ३ आत्मज्ञानरूपी दीक्षेनें. ४ संसा- ५ नाश. ६ धर्ममेघ. ७ उत्तम पिकलेलें. ८ आढी लावून ( गवतावर ). .. १० समाधिरूप.

आश्चर्यासि कारण । देहबुद्धीसि न येतां प्रमाण । पूर्वसंस्कारें संपूर्ण । देह वर्ते ॥ ६३ ॥ सूत्र चळोनि राहिलें । यंत्रपुतळी कळा चाले । जेवि निद्रेच्या भरें उठिलें । चालिलें जाय ॥ ६४ ॥ तैसें अभिनव प्राक्तन । कर्मसंस्कारासि नातळोन । लोकदृष्टया संपूर्ण । प्रारब्ध वर्तलें ॥ ६५ ॥ आश्चर्यें दढावली वृत्ति । निर्विकार दिसे सर्व प्रवृत्ति । साक्षात्काराची निवृत्ति । जाली अखंडता ॥ ६६ ॥ कोठोनि आलों कोठें जावें । न सुचतांचि कांहीं जिवें । सभाग्यसृष्टीच्या दैवें । चालविलें समर्थासि ॥ ६७ ॥ पदोपदीं स्वानंदें निर्भर । घेती समाधीचें सुख अपार । देखतांचि दृष्टी गिरिवर । ह्मणती स्वरूपें बोधला ॥ ६८ ॥ वृक्षाआंगीं चेष्टा न दिसे । ह्मणती यासि समाधीचेंचि पिसें । स्वरूपाच्याचि निजध्यासें । बाणली दशा ॥ ६९ ॥ फिरती श्वापदांचे कळप । सबाह्यअंतरीं स्वरूप । त्याचि दृष्टीनें तद्रूप । देखती सर्व ॥ ७० ॥ आकाशीं प्रवृत्ति संचरे । तें आकाश तिळभरि न सरे । तेविं विचरतां शरीरें । स्वरूप न चळे ॥ ७१ ॥ याचि प्रतीतीच्या निर्धारें । स्वरूपबोधसाक्षात्कारें । फिरत फिरत चमत्कारें । आले कृष्णातीरासि ॥ ७२ ॥ समर्थ महायोगेश्वर । नसेचि प्रवृत्तीचा संस्कार । अखंडसमाधिस्थ निर्धार । संकल्पशून्य ते ॥ ७३ ॥ अद्वैतबोध हृदयीं पूर्ण । दशा प्रगटली स्वानंदघन । सहजस्थिति निर्वाण । जाला उद्धार जगाचा ॥ ७४ ॥ तोंचि पुढें निरूपण । परंपरा उपदेश आख्यान । महद्भूतरुद्रदर्शन । अवधारिजे श्रोतीं ॥ ७५ ॥ इति श्रीरामसोहळा । सद्गुरुकृपेचा जिव्हाळा । रामअनुग्रह समर्थाला । ह्मणे मेरूअनंत ॥ ७५ ॥
॥ रुद्र १ ॥ उल्लास ७ ॥ संपूर्ण ॥ ॥

---

१ एकदां सहजसमाधिसुखाची प्राप्ति झाल्यावर देह जें कर्म करतो तें केवळ देहाच्या पूर्व संस्कारामुळें. यांतलि संपूर्ण शब्द लक्षांत ठेविला पाहिजे. देह अशा स्थितींत केवळ पोटापुरतें भिक्षा मागण्याचें कर्म करितो असें नव्हे, तर त्या शरीराला अनुरूप असें सर्व कांहीं करतो, प्राप्त कर्म कोणतेंही टाकीत नाहीं. २ नव्या जुन्या कोणत्याच कर्माच्या बंधनांत न सांपडतां. ३ समर्थां सारखे नित्य समाधिसुख अनुभवणारें योगी कर्में करितात तीं जगाच्या सुदैवामुळें करितात. ४ आत्मस्वरूप.

श्रीरामचंद्रायनमः श्रीरामसमर्थमहारुद्रा । स्वानंदसुधास्वयंभचंद्रा । आक्षोभविज्ञानसमुद्रा । भरणें भरिसी सुखें ॥ १ ॥ प्रबोधशिवमौळीं वसोनि । प्रथम कळासमृत्थिसंजीवनीं । ईक्षणामृतकिरणीं । करिसी-संवर्धन ॥ २ ॥ निरवधिसुखें चिदंबर । वर्षों लागला धाराधर । अमृ-तघन निरंतर । समर्थहृदय ॥ ३ ॥ पिसाटदशा अनिवार । आंगीं महद्भूतसंचार । प्रवृत्तिजनाचे संभार । पाठीं लागती ॥ ४ ॥ संपूर्ण वेड तें लागलें । जगदृष्टीस आश्चर्य वाटलें । एकासि अवचट वेधें केलें । तैसेंचि पिसाट ॥ ५ ॥ भत्र धुळीचा धुळारा । पोरें टाकिती ते सैरा । पळती पाठोपाठी त्वरा । धांवती मोकाटें ॥ ६ ॥ परमानंदघनकाया । कांहीं उपचार नसोनियां । जेंवि अमृतपान करूनियां । तेज आंगासि ये ॥ ७ ॥ तैसे परीं आंगीं वर्चस । ब्रह्मानंदेंसी दीक्षा उदास । मुखीं हरहरहर घोष । सर्वदां उठे ॥ ८ ॥ जय जय जय रघुवीर । भवविजयरणधीर । अहंरिपुदशकंधर । निर्जीत महावीरा ॥ ९ ॥ यादवा रामा माधवा रामा । संसारसागरीं तारिं गा आह्मा । याचि निजध्यासें प्रेमा । अखंडीत कीर्तनीं ॥ १० ॥ महाउन्माद विरक्तिभरें । असतां कीर्तनीं रामनिर्धारें । परंपरेसी अत्यादरें । राघव प्रत्यक्ष ॥ ११ ॥ कीर्तन करितां नदीतीरीं । संपूर्णजनसंभारीं । पाहातां दुरुनि दृष्टीभरी । रामरूप दिसती ॥ १२ ॥ शाहापुरनगरा-माझारीं । योग अनुष्ठानें अधिकारी । नगरीचा प्रभू निर्धारीं । आला समर्थासमीप ॥ १३ ॥ पाहे तव प्रत्यक्ष श्रीराम । आकृतीनें चि वेधिला परम । विशेष दीक्षा निरूपम । आश्चर्य पावला ॥ १४ ॥ अखंडदंडा-यमान सृष्टी । पायीं जाऊनि घातली मिठी । ह्मणे त्राहें त्राहें कृपादृष्टी । पाहें मज समर्था ॥ १५ ॥ सद्भाववज्रमिठी सत्व । दयेनें द्रवलें हृदय-

---

१ आत्मानंदरूप अमृताचा स्वयंभू चंद्र. २ अचल ज्ञानरूप समुद्राला. ३ भरती आणतोस. ४ ज्ञानस्वरूपी शिवाच्या मस्तकीं बसून. ५ मेघ. ६ प्रवृत्तींत ह्म० संसारांत गढलेल्या लोकांचे. ७ मोकळे, स्वैर. ८ तेज. ९ मि[illegible] प्रत्यया[illegible]कारस्प रावणाला जिंकणाऱ्या. १० दंडाप्रमाणें पडून. ११ जमिनीवर.

रमणीय शोभा ॥ ३१ ॥ देशोदेशींचे यात्राकर । आले सिंहासनेंसी अपार । ठंसे पताका मनोहर । महावैभवें ॥ ३२ ॥ प्रथम उत्सवाची रचना । असंख्य भक्त गणवेना । प्रथमेपासूनि निवेदना । भक्ती रूढविल्या ॥ ३३ ॥ याच उत्सवीं भीमें साह्य केलें । मार्गीं आम्रवृक्षीं अवरोधिलें । सद्वयासि आठवितांचि कडाडिलें । भंगिलें अवरोधासी ॥ ३४ ॥ सुरक्षीत रथ चालिला । अमृताचा दिवस पाहोला । असंख्य समुदाय मिळाला । रामपर्वणीसी ॥ ३५ ॥ तेथूनि गुप्तगती अभिनव । भीम पाहावयाचा अंतर्भाव । उरुण बाहेगांवाचें नांव । समर्थ पावले तेथें ॥ ३६ ॥ कृष्णेमाजि भीमकुंड वितंड । त्यामध्यें गुप्तगतीनें प्रचंड । भीम असे तो महिमा उदंड । सांगती स्थळपुराणीक ॥३७॥ जे ते प्रशंसाचि सांगती । जनमनासि झकविती । परि कोणासि न ये प्रतीती । प्रत्यक्षतेवीण ॥ ३८ ॥ समर्थाचें सामर्थ्य अत्यद्भुत । प्रगट करावयासि ते महद्भुत । तेथील स्थळिकासी पूर्ववृत्तांत । रुद्राचा विचारिला ॥ ३९ ॥ समर्थापासीं परमपवित्र । सांगीतलें त्रेतायुगीचें चरित्र । कैसी वधूनि दशवक्त्र । राम विजयी जाला ॥ ४० ॥ मुक्त केले देव संपूर्ण । लंकेसि स्थापिला बिभीषण । सीतेसह पुष्पकीं आरूढोन । अयोध्येसी येतां मार्गीं ॥ ४१ ॥ कृष्णेमाजि करावया स्नान । भूमंडळासि आलें ते विमान । कृष्णातीरीं उतरलें सैन्य । कपी आणि राक्षसांचें ॥ ४२ ॥ सीतेसि ठेविलें सिरठें गांव जेथें । रामसुमित्र पश्चिमेचेनि पंथें । कृष्णेसी देखून सुखाब्धि भरितें । दाटिलें हृदयीं ॥ ४३ ॥ कृष्णा निजतनूचि केवळ । प्रतीतीचा स्वानंदकल्लोळ । केवळ दयेचेंचि सुसीतळ । जीवन भरलेंसे ॥ ४४ ॥ अपुल्या स्वरूपज्ञानें आपण । स्वानंदजीवनीं सनातन ॥ कीजेत स्वानुभवें मज्जन । ते श्रीरामें आदरिलें ॥ ४५ ॥ सकळ तीर्थाच्या श्रेणी । पुनीत होती श्रीरामचरणीं ॥ तो ही मान देऊनि महापर्वणीं । तीर्थविधि करी ॥४६॥

---

१ प्रतिमा, मूर्ति. २ उगवला. ३ ही कथा निवृत्ति रामाच्या १ ल्या रामसोहळ्यांत अशीच सांगितली आहे.

साक्ष्यत्व । परमानंदें तें परतत्व । वोळलें सुख ॥ १६ ॥ समर्थकृपेनें उदार । माथां ठेऊनि पद्मकर । ह्मणती उठ आतां अभ्यंतर । प्राकट करीं ॥ १७ ॥ पुन्हा अभय घेऊनि पुरतें । प्रार्थिता होय भावार्थें । ह्मणे गृहासि येऊनि समर्थें । कीजे मज सनाथ ॥ १८ ॥ विनयसप्रेम-भक्तीनें । करीं धरूनियां प्रीतीनें । गृहासि आणिलें आवडीनें । मांडिलें अर्चन ॥१९॥ जनप्रवृत्तीचा न पडे वारा । ऐसा अरण्यवास संचारा । नावडेचि प्रवृत्ती अंतरा । उठोन पळती ॥ २० ॥ जैसीं कस्तुरीमृगें सुसीळ । वसती अरण्यप्रदेशीं निर्मळ । तयासि जनसहवासमळ । प्राणांत होय ॥ २१ ॥ अरण्यवासी विहंगम । करूनि उपचार परम । ठेवितां सदनीं सप्रेमें । जन्मभूमिका इछिती ॥ २२ ॥ तेविं त्या जन-सहवासें । अतिसंकोचित मानसें । मायामयदृश्यातीत वसे । लक्ष्य ब्रह्मारण्यीं ॥ २३ ॥ प्रथम कमळाकरें भावें । शक्तीसह कृतार्थजिवें । होऊनियां अंतर्भावें । समर्थ आर्जविला ॥ २४ ॥ प्रपंचाची तडाफोडी । फोडिती संग्रहउतरडी । चित्तासि विक्षेपाची रूढी । निष्टूनि जावया ॥ २५ ॥ तिलुकी घसणी साहोनि । नित्य नवा आनंद मनीं । पंच-प्राण कुर्वाळुनि । टाकिलें जिहीं ॥ २६ ॥ तेथें काय असेल प्रपंच-आस । तरीच जोडले समर्थ त्यांस । लाधले जो सहवास । ब्रह्मादिकांसी दुर्लभ तो ॥ २७ ॥ त्याचि द्वारें परंपरा । घराणी जाली येकसरा । बोध चालिला ग्रामांतरा । विख्यातीनें ॥ २८ ॥ ग्रामार्ची ग्रामें संपूर्ण । उपदेश मालिका महाजन । बोधमंडळवृष्टीनें घन । मंडळेंचि मंडळें होती ॥ २९ ॥ प्रथम जन्मनवमीचें पर्व । आलें अभिनवाचें अपूर्व । वसविलें पारगांव । उत्सवें पार टाकिला ॥ ३० ॥ पारगावींचा अधिकारी । तो अनुकूल सर्वांपरीं । उत्सवस्थळ आरामांतरीं ।

१ तुझ्या मनांत काय आहे तें सांग. २ कमळाजीपंत; समर्थाच्या जुन्या दोन चरित्रां पैकीं दुसऱ्यांतील कडके ९–१० पहा. ३ घरदार इत्यादि प्रपंचात् गुंतवून टाकण्याऱ्या गोष्टींचा त्याग करून मनाला क्षुब्ध करणारीं कारणेंच नाहींशीं करतात. ४ थोंसाधार्मा, ग्राम ५ संप्रदाय. ६ ठिकाणें.